CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

16.5

३०७२
3075
3075
3075

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

.... प्राप्ति-संख्या ....
ग्रन्थ-कार्ड
[illegible] वर्णी दि० जैन (शोध) संस्थान
ग्रन्थागार
नरिया, वाराणसी-५

....आदि गीता..........................
सुमतिबाई शहा.........................

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्राविका प्रकाशन –

श्री आदिगीता

•

पद्मश्री
पंडिता सुमतिबाई शहा

• मूल्य सात रुपये

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रकाशिका–

प्रि. विद्युल्लता शहा,
श्राविका प्रकाशन
श्राविका संस्था नगर
सोलापूर.

फेब्रुवारी १९७०

मुद्रक–

कुमुदचंद्र फुलचंद शाह
मे. सन्मति मुद्रणालय
१६६, शुक्रवारपेठ,
सोलापूर.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हे साधका !

संसाराच्या प्रचण्ड व्यापांत
ज्याला तूं विसरलास...! ...!
ज्याला विसरल्याने तुझे महान स्वरूप
तूं गमावून बसलास...!
त्याची स्मृति व्हावी, तुला परमोच्च
आत्मस्वरूपाचे सम्यक्‌दर्शन
व्हावे म्हणूनच ही गीता मी
तुला सांगत आहे. हे हितगुज आहे,
हे प्रेयस आणि हेच श्रेयस,
याने मनांतील द्वंद, जडता,
भकासपणा संपावा. मांगल्य, पावित्र्य
ज्ञानमयता व वीतरागता प्राप्त व्हावी,
अशी माझी इच्छा आहे.
हे सारे सारे सर्वांच्याच विकासासाठी आहे.
हेच जीवनाचे रहस्य आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पुरस्कार

पद्मश्री डॉ. द. रा. बेंद्रे,
धारवाड

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पद्मश्री प्रा. डॉ. श्री. द. रा. बेंद्रे धारवाड यांची

मंगल–गाथा

सिद्धा अरिहंतांना । साधूना साध्वीना ।
नमोकार स्वार तो । हा का ॐकारतो ॥

वाजतो गाजतो । बोधामृत पाजतो ।
भागले भोगले । होत शिवा जोगळे ॥

हे यात्रिक, हे पाइक । धर्मचक्र चालले ।
दिवानिशी दिव्यशक्ति । आदिनाथ बोलले ॥

साधनास लागले । साधक जागले ।
ही जादू झाली कशी । वृषभाची री उरी ॥
विषारदाचे साकारी ॥

ऐक ऐक श्राविके । जिथें पिके तिथे न विके ।
लोकाग्री सदा जाग । सिद्ध एक लक्ष भाग ॥

सन्मति दे सुमने तो । नेति नेति ती सुमति ।
वर्षण करी मती मती । घरोघरीं ही भरती ॥

आत्मी राम काम दे । मुक्ति दे, भक्ति दे ।
शक्ति दे, प्रेम दे । जीवाजीवाला स्वमति ॥

परमात्मी वाहू दे । जाऊ दे गाऊ दे ।
लीन जी न हो मळीन ॥

ज्या कुळी न ही जळी न । तेवते सदा मनी ।
महावीर जन्मुनी । समर अमर जीव भ्रमर ॥

30६९

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रस पीती रस गाती । सरस ज्या ती भारती ।
भरो, उरो, धरो श्रुति । दिव्य ध्वनि कानी मनी ॥
हृद्गुहेतही ध्यानी ॥

हा धर्म स्वानुरोध । हा वेध बालबोध ।
शिरी धरी गंगा जरी । उतरली न आचरणी ॥

ती तरणी । उत्तरणी । संतरणी । शिवकरणी ।
कशी मही भोग दे । जरा गा वाग गे ॥

ही वात दीप ते । तिथेच मी शमी दमी रमी समी ॥
ही लोभस लाभते । जिथें निवांत शोभते ।

गमत गमत राम रमतो तेथे । समतल जल तरि वारा जेथे ॥
वारावे ते काय असे ते । जाते येते एकच होते ।

उक्ति उक्ति पुनरुक्ति नव्हे ही । सत्य नित्य जणु नूतन जेवी ॥
प्राणाचा संचार सदाचा । छंद बंध हा सहजच साचा ॥
निज जिन वासा आस जिवाची । मृद्गंधी वा हृद्गंधी वा ।
होति वासना । गीत गा जिवा । आज गांठली शीव शिवाची ।
पूर्ति जाहली, मूर्ति पावली ।
येत्या लब्धीचीच सावली । झरा वाहतो संतत गाणी ।
मोतिदार हे पाणी पाणी । प्रसन्न चित्ती प्रसन्न वाणी ।
मोहळ रचवी ही मधुराणी ।
सुमतीचा स्वर गोचर झाला । येइ मधुर फळ भल्या तपाला ।
प्रसाद गुण की सुनाद देतो । नवी जान्हवी प्रसवी वी तो ।
कधी श्रुतीला सुचले गाणे । आदिगीत नवलाचे नाणे ।
नदीगांव ते अनादिगीता । कलीत झाली कृतार्थ त्रेता ।
उत्साहाचा स्थायिभाव तो । वीर जिवाचा सत्वचि होतो ।

— द. रा. बेंद्रे
अंबिकातनय दत्त

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रस्तावना

पद्मश्री डॉ. द. रा. बेंद्रे,
धारवाड

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

महाराष्ट्रातील मोठ्या शहरांतील प्रख्यात स्थळ, सभोवती तुळजापूर, कुंथलगिरी, अक्कलकोट, पंढरपूर, मंत्रालय, माणिकनगर, कल्याण, गाणगापूर, श्रीसिद्धेश्वर अशा क्षेत्रांच्या मध्यें पूर्वीचे सोन्नलगी म्हणजेच आजचे हे सोलापूर शहर आहे. विविध भक्तांनी येथील वाट आठी दिशेने तुडविली आहे. त्या गावाचा महिमा काय सांगावा ? शुभराय महाराज टिपूच्या जाचांतून सुटून थेट इथे आले. अक्कलकोटचे स्वामी महाराज येथूनच पुढे अक्कलकोटास गेले. अल्लमप्रभु व इतर शिवशरण, कित्येक जैन साधु–साध्वी व श्रमण, विठ्ठलाचे वारकरी, तुळजापूरचे भक्त श्रीनरसिंह सरस्वती, श्रीपाद श्रीवल्लभ, वैष्णवदास हरिकीर्तनकार, शिवकीर्तनकार, शक्तींचे भक्त, गणपतीचे आज्ञाधारक किती सज्जनांची येथे सावली पडली आणि पुढे सरकली ! परंतु जनमानसांत त्यांची जत्रा जंग जंग भरली आहे. अशा या थोर साधुसंस्थेची परंपरा पंडिता सुमतिबाई यांनी या आदि गीतेच्या निर्मितीने पुढे चालविली आहे, असे म्हटले तर ते अधिक समर्पक ठरेल.

काही अपूर्व दैवयोगाने इ. स. १९४४ ते ५६ सोलापूर शहरी डी. ए. व्ही. कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून राहण्याचा योग आला. तिथेच पुष्कळ कविमित्र मिळविले. काही तरुण भेटले. कित्येक मोती हरविले. माझ्या पोटाच्या पिंडांना, माझा पिंड पाळलेल्यांना तिलोदक दिले. पुष्कळ वाचन केले, मनन केले, ध्यान केले, काव्यसेवा घडली. विज्ञानांत प्रवेश झाला. इ. स. १९४३त श्री अरविंद आणि श्रीमाता यांचे दर्शन घेऊन शिवमोगा येथील साहित्य संमेलन संपवून या क्षेत्रांत आलो. आणि त्या बारा वर्षांत श्राविकाश्रमाजवळच माझे राहण्याचे घर व ग्रंथालयाचे स्थळ असल्यामुळे या श्राविकाश्रमातील कांही निवडक मुलींना महाविद्यालयीन अभ्यास सांगण्याबरोबरच जैन धर्माचे वाचन, चिंतन, प्रवचन हेहि मी करीत असे. इ. स. १९५६मध्ये मला साठ वर्षे झाली. धंद्याचे ऋण संपले आणि याच वेळेस इ. स. १९५५त पं. सुमतिबाई शहा यांचा 'हृद्‌गंध' नांवाचा चिमुकला ग्रंथ सुरस ग्रंथमालेने प्रसिद्ध केला. त्यावेळी त्या ग्रंथाचे परीक्षण लिहिले. आज

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

इ. स. १९६९. चौदा वर्षांचा काळ लोटला. मध्यंतरी त्यांचे हातून महापुराण, रामायण, सुवर्णरेखा इत्यादि उत्तमोत्तम ग्रंथ पाठोपाठ आले. श्रीमती सुमतिबाईंची तपस्या दिवंगत अर्जिकाबाई क्षु. राजुलमती (आत्याबाई) यांच्या समाधीक्षेत्रांत चालूच राहिली. त्या भूमीवर अनेक विद्यालयें उभी झाली. भरभराटीस आली. तीर्थंकराचे देवालय निर्माण झाले. अनेक साधु, सत्पुरुष आले, गेले. आज "आदि-गीता" हा मोठा टप्पा या तपस्वी विदुषीने गाठला.

या काव्याला उपसंहार म्हणून मीहि एक लहानसा भाग जोडला आहे. अर्थात् या काव्याच्या सरणीला व शैलीला धरूनच ती आहे. प्रारंभी मी प्रास्ताविक काही लिहावे असे त्यांचे म्हणणे पडल्यामुळे काही शब्द लिहीत आहे.

या काव्यातील पाक मत्तमधुर, प्रकट तरी गूढ असा झाला आहे.

"आदि–अंती असणाऱ्या ॐकार ध्वनीने सारे नभोमंडल भारून टाका,

ही माझी भैरवी आत्मदेवाच्या साधनेची सुरुवात करावयास साधक ठरो"

हे वाक्य आहे हृद्‌गंधांतील शेवटच्या वचनातले. आणि आज सुरवात होत आहे—

"आदि प्रभूची अमरभारती ।
सुवंद्य गीता अखंड स्फूर्ती ॥
दे नव जीवन दिव्य प्रेरणा ।
चिरंजीव करि विश्वजीवना ॥"

आणि शेवट होत आहे—

"सत्य सनातन शाश्वत आत्मा ।
जीव व्हायचा जगिं परमात्मा ॥"

या जवळ जवळ २५० पानाच्या काव्याला कोणी महाकाव्य म्हणो, न म्हणो. पण यात महावस्तु आहे, महद्वाणी आहे, सत्य आहे, सामर्थ्य आहे. साधन आहे अन् सिद्धीहि पण आहे. फारच खडतर तपस्या या काव्यांत पूर्ण केली गेली आहे. यांत सिद्ध आहेत, आदिजिन आहेत. भरत चक्रवर्ती आहे, बाहुबली आहे, राम आहे, कृष्ण आहे कौरव पांडव आहेत, नेमिनाथ आहेत, आणि अखेर चोवीस तीर्थंकरस्तुति आणि चोवीसावे तीर्थंकर महावीर आहेत. आणि अशा या महान् चरित्र नायकांच्या जीवनांतून वाहणारी गीता समकालीन गांधींच्या सत्य अहिंसेला पोटी पचवून महा–राष्ट्राला साजेल अशा टणत्काराच्या क्षात्रवृत्तींतहि आहे. "खोडास पालवी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आणविणे आणि फत्तरांतून सूत कातणे, ' असतो सत् अजायत ' असे अघटित करणे हे कवींच्या मांत्रिकतेत येते असे एका कन्नड जैन महाकवीने म्हटले आहे. आदिगीतेतील चरित्रपाक तत्त्वपाक आणि गीतपाक हा जैनीय दर्शन सरणीला धरून सुद्धा इतर तात्विकांशी मधुर संवाद करीत आहे.

हे चौदा खंडाचे काव्य एकेक खंडांतून पाय काढीत एक अखंड चिंतनयात्रा करीत आहे. वृत्त सुटसुटीत आहे. वाक्य सरणी सुललित असून काहीतरी हितगुज आपल्याशीच कुजबुजत वाटचाल करणाऱ्या ध्यानी चिंतकाची आठवण करून देत आहे. या काव्यांत ऐहिक आणि पारमार्थिक यांच्या तोंडमिळवणीचे साहित्य आहे. मरणशीलांना असले साहित्य तितके रुचणार नाही. आणि विदेही अमरजनांना या काव्याचे काय होय ? पण धर्मार्थकामांच्या त्रितापांतून मुक्तीभक्तीचा पंथ वीराप्रमाणे धरू म्हणणाऱ्या सात्त्विक जीवांना खंबीरपणाचा अनुभव आणून देणारे बोल या काव्यात पदोपदी आहेत. हे एक महा मननीय काव्य आहे. 'स्वनातीत 'कारांची ' आनंदलहरी ' गीत गुंजारवकार कुंजविहारींची अलीकडील सखोल वाणी, स्वरुपानंदांचे अभंग, विनोबांची ' गीताई ' अशा कांही काव्यांची आठवण झाली. आदीगीता या काव्यात महान गुण आहेत. हे पुन:पुन्हा वाचणाऱ्यांच्या लक्षांत येईल. खटकतील अशी स्थळे आहेत. पण तो खटका काव्य कौशल्याचा आहे. हे विचारमंथनाच्या विमर्शानंतर लक्षांत येईल.

आदिगीता हे काव्य. गंगौघाप्रमाणे पल्ला लांब पण विस्तार थोडा असून पावित्र्यांत बिलकूल कमी दर्जाचे नसलेले हे कृतिरत्न कौतुकास्पद आहे. आदिगीतेचे एक महाव्यापक लक्षण म्हणजे त्यांतील भरतकाम, भरत खंड, तेथील भरत चक्रवर्ती, श्रीरामाचा भाऊ भरत, श्रीकृष्णाचे सेवाक्षेत्र भरतकूळ आणि या सर्वांचा कथाकलाप म्हणजे भरताचार्यांचे नाटच कौशल्य. हे लक्षण मनांत भरताच भाव–राग–ताल यांच्या सहकार्याने संगीत निर्माण होते असे म्हटलेल्याची आठवण होते. आदिगीतेतील भरीवपणा, हा गायत्रीचा दृष्टा, विश्वामित्र, यांचे अनुयायी, वैदिक भरत, पंचजन–यांचा एक नवीनच प्रपंच सद्य:कालीन भारतात प्रकट केला जात आहे असे वाटते.

कवयित्रीने स्वतःस "आजच्या गणराज्यांतील मीहि एक जन" "जनासारिखे मलाहि मन पण' असे म्हटले आहे हे त्यांच्या शालीनतेप्रमाणे आत्मविश्वासाचेहि प्रतीक होते. या काव्यांत स्वराज्य, नवजीवन, लोकशक्ति, प्रजा अशा शब्दांची पेरणी जशी समकालीनत्व दर्शन घडविते त्याचप्रमाणे यात प्रतिपादलेली समर सांस्कृति आणि ब्रम्हा-विष्णु-महेश समन्वयबुद्धि हे कवयित्रीच्या हृदयसंस्काराचे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पापुद्रे त्यांच्या सुकुमारतेनेहि सुंदर वाटतात. काव्य कुठे मंदगतीने तर कुठे अतिवेगाने वाहते. जैन संस्कृति ही मृत्युंजय आहे हे उठावदारपणे सांगणे हेहि या काव्याचे एक विशेष लक्षण आहे असे म्हणता येईल. प्रस्तावना-वाचकाना वाटेल कीं वेंद्रचांना हे काव्य म्हणजे एक निष्कलंक चंद्रासारखे आहे. पण दोषाचा उच्चार करून एका सुंदरतम कृतीला गालबोट कशाला लावावे ?

आदिगीता अस्सल काव्य आहे. आणि त्यांत गीतेचा गुण तुडुंब भरला आहे. इ. स. १९५६ मध्येच जपानांनील शिमिझू शहरी भरलेल्या आठव्या विश्वधर्मसम्मेलनांतील कवयित्रीचे भाषण अनेकांना आवडले. भाषणांत सत्व होतेच. पण त्यानंतरच्या तेरा वर्षांतील तपश्चर्येचा परिपाक आणि परिणाम या काव्यांत अनुभवास येतो. प्रफुल्ल कमलास ज्यादा रंग भरण्यांत काय अर्थ आहे ? मला स्वतःला या महाकाव्याने भारून टाकले हे मी प्रामाणिकपणे कबूल केलेच पाहिजे.

आदिगीतेचा सौंदर्यबोध

आदिगीता हा काव्यग्रंथ रचून विदुषीरत्न कविवर्या पं. सुमतीबाई शहा यांनी खरोखरच अखिल महाराष्ट्रांतील काव्यरसिक व तत्त्वपिपासूंना एक चांगलीच बौद्धिक मेजवानी दिली ही गोष्ट ग्रंथाचे प्रथम वाचन केल्यानंतर लक्षांत आल्यावाचून राहात नाहीं. या ग्रंथाची निर्मिती अखंड निरंतर वाहणाऱ्या विचार प्रवाहातून झालेली आहे हे निश्चितच. भगवान् श्रीकृष्णाने गीतेमार्फत भारतीय संस्कृतीला जी बहुमोल देणगी दिली तिला अनेक वर्षांपासून बहुजनसमाज आपला अमोल निधि म्हणून जोपासत आहे. हिंदु धर्मातील धार्मिक व दार्शनिक विचारांना त्यामुळे मोठे बळ मिळाले भगवद्गीतेचे पठण-पाठण आजपण सर्वत्र नित्य नियमाने होत आहे. अशाच पद्धतीचा आदिगीता हा महत्त्वपूर्ण विचार आहे. तसे बघितले तर जैन संस्कृतीमध्यें वैचारिक व सैद्धान्तिक ग्रंथ कमी नाहीत; पण तत्त्वज्ञान हा विषयच मूलतः गहन आहे. त्यांतून पुन्हा सूत्रबद्धपणे मांडल्यास अधिकच गहन व गूढ बनतो, म्हणून जनमनाचे अनुरंजन करण्याचें कार्य या गीतमय ग्रंथाने केले आहे, हे निःसंशयच. असा ग्रंथ पण आजपर्यंत उपलब्ध नव्हता, तो आज प्रकाशित झाला आहे. काव्य प्रान्तात हा नांवारूपास प्राप्त होईल हे तेवढेच खरे. विचारांचा अमूर्त प्रवाह हृदयी होता म्हणूनच ही आदिगीता त्यांना स्फुरली. सामाजिक व शैक्षणिक कार्याला आपले संपूर्ण जीवन अर्पून त्यांनी आपला साहित्यिक परिमल काव्यरसिकांना दिला; त्याच्या पाठीशी अनुभवाचे अखंड विश्व उभे आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रस्तुत आदिगीतेमध्ये एकूण चौदा खंड केलेले आहेत. या चौदा खंडांत पं. सुमतीबाई शहा यांच्या काव्यप्रतिभेने भारताच्या प्राचीन संस्कृतीतील ठळक चरित्रवाङमय ग्रथित केले आहे. त्यांनी भगवान् आदिनाथाच्या चरित्रांतून, कधी भरतेश्वराच्या भोगवादी जीवनांतून, कधी रामचंद्राच्या आदर्श रामराज्यांतून नि कधी भगवान् कृष्ण व कौरव-पांडवांच्या युद्धभूमिकेतून आपली गीतगंगा मोठ्या डौलाने संथपणे प्रवाहित केली आहे. आपल्या अमरवाणीने ज्यांनी सर्व प्राण्यांचा उद्धार केला व वेळोवेळी सद्धर्माचे पुनरुज्जीवन करून आत्मकल्याणाचा मार्ग जगाला दाखवून दिला, त्या वृषभ तीर्थंकरांच्या वन्दनेतून 'आदिगीता' या सरितेचा आरंभ होऊन ती जगाला अन्याय, हिंसा व भ्रष्टाचार यांपासून सोडविणाऱ्या महावीर या अन्तिम तीर्थंकरापर्यंत प्रवाहित केली. आदिगीतेचा प्रवास हजारो मैलांचा जरी असला तरी सकृद्दर्शनी वाचक त्यांत इतका तद्रूप होतो कीं, त्याला क्षणभर कां होईना हे दुःखद विश्व विसरल्यासारखे होते व तो दिव्य आत्मानंदामध्ये विभोर होऊन मयूराप्रमाणें नाचू लागतो. प्रारंभीच बघितले तर —

आदिप्रभूची अमरभारती
सुवन्द्य गीता अखण्ड स्फूर्ती ।
दे नवजीवन दिव्य प्रेरणा
चिरंजीव करि विश्वजीवना ।।

भगवान आदिनाथांची अमरवाणी म्हणजे आदिगीता म्हणून विशद केले आहे. त्यांनी आपल्या जीवनांतून जगाला जो संदेश दिला तो नवजीवन देणारा असाच आहे.

आदिगीतेच्या विषयप्रतिपादनांत कवयित्रीने भगवान् ऋषभदेवांच्या जीवनांतील जन्म–मोक्षादि प्रसंगांचे मार्मिक चित्रण केले आहे. त्यावेळी या मानवाला भोगभूमीतून कर्मभूमीतील स्थित्यन्तरे माहीत नव्हती. केवळ कल्पवृक्षाच्या मदतीने इच्छित फळें प्राप्त करण्याची शक्यता संपल्यानंतर प्रथमच भगवान ऋषभदेवांनी जगाला असि, मसि, कृषि, शिल्प, वाणिज्य व कला या सहा विद्या सांगून प्रयत्न व पुरुषार्थाचीं नवी दुंदुभी वाजवून भोगलिप्त मानवाला जागृत केले. कवयित्रीच्या शद्बांत–

भोगभूमिचा त्याग घडे पण ।
कर्मभूमिचे नव आकर्षण ।।
धर्मव्यवस्था कर्मव्यवस्था ।
व्यवसायात्मक, वर्णव्यवस्था ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आदिनाथ संदेश–

या प्रमाणे प्रजाजनांना प्रथमतःच श्रमाचे विभाजन भगवंतांनी सांगितले व त्यांना भोगातून त्यागजीवनाचे श्रेष्ठत्व पटवून दिले. सत्याची महती दाखविण्यासाठी कवयित्रीने धार्मिक माहात्म्यांची जी जीवनचरित्रे रेखाटली ती उत्कृष्ट वठली आहेत. जीवनांतील संग्रामाला तोंड देण्यासाठी पुण्यपरायण भरतेश्वराचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जीवनयापन करावे. राज्य प्राप्तीच्या तृष्णेतून भरत व बाहुबली यांचे परस्पर युद्ध देखील झाले. चक्रवर्तीसारख्या भरतेश्वराला देखील आपला पराभव सहन करावा लागला हे कवयित्रीने किती रसिकतेने चितारले आहे–

उण्या दुण्याची झुंज लागली ।
श्री भरतेश्वर आणि बाहुबली ।।
राज्यप्रपंच न देइ सुखासी ।
सखे बंधुजन अजि वनवासी ।
जिथे शांतिसुख तिथेच मुक्ती ।
पुण्यपराक्रम वीर विरक्ती ।।

अंती भरतेश्वराने कैलासावर जाऊन आदीश्वरांचे दर्शन घेतले व बाह्य वैभव सोडून अंतर्मुख झाले.

रामायण–रामजीवनदर्शन

रामजीवनाची व्याख्या नव्याने करण्याची गरज नाही. परंतु कवयित्रीने त्यातही आपल्या अभिनव काव्यरसिकतेचा. व आत्मदृष्टीचा प्रत्यय आणून दिला आहे. भारतीय प्राचीन इतिहासामध्ये आदर्श राजाचे, आदर्श पित्याचे, आदर्श पतीचे, आदर्श पत्नीचे आदर्श भावाचे उदाहरण उभे केले तर रामजीवन व रामवंश डोळ्यासमोर आल्याशिवाय राहत नाही. धनुर्धर रामचंद्राने कल्याणकारी राम–राज्याचे लोण भारतास दिले. रविकुलभूषण रामचंद्राचे निरासक्त जीवन, त्याचा त्याग, पित्याच्या आज्ञेसाठी जीवन पणाला लावण्याची तयारी किती मोठी आहे हे या गीतेतून ध्वनित होते.

रावण चरित्रांतील दुसरी बाजू

जगांत जेत्याचे गुण सर्वजणच गातात इतकेच नव्हे तर जेत्याच्या दुर्गुणांची उपेक्षा केली जाते. पराजिताच्या बाबतींत मात्र सर्वत्र अन्याय झालेला आढळून येतो. रावणाच्या ईशभक्ति आदि गुणांचे वर्णन अन्यत्र देखील आढळते. पण ते दोष-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वर्णनाच्या पसाऱ्यात कोठे गडप होते याचा पत्तादेखील लागत नाहीं. इतरांबरोबर रावणाच्या अहंकाराची कलुषित बाजू दाखवून देखील कवयित्रीला रावणाने अनंत-वीर्य केवलीजवळ 'कुठल्याही परिस्थितीत परस्त्रीशी तिच्या इच्छेशिवाय व्यभिचार करणार नाहीं' असा नियम घेतला होता. त्यामुळें कुठल्याही परिस्थितीत सीतेवर बलात्कार करण्याचे विचारदेखील त्याच्या मनांत येत नाहींत. सीतेच्या तोंडी कवयित्रीने केलेले रावणाचे वर्णन पहा—

सुशील कांता बंधु विवेकी ।
पराक्रमी सुत प्रजा न दुःखी ।।
स्वयें आचरी जैन धर्मव्रत ।
मला न केले कधी कलंकित ।।

महाभारत पांडव दर्शन

हा तिसरा प्रसंग कौरव-पाण्डव युद्धाचा होय. महाभारताच्या युद्धाने जगाला नवे संदेश दिले. योग्य न्यायासाठीं पाण्डवांनी आपले जीवन खर्ची घातले. त्यांत युद्ध हे केवळ स्वार्थासाठी जुंपले पण त्याचे वर्णनदेखील कवयित्रीने मोठ्या मार्मिकतेने केले आहे—

कौरव पाण्डव जरी बन्धु ते ।
राज्य वाटुनी मागत होते ।।
समान वाटप तत्त्व खरे पण ।
पांच बन्धु ते शंभर आपण ।।

अशा असन्तुलित परिस्थितीत देखील पाण्डवांनी आपले आत्मकल्याण केले. 'आदिगीते' ला केवळ इतिहास किंवा काव्यग्रंथ म्हणून रचला ही भूमिका दिसत नाहीं. त्यांना समाजासमोर या वेगळेच कांहीं तरी मांडावयाचे आहे.

सती द्रौपदी— मत्स्यवेध पण अर्जुनाने जिंकला व द्रौपदी त्याच्या गळयांत वरमाळा घालण्यास उद्यत होते; इतक्यांत त्याच पणांत अपमानित झालेले इतर क्षत्रिय 'आमच्या उपस्थितीत द्रौपदीसारखें स्त्री रत्न भिक्षुक बळकावतो' ही गोष्ट असह्य होऊन गोंधळ करतात व त्यामुळें वरमाळा तुटून तिची फुलें वाऱ्याने पांचही जणांच्या अंगावर पडतात. त्यामुळें द्रौपदीनें पांचही जणांना वरले असा भ्रम होऊन तोच अपवाद बनतो. वास्तविक ती अर्जुनाचीच एकनिष्ठ पत्नी आहे. भारतीय पतिव्रता स्त्रिया एखाद्याला मनानें वरण्याचा संकल्प केला तरी त्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कसल्याही परिस्थितींत दुसऱ्याला पति मानत नसत. जगन्मान्य पतिव्रतेवरील पंचभर्त्री हा आरोप शुद्ध हास्यास्पद आहे. कवयित्रीला हा आरोप असह्य होऊन त्या म्हणतात—

सती द्रौपदी राजकन्यका । पार्थ तियेचा भ्रतार होता ॥
परि पांचांची म्हणति पत्नि ती । अशुभ अमानुष समाज नीती ॥

तत्त्वदर्शन

आदि 'गीते' च्या प्रारंभीच्या ओळी वाचल्या तर एका प्रसन्न वातावरणातून कवयित्रीने कांही गूढ शोधण्याचा प्रयत्न केला आहे असे दिसते. सर्व आश्रमवासी मुलामुलांनी आचार्यप्रवराना केलेला प्रश्न म्हणजे या आदिगीतेची पार्श्वभूमी होय.

युद्ध ठेपले भारतद्वारी ।
अशान्त जनता गमे बिचारी ॥
सत्य अहिंसा मंत्र कळेना ।
व्यवहाराचे तंत्र कळेना ॥

मानवाच्या जीवनांतील आत्मा—परमात्मा संबंधीच्या निष्ठा व्यवहाराशी तोंड देत असताना आढळतात व भांवावलेला निर्बल मानव याच उत्तरासाठीं कोण्या त्यागी तपस्व्याची प्रार्थना करतो व त्यातून त्याला खरे मार्गदर्शन प्राप्त होते. हिंसा की अहिंसा, शान्ति कीं अशान्ति याचे गूढ व्यक्त करण्याचा स्तुत्य प्रयत्न या काव्यांत आढळतो. अहिंसा शस्त्राची धार किती तीक्ष्ण, परिणामकारी असते हे पण सांगितले. आदिगीतेच्या अमर तत्त्वज्ञानाची स्फूर्ती ही संघर्षातून प्रस्फुटित झालेली आहे असें वाटते. कवयित्रीच्या शब्दांत—

आत्मशक्तिचा प्रभाव तेथें ।
अनन्तज्ञानी अनन्त चरिते ॥
अनन्तात त्या नित सौंदर्य।
अपूर्वविक्रम अपूर्व वीर्य ॥

अशावेळी आत्मविचार जागृत करून देऊन त्याची प्रतीती करविणे हे उपादेय आहे. आत्मजागृतीच्या अथांग सरितेत बुडी मारली की जीवनातील गूढ व गहन सत्ये कळूं लागतात. सर्वज्ञ त्रिकालदर्शी आदिप्रभूंनी आपल्या दिव्यध्वनीतून हे सत्य सांगितले आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जीव-अजीव तत्त्व

जैन तत्त्वज्ञानाप्रमाणे जीव व अजीव ही दोन तत्त्वे विश्वाला व्यापून आहेत. चराचर सृष्टी म्हणजे ह्या दोहोंचा प्रपञ्च ही कवीची उक्ती आहे. आदीश्वरांच्या प्रयोगशाळेंत चेतना व अचेतना यांच्या संघर्षाची वीजे सतत तपासली जातात. दुःखाचे मूळ कारण हे यांतील भेदासंबंधी अज्ञान हे होय. संसार व मोक्ष या दोन अवस्थेत मानवाचे अधिष्ठान असते. संसारी जीवन जन्म, जरा, मृत्यूने ग्रासले आहे. कधी पापपुण्याच्या आश्रयाने दुःखद व सुखद फळे तो अनुभवतो, म्हणून कवीची तळमळ ही की परमात्म्याचे प्रेम (स्वशक्तीची उपासना) आत्मजागृतीही निर्माण झाली पाहिजे.

परमात्म्याचे प्रेम जीवनी ।
म्हणुन जिवाला नवजीवन जनि ।।
पुण्यबलाने पाप नासते ।
' घरोघरी चैतन्य हासते ।।

संपूर्ण सृष्टीचे विश्लेषण पुढे द्रव्यांचे रुपाने प्रगट केले आहे. जीव व पांच अजीव. (पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल) संपूर्ण जड विश्व म्हणजे षड्-द्रव्याचा खेळ सांगितला आहे. त्यांचे स्वरुपही लक्षात घेण्यासारखे आहे. ' सत् ' या एका शब्दाने त्यांची कल्पना येते. उत्पाद, व्यय' ध्रौव्य या त्रिविध चाकोरीतच द्रव्य स्थिर असते. परिवर्तन अटळ आहे. पण कुणाचे ? पर्यायांचे–अवस्थेचे, माणूस कपडे बदलतो व नवे घालतो. पुढे जाऊन असे म्हटले की तो शरीर पण बदलतो व मृत्यूनंतर नवे ग्रहण करतो. येथे उत्पत्ति व व्यय आहे पण विनाशी तत्त्वाचा. अविनाशी आत्मा तर स्थिर, चिरंतन, अजर, अमर, असाच आहे. त्या अविनाशी अव्यय तत्त्वाची जाणीव ही सम्यग्दृष्टि, व तेच सम्यग्दर्शन. हे कवयित्रीने अत्यंत सरसपद्धतीने सांगून आदिगीतेतील तात्त्विक विचार सोपे केले आहेत. जीवाचे कर्तृत्व भोक्तृत्व पण मार्मिकपणें विशद केले आहे.

अहिंसा-दृष्टी–

अहिंसेच्या तत्त्वज्ञानासंबंधी कवयित्रीने आपले उत्स्फूर्त विचार अनेक ठिकाणी वेगवेगळया भूमिकेतून मांडले आहेत. ही निर्भय अशी शक्ती आहे. अहिंसेने ज्ञानी माणसे शत्यावर विजय मिळवितात. हिंसा पाप तर अहिंसा सदाचार आहे. जैन धर्मात हिंसा दोन तऱ्हेची सांगितली आहे. सूक्ष्म व स्थूल, मुनींची व श्रावकांची. महान यतीश्वर महाव्रती असतात. एकेंद्रियजीववध पण ते टाळतात, पण गृहस्थ मात्र पापाश्रित असल्यामुळे द्वीन्द्रियादिकांच्या हिंसेचा त्याग करतो. मानव जीवनात

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हिंसा–अहिंसेचा सतत संघर्ष चालू असतो. मानव समाजाला युद्धाचे मोठे आघात पण पोहोंचतात. आपणाजवळ शत्रुपक्ष निर्माण होतो. राज्यासाठी, वैभवासाठी मानव हिंसा हे शस्त्र वापरतो. पण यावर आदिगीतेत मौलिक विचार व्यक्त झाले आहेत. आत्मदृष्टी ठेवून प्रजेच्या कल्याणार्थ मानवतेच्या सुखासाठी अनासक्त बुद्धीने अन्यायाच्या प्रतिकारार्थ धर्म संकटाच्या निवारणार्थ, स्त्री अत्याचाराच्या निराकरणार्थ व परचक्राच्या नाशार्थ हे गृहस्थाचे, राजाचे कर्तव्य ठरते. प्राणिवध अर्थात हिंसा झाली तरी तो धर्म ठरतो. तोच क्षात्रधर्म व तीच अहिंसा. ध्येयवादी माणसे या अहिंसाशस्त्राचे वेगळे अवलंबन करून राष्ट्राचे संरक्षण करतात. अहिंसा व सत्य वेगळे नाहींत. जे सत्य नाही त्यात अहिंसा असूच शकत नाही.

सत्य जीवातील भाव फुलोरा ।
सत्य जीवातील प्रकाश सारा ।।
वस्तु स्वभावे अनन्त असती ।
परि सत्याने ते संयम शोधती ।।

एकूण तत्त्वरसिकांना आव्हान देणारी अशी रसाळ वाणी आदिगीतेत ठिकठिकाणी प्रत्ययास येते.

'आदिगीता' हा स्वच्छंद काव्य फल पंक्तीने बहरलेला अशोकवृक्ष आहे. त्यांचा काव्यदृष्टीने विचार केला तर प्रासादिक सुगम व सरस असा आढळेल. आत्मजागृती करवून मानवाला अन्तिम सत्यापर्यंत नेणे हे त्याचे लक्ष्य आहे. आदिगीतेतील रस शान्त आहे. कवयित्रीची करुणार्द्र, हृद्य व विश्वकल्याणाची तळमळ सर्वत्र व्याप्त होत आहे. म्हणून काव्यदृष्टचा भावपक्ष व कलापक्ष हा चांगला झाला आहे. गहन विचारांची मांडणी ही जनसामान्यांना कळेल अशी आहे. म्हणून आदिगीता हे काव्यरत्न भावाभिव्यक्तीच्या दृष्टीने श्रेष्ठ असे झाले आहे. निश्चितच कवयित्रीच्या या उत्स्फूर्त प्रयासास संपूर्ण महाराष्ट्रांतच नव्हे तर पर प्रान्तात देखील प्रतिसाद मिळेल व त्याची अन्य भाषेतही पण भाषान्तरे होतील अशी खात्री आहे.

लेखिकेचे महाराष्ट्रांतील स्त्री–शिक्षणविषयक कार्य श्री. महर्षी कर्वे यांच्यासारखे नेत्रदीपक आहे. त्या संचालन करीत असलेल्या श्राविका महिला संस्थेचे विविध संस्थेत रुपांतर होऊन ते एक नगरच बनले आहे. तसेच त्यांची सामाजिक व देशसेवादेखील उल्लेखनीय आहे. आजपर्यंत प्रकाशित झालेले त्यांचे ग्रंथ नजरेत भरण्याजोगे आहेत–

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१) धवल (प्राकृत भाषेतील ग्रंथाचे १००० श्लोक प्रमाण हिंदी भाषांतर)
२) ज्ञानगीता (उपनिषदासारखा चिंतनपर स्वतंत्र अमोल ग्रंथ)
३) हृद्गन्ध (गीतांजली सदृश गद्यकाव्य)
४) भावपल्लवी (भगवंताचे स्तवन)
५) भावगीता (श्री कुंदकुंदाचार्यांच्या नियमसार ग्रंथाचे भाषांतर)
६) महापुराण (आदिपुराणांतील मनोरंजक बोधप्रद कथा)
७) रामायण (जैनधर्मीय दृष्टीकोनातून लिहिलेले श्रीराम चरित्र)
८) समयसार (श्री कुंदकुंदाचार्यांच्या समयसाराचे चिंतन)
९) सुवर्णरेखा (गद्य काव्य)

कविवर्या पं. सुमतीबाई शहा यांनी हा मौलिक ग्रंथ समाजास दिला म्हणून त्यांचे अभिनंदन करावे तितके थोडेच आहे. त्यांच्या विशाल साहित्य सेवेकडे पाहिल्यास कोणाही गुणग्राही माणसाचे मस्तक झुकल्याशिवाय राहणार नाही. महाभारत (मराठी) व सुमतिचित्रे (आत्मचरित्र) ही दोन पुस्तके सुद्धा त्या लिहीत आहेत. लेखिकेला स्वास्थ्य व दीर्घायुष्य लाभून उत्तरोत्तर अशीच साहित्य सेवा घडो आणि राष्ट्रीय पातळीवर पण अशा मौलिक काव्यरत्नांचे स्वागत होवो.

आदिगीतेचा हा अमृतौघ धारवाडपर्यंत धारावाहीपणाने 'साधनकेरीतील' माझ्या 'श्रीमाता' घरापर्यंत आला. तेथे आत्मालापाला कळा आली. सुखसंवाद झाला. या आदिगीतेच्या अभिनव ब्रम्हवादिनी आत्रेयीला मी सुहृद्भावाने प्रणाम करून प्रस्तावना संपवितो.

● ● ●

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अमरभारती आदिगीता

– कवि कुंजविहारी, सोलापूर

पंडिता सुमतीबाई शहा या सोलापुरातील नेमचंद देवचंद निंवरगीकरांच्या सुसंस्कारसंपन्न धार्मिक घराण्यांत जन्मल्या. त्यांच्या मातोश्री श्री. सौ. हिराबाई ह्याही सुसंस्कारित होत्या. पिढीजात सुसंस्कारावरोवरच नवीन ज्ञान दृष्टी ही पण त्यांना लाभली आहे. त्यांचे काका श्री. रावसाहेब निंबरगीकर यांच्याशी होत असलेल्या सततच्या तत्त्वचर्चेने त्यांची श्रद्धा ही अंधश्रद्धा न रहाता ती एक डोळस श्रद्धा बनली. हळुहळू श्री. रावसाहेबांच्याशी झालेल्या चर्चेचें साररूपाने पद्यात्मक ग्रथनही करणेस त्यांनी सुरवात केली.

एके दिवशी मी सहजगत्या तेथे गेलो असता पंडिता सुमतीबाईंच्यांतील हा सुप्त गुण प्रत्यक्ष पहावयास मिळाला. गद्यलेखन त्या करत असत हे मला माहीत होते. पण गद्यापेक्षा पद्यांचा सामान्य जनतेच्या मनावर चांगला आणि लवकर परिणाम घडून येतो. दुर्बोध तत्त्वज्ञान जर प्रासादिक पद्यांत जनतेसमोर मांडले तर त्याचा अधिक उपयोग होतो हे त्यांना मी सांगितले. बाईंनाही ते पटले. तत्त्वे जुनीच पण नवीन दृष्टीकोनातून मांडल्याने जनमनावर त्यांचा चांगला परिणाम होतो हे त्यांना उमगले. त्या दृष्टीने त्यांनी जिद्दीने कार्यास सुरुवात केली. त्या प्रयत्नांचेच फळ म्हणजे ही आदिगीता होय.

भारतीय धर्मप्रणेत्यांचे तत्त्वज्ञान अमर आहे. श्रीमद्भगवद्गीतेत श्रीकृष्णांनी म्हटल्याप्रमाणें गीतेपूर्वीही ते तत्त्वज्ञान अनेकांनी अनेकांना सांगितले आहे. तसेच या आदिगीतेतील तत्त्वज्ञानसुद्धां अनादिकालीनच आहे. म्हणूनच त्याला आदिगीता हे नामाभिधान देखील सार्थक वाटते.

आदिगीता हे लेखिकेचे लिखाण असले तरी त्याबरोबरच तें लेखिकेने संकल्पिलेल्या एका सांस्कृतिक कार्याचे ते संकलन आणि समालोचनही आहे. लेखिकेचा सांस्कृतिक सत्य संकल्प हा मुख्यत: विद्यमान लोकशाही स्वराज्यसंपन्न भारतातील नागरिक जीवनात निदान यापुढे तरी क्रमश: वाढीस लागावयास पाहिजे असलेल्या सत्य शिव आणि सुंदर अशा सहजीवन शिष्टाचार कल्पनेवर आधारलेला आहे. काव्यरसाच्या आनंदाबरोबर वाचकांना सहजीवन व शिष्टाचाराचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लाभ निश्चित घडेल यांत शंका नाही. पंडिता सुमतिबाईंच्या या अमोल वृत्तीनें महाराष्ट्र सारस्वत खात्रीने भाग्यवान ठरणार आहे यांत शंका नाही. त्यांच्या काव्यसाधनेने मराठी काव्य खासच उंचावले आहे.

या अनमोल साहित्य कृतीबद्दल त्यांचे मी अभिनंदन करतो.

• • •

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री आदिगीता :
(एक रसग्रहण)

– डॉ. वि. म. कुलकर्णी

तीन काल तरि एक प्रचीती ।
त्रिकालज्ञ मुनि मार्ग दाविती ।।

सोलापूर येथील सुविख्यात लेखिका व श्राविकाश्रम संस्थेच्या प्रमुख पंडिता सुमतीबाई शहा या त्यांच्या अविरत कार्यकर्तृत्वाबद्दल व अविचल धर्मसाधनेबद्दल सर्वदूर प्रसिद्ध आहेत. आतापावेतो जैन धर्मासंबंधीचे विपुल लेखन त्यांनी केले आहे. तसेच सदाचाराचा व समुन्नतीचा मार्ग दाखविणारी सुवचने असलेली–ध्येय–साधनेला उपकारक अशी– अनेक पुस्तकेही त्यांनी सर्वासमोर ठेवली आहेत.

एकनिष्ठेने कार्य करणाऱ्या व्यक्तीला जे श्रेय लाभावे ते श्राविकाश्रमाच्या रम्य परिसरात वास्तव्य करणाऱ्या पंडिता सुमतीबाईना केव्हाच लाभले आहे. समाजातील केवळ स्वधर्मीयांवरच त्यांची कल्याणदृष्टी खिळून राहिली आहे असे नसून मुक्त हस्ताने विद्यादान करावे–करवावे गुणीजनांना प्रोत्साहन द्यावे व समाज-मंदिरात सद्भावनेचा दीप तेवत ठेवावा हेही कार्य त्यांनी सतत केले आहे.

प्रस्तुतची आदिगीता म्हणजे पंडिता सुमतीबाई यांच्या आजपर्यंतच्या चिंतनिकेचे काव्यरूप फल आहे असे म्हणता येईल.

श्री आदिगीता हा प्रासादिक स्वरूपाचा एक काव्यग्रंथ आहे. त्याची शैली प्रसादगुणाने युक्त आहेच परंतु त्यातील तत्त्वविचारही अतिशय सुगम करून मांडण्यात आला आहे. "पादाकुलक" यासारखे धावत्या चालीचे वृत्त घेतल्यामुळे विवेचनाचा ओघ कुठेही खंडित होत नाही.

या काव्याचे एकूण १४ खंड आहेत व तत्त्वज्ञान आणि काव्यमयता याचा मनोज्ञ संगम सर्वत्र साधला गेला आहे.

या दीर्घकाव्याची सुरुवात मोठी नाटचमय आहे. एका विद्याप्रदान करणाऱ्या आश्रमाच्या प्रसन्न व पवित्र वातावरणात या कथेचा प्रारंभ होतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सभामंडप सजविलेला होता. गुरुजन–सज्जन व धर्मकर्मरत मंडळी एकत्र आली होती. मुलामुलींनीही तो परिसर फुलारला होता. अशावेळी एक थोर पुण्य-पुरुष त्या आश्रमात प्रवेश करता झाला. त्याच्या दर्शनाने सर्वांना फार आनंद झाला व त्यांनी त्या सत्पुरुषास एक प्रश्न विचारला की– – नित्य धडपडणाऱ्या मानवाला शांतिसुख का मिळत नाही, सत्य-अहिंसेचा मंत्र लोकांना का कळत नाही व विवेकसुंदर दृष्टी तरी कोणती, की जी मिळाल्यास काही सुखसमाधा-नाची प्राप्ती होईल ?

हा मूलगामी प्रश्न ऐकून थोर अतिथी पूज्यपाद श्री आचार्य जे उत्तर देतात ते म्हणजेच ही सर्व आदिगीता होय. या गीतेत अनुषंगाने श्रीवृषभनाथांची व भरतेश्वराची जीवनकथा कथन करण्यात आलेली आहे. दुसऱ्या खंडामध्यें चक्रवर्ती भरतेशाने केलेल्या दिग्विजयाची हकीकत मार्मिकपणें सांगितली आहे व शेवटी, मनात असुखी असलेला भरतेश, कैलासावर आधीच जाऊन राहिलेल्या आपल्या पित्याकडे उपदेशासाठी गेला इ. वृत्त कथन केलेले आहे.

प्रसंग कोणताही असो त्यात सूक्ष्म विवेकदृष्टीचा धागा सदैव अनुस्यूत अस-लेला दिसतो हेच या आदिगीतेचे प्रमुख वैशिष्टय होय. भरतेश्वर व बाहुबली या बंधूंची झुंज लागली त्याचे वर्णन करतांना कवयित्रीने म्हटले आहे–

एक व्यक्तिची स्वतंत्रता ती
साम्राज्याची दुजास प्रीती
स्वतंत्र वृत्ति हार जाइना
परी दुजाची हार साहिना
जिथे पराक्रम तिथे प्रेम ते
ब्रम्हभावना तिथेच स्फुरते !

चक्रवर्ती भरतेश हा सहा खंडांवर विजय मिळवून आदिप्रभूंच्या दर्शनासाठी कैलासावर गेला या कथाभागाने तिसऱ्या खंडाची सुरुवात होते– नसे शांति मज दिग्विजयात। मिळो सौख्य मज आत्मजयात–असे भरतेश म्हणतो. या आत्म-जयाची साधना कशी घडते याचे मार्मिक विवेचन येथे आढळून येते—

नरजन्माचे सार्थक व्हावे
असे वाटते जया स्वभावे
स्वभावात त्या स्फुरे जागृती
जागृतीत त्या आत्मप्रचीती

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जरी प्रचीती हवी जिवाला
अभ्यासाचा मार्ग चांगला

इत्यादि वचने मोठीच उद्‌बोधक आहेत. धर्माचे अस्तित्व व महत्त्व चालू युगात लोप पावते की काय अशी शंका निर्माण होऊ लागली आहे. परंतु कवयित्री म्हणते की–' शुभ संस्कारे धर्म प्रगटतो । मलीन अंतर पवित्र करतो . . . . ' शुभ संस्कारांची, धर्ममूल्यांची आज गरज आहे. ही मूल्ये आजच्या बोलपट–चित्रपटांच्या युगात कोठून कशी जिवंत राहतील याची भीती वाटते. आदिगीता हा ग्रंथ म्हणजे शुभसंस्कारांचे महत्त्व गाणारी एक उज्ज्वल गाथाच आहे असे म्हणण्यास हरकत नाही. हातून शुभ कर्मे घडावी व अंतःकरणात आपल्या इष्ट देवाचे गुणगायन सदासर्वकाळ होत रहावे हा पवित्र संदेश ही आदिगीता देत आहे . . . ' जगा, जगू द्या, धर्म जागवा । तरीच मुक्ती मिळे मानवा ।। हे आदिगीतेचे मुख्य सूत्र आहे व या सूत्रातील भावार्थाची आज हरेक व्यक्तीला व समाजालाही अत्यंत आवश्यकता आहे.

बहुतेक सर्व धर्मपंथात संसारचक्रापासून अलिप्त असे थोर, त्यागी मुनिवर्य व संसारात राहून गृहस्थधर्मांचे पालन करणारे संसारी मन असे दोन वर्ग सांगितलेले आढळतात. या आदिगीतेतही महाव्रती महात्मे, मुनिवर्य यांची वैशिष्ठ्ये सांगण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे संसारजनांनी सदाचाराचे व अहिंसेचे अवलंबन कसे करावे हेही यथार्थरीत्या सांगितले आहे. ब्रह्मचर्यव्रताचेही मोठे मार्मिक विवरण पृ. ६८।६९ वर आढळते ते अभ्यासकांनी–साधकांनी मुळातूनच वाचण्याजोगे आहे.

गृहस्थाने चतुर्विध दान कसे करावे व आपला जीव परमार्थाला पात्र कसा करून घ्यावा हे विवेचनही काव्यमय भाषेत अवतरले आहे. ' गृहस्थ म्हणजे श्रावकमेळा । क्रमे साध्य करि परमार्थाला ।। प्रपंच म्हणजे परमार्थाची । प्रयोगशाळा गमे सदाची ' हा अगदी वास्तव व यथार्थ दृष्टिकोण येथे स्वीकारण्यात आलेला दिसतो.

या काव्यामधील तत्त्वचिंतन जैनधर्मातील तत्त्वप्रणालीचा हळुवार उलगडा करून दाखविणारे आहे व सारा आध्यात्मिक विषय असला तरी जटिल मीमांसा करून वाचकास चर्चेच्या आडरानात नेण्याचे टाळले आहे ते इष्टच वाटते.

सातव्या खंडात आदिप्रभूंचे धर्मप्रवचन संपते. सम्यक्‌दर्शन, सम्यक्‌ज्ञान आणि सम्यक्‌चारित्र्य या संबंधीचे येथील विवेचन मोठेच मनोज्ञ उतरले आहे. भगवद्‌गीतेत श्रीकृष्णांच्या अमृतवाणीने अर्जुनाचा मोह नाहीसा झाला त्याप्रमाणे येथेही आदि-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रभूंच्या उपदेशामुळे भरतेशाच्या मनातील किल्मिष नाहीसे झाले व तो मनाने विरक्त व शांत वृत्तीचा बनला! जे जगाचा संसार आपला म्हणतात आणि 'स्व' ला विसरतात त्यांना स्वयंप्रभा जाणवते, शांति व मुक्ती यांची प्राप्ति होते हेच भरतेशाच्या चरित्रगुणगायनाचे सार म्हणता येईल.

आदिनाथांची गीता समाप्त झाल्यावर या काव्यात आणखी एक पूर्वपरंपरा सांगणारा रमणीय अध्याय किंवा खंड आहे, तो म्हणजे 'श्रीरामाची अमर कहाणी' कथन करणारा आठवा खंड होय. रामकथा आतापावेतो अनेक लहानमोठ्या कवींनी आपापल्या परीने आळविलेली आहे व या कथेची गोडी तशीच अवीट आहे ! प्रस्तुतच्या रामकथेमध्ये नेहमीचे कथाप्रसंग नुसते निवेदन केलेले नसून 'कालगतीवर मात कराया। जीव जन्मला असे जगी या ।।' असा अध्यात्मिक आशावाद बाळगून हे सर्व लेखन कवयित्रीच्या लेखणीतून अवतरले आहे असे दिसते.

जैन जितेंद्रिय जगात रविकुल
जगी तयाचे भविष्य उज्ज्वल

ही तिची श्रद्धा दिसते व अहंकारी दुराचारी रावणाचा रामाने कसा निःपात केला याची कथा सर्वांना आवडेल अशीच उदात्त रमणीय उतरली आहे. रावणाचा सात्विक प्रवृत्तीचा भाऊ बिभीषण यांचे व्यक्तिचित्र फार चांगले रेखाटले गेले आहे.

रामकथेवरील जणू भाष्यच असा नववा खंड अध्यात्ममार्गाच्या वाटसरूंना रोचक वाटेल असा आहे. 'गुणसुमनांचा गंध' म्हणजे राम आणि आज आम्हाला नवे रामराज्य हवे अशी सदिच्छाही येथे व्यक्त केलेली आहे. रामकथेप्रमाणे भारतीयांच्या दुसऱ्या एका आवडत्या महाग्रंथाचे– महाभारताचे रहस्यही या आदि–गीतेत अनुषंगाने रंगविलेले आढळते. कौरवपांडवांच्या महाविलक्षण वैराचा कव–यित्रीने मागोवा घेतला आहे व–

कर्तव्याची प्रखर प्रतिष्ठा ।
समाजसन्मुख स्वधर्मनिष्ठा ।।

अशासारख्या चरणातून पांडवांच्या चरित्राचे मर्म स्पष्ट केले आहे. जीवन–श्रद्धा ज्यामुळे मनामध्ये बळावते असेच हे पांडवगुणगायन आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शेवटच्या काही खंडातून 'दान' व 'तप' यांचे मोठेपण सांगणारी पण हिंसा-युक्त 'यज्ञा'चा त्याग करा असे म्हणणारी भगवान महावीरांची विचार-सरणीही सुस्पष्ट रीतीने सांगितली आहे. शेवटच्या समारोपाच्या दोन खंडात सत्य–शिव–सुंदर या तत्त्वत्रयीचे वैशिष्ट्यच सांगणारी व आत्मशांतीचे मर्म उलगडणारी वचने ग्रथित झालेली आहेत.

आदिगीता हे अभ्यासू रीतीने व साधकाच्या मनोवृत्तीने मननचिंतन करावे अशा रुपाचे धर्मकाव्य आहे. त्यात जैन धर्माची प्रमुख तत्त्वे व विचारसरणी आढळते हे खरेच; परंतु अनुषंगाने आदर्श जीवनश्रद्धेचा अवलंब कसा करावा याचे जे विवरण येथे आले आहे. तेही सर्वांना उद्‌बोधक वाटावे असेच आहे.

सुंदर सुंदर सुभाषितांची पखरण या काव्यात सर्वत्र झाली आहे व आदिनाथ, महावीर, राम व पांडववीर यांची चरित्रपुष्पेही येथे सुगंधद्रव्ये उधळीत उमलून राहिली आहेत.

पंडिता सुमतीबाई शहा यांचे जीवनकार्य सामाजिक व धार्मिक दृष्टीने भूषणभूत व आदरणीय असेच घडले आहे. आदिगीतेच्या रूपाने त्यांनी स्वतःच्या जीवनात अनुसरलेली तत्त्वेच काव्यमय शैलीत सर्वांसमोर ठेविली आहेत व याबद्दल त्या धन्यवादास पात्र आहेत.

तनु त्यागिता कीर्ती उरावी ।
अंधतमाची भीति नुरावी ॥

• • •

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनुक्रमणिका

खण्ड पहिला – भगवान आदिनाथ पृ. १ – १७

१ आदिप्रभुवन्दन २ आश्रम परिसर वर्णन ३ आचार्य आगमन ४ युद्ध निवारण शंका ५ भेदाभेद विवेचन ६ आत्म वर्णन ७ त्रिकालज्ञाचे मार्गदर्शन ८ आदिप्रभुजन्मवर्णन ९ मरु देवीचे स्वप्नदर्शन १० स्वप्नफल वर्णन ११ वृषभनाथ वर्णन १२ विवाह १३ राज्यसभा १४ परिवार वर्णन १५ कैलासावर तपस्या १६ अर्हत्पदप्राप्ति.

खण्ड दुसरा – तत्त्ववर्णन – भरत चक्रवर्ति १८ – ३६

१ जन्ममृत्युतत्त्व २ चक्रवर्ती भरताचे वर्णन ३ प्रजाराज्यव्यवस्था ४ सुदर्शनचक्रशासनवर्णन ५ भरताचा जन्म सोहळा ६ धनधान्यादि वैभव वर्णन ७ सुखी राज्य वर्णन ८ दुष्टदमन वर्णन ९ तत्कालीन समाज वर्णन १० चक्रवर्तीपदाचे वर्णन ११ राज्ययंत्रणा वर्णन १२ पित्याला भेटण्यासाठी कैलासावर प्रयाण.

खण्ड तिसरा – आदिनाथांचा भरताला उपदेश ३७ – ४८

१ षट्खण्डविजय २ कैलासाचे प्राकृतिक वर्णन ३ आदिप्रभूंचे दर्शन माहात्म्य वर्णन ४ शान्ति-अशान्ति, पुण्य-पाप, पूर्ण-अपूर्ण वर्णन ५ भरतेशाने केलेली स्तुति ६ आदिप्रभूंच्या प्रवचन परिसराचे वर्णन ७ प्रभूची अमृतवाणी ८ शुभ संस्कार वर्णन ९ नर देहाचे माहात्म्य १० व्रताचार, शुद्धाचार माहात्म्य वर्णन ११ भक्ति वर्णन १२ सद्गुण माहात्म्य वर्णन १३ श्रावककर्म वर्णन.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खण्ड चवथा – तत्त्वदर्शन ४९ – ५८

१ षट् द्रव्य वर्णन २ जीव-अजीव तत्त्व ३ सामान्य-विशेष गुणवर्णन ४ परिवर्तन चक्र ५ सत् वर्णन ६ द्रव्य-गुण-पर्याय वर्णन ७ मूर्तिक-अमूर्तिक वर्णन ८ विनाशी-अविनाशी तत्त्व ९ अनेकान्त १० सम्यग्दर्शन-सम्यग्ज्ञान-सम्यक् चारित्र वर्णन ११ समता-सर्वोदयतीर्थमीमांसा १२ धर्म मुक्तीचा राजमार्ग.

खण्ड पांचवा – पांच-व्रते ५९ – ७३

१ अहिंसेची पार्श्वभूमी २ अहिंसा स्वरूप ३ अहिंसा प्रकार ४ अहिंसा पक्ष-विपक्ष ५ गृहस्थ-अनगार-अहिंसा ६ सूक्ष्म वर्णन ७ सत्यधर्म वर्णन ८ सत्यधर्म माहात्म्य-मंगल-सौंदर्यस्थान ९ अनन्त सत्यशक्ति १० अचौर्य वर्णन ११ ब्रह्मचर्य वर्णन १२ अपरिग्रह वर्णन १३ चतुर्विधदान-नवधा भक्ति वर्णन १४ सुखाचा मार्ग.

खण्ड सहावा – संसार यात्रा-दर्शन ७४ – ८६

१ वीतराग दर्शन २ अठरा दोष वर्णन ३ दुःखाचे मूळ ४ जीव वर्णन ५ एकेन्द्रिय वर्णन ६ त्रसजीव दुःख वर्णन ७ संज्ञी जीव वर्णन ८ त्रिविध जीवराशी ९ नरक वर्णन १० स्वर्ग वर्णन ११ जड अजड वर्णन १२ वैराग्य माहात्म्य १३ शुभाशुभबंध वर्णन.

खण्ड सातवा – आत्म-दर्शन ८७ – १०४

१ जीवात्मा-परमात्मा-अन्तरात्मा स्वरूप २ जीव-जड संबंध वर्णन ३ सप्ततत्त्व-स्वरूप व कार्य ४ मिथ्यात्व-कुदेव, कुगुरु, कुशास्त्र-परिणाम ५ व्यवहार निश्चय मार्ग ६ सम्यग्दर्शन स्वरूप ७ अष्टकर्म परिणाम ८ कर्मबन्ध वर्णन ९ मिथ्यादर्शन स्वरूप १० जिनवाणी महिमा ११ पांच ज्ञाने-स्वरूप व कार्य १२ केवलज्ञान महिमा १३ बहिरात्मा, अन्तरात्मा व परमात्मा स्वरूप १४ भरत बाहुबली मुक्ति चर्चा १५ सिद्ध स्वरूप.

खण्ड आठवा – रामायण १ १०५ – १४०

१ रामचरित पृष्ठभूमी २ रामाची अमर कहाणी ३ दशरथ परिवार वर्णन ४ राम जन्म वर्णन ५ राम जीवनमहिमा ६ राम – सीता – विवाह जीवन ७ रामाचा राज्यत्याग ८ कालगतिवर्णन ९ राम सीता वनवास वर्णन १० भरतराज्यवर्णन ११ रविकुल वर्णन १२ वनवास काल

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१३ रावण अहंकार वर्णन १४ कपटी रावणाचे जघन्य कृत्य सीता हरण १५ रामाचा सीता शोध १६ रामदूत हनुमानाचे वर्णन १७ हनुमान गर्जना १८ लंकेशाचे वर्णन १९ राम विजय २० सीता परीक्षा २१ रावण वध वर्णन २२ राम राज्य वर्णन २३ अयोध्येचे सुखमय राज्य वर्णन २४ रामजीवनाची धन्यता.

खण्ड नववा – रामायण २ १४१ – १६६

१ रामाची निरासक्ति २ लोकसंग्रह वृत्ती ३ गुणभक्ती महिमा ४ काल महिमा ५ परमात्म्याचे स्वरुप ६ ज्ञान – भक्ति – वैराग्य – वर्णन ७ स्वपर भेद विवेक ८ हिंसा अहिंसा धर्म ९ शरीर दश प्राण १० कर्म कर्मफल ११ ज्ञानलाभ वर्णन १२ जीवनस्वरूप १३ जीवाच्या अधोगतीचे कारण १४ उत्तम क्षमादि दशधर्म वर्णन १५ शाश्वत जीवन.

खण्ड दहावा – महाभारत १ १६७ -- १९०

१ त्याग भोग महिमा २ जया – जय महिमा ३ कौरव-पाण्डव युद्ध ४ पाण्डव सेना वर्णन ५ कौरव सेना वर्णन ६ पांडवांचा आत्मशक्तिप्रभाव ७ कौरवांचा अनिष्ट हेतु ८ पाण्डवद्यूतपराजय ९ सती द्रौपदी हरण १० पाण्डवांच्या दुर्दशेचे वर्णन ११ पाण्डव वनवास वर्णन १२ पाण्डवांचा साधु समागम १३ राज्यासाठी संघर्ष १४ युद्धाचे परिणाम १५ पाण्डव-विजय.

खण्ड अकरावा – महाभारत २ १९१ – २१०

१ श्रीकृष्ण शिष्टाई २ नेमिनाथ वर्णन ३ नेमिनाथ – विवाह – वैराग्य ४ पशुवध घृणा ५ मुनिदीक्षा ग्रहण ६ गिरनार पर्वतावर तप व पाण्डवांशी भेट ७ मुनींचा उपदेश ८ राजुलमती दीक्षा – ग्रहण ९ अहंभावनेचा त्याग, अक्षय सुख वर्णन १० योग वर्णन ११ दया धर्म १२ श्रद्धाधर्म माहात्म्य १३ नरजन्ममाहात्म्य १४ इन्द्रिय संयम वर्णन १५ भेदविज्ञान १६ शाश्वत अशाश्वत वर्णन १७ निर्विकल्प समाधिप्राप्ति.

खण्ड बारावा – भगवान – महावीर २११ – २२४

१ चतुर्विंशति तीर्थंकर वन्दन २ महावीर जन्म-काल-समाज वर्णन ३ महावीरांचे माता-पिता-राज्य वर्णन ४ जन्मोत्सव वर्णन ५ भ. महावीरांचे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बाल विरक्त जीवन ६ यज्ञयाग वर्णन ७ हिंसाचार वर्णन ८ महावीर धर्म-प्रतिपादन ९ अहिंसा महत्ता १० धर्मप्रवर्तनचक्र ११ महावीर विहार १२ उपदेश १३ मोक्ष प्राप्ति.

खण्ड तेरावा – समारोप २२५ – २३२

१ हिंसा अहिंसा रहस्य २ संगति माहात्म्य ३ भरत बाहुबली कथा सार ४ राम कथासार ५ पांडव कथासार.

खण्ड चवदावा – २३३ – २३६

विश्वशांति संदेश.

● ●

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खंड पहिला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१ आदि प्रभूची अमर भारती ।
सुवंद्य गीता अखंड स्फूर्ती ।।

दे नवजीवन दिव्य प्रेरणा ।
चिरंजीव करि विश्व जीवना ।।

२ आश्रमवासी मुलामुलींनी ।
आणि तयांच्या माय पित्यांनी ।।

फुलारला हा प्रसन्न परिसर ।
गमे अंगणीं जन-रत्नाकर ।।

माननीय ते गुरुजन सज्जन ।
ज्ञानवंत धनि रसिक महाजन ।।

धर्म कर्मरत वृद्ध तरुण ते ।
बहुजन शिक्षण कार्य कुशल ते ।।

कार्य कुशलता योग सुमंगल ।
करित जिवाचे भविष्य उज्जल ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

३ लता पल्लवे मंडप नटला ।
वाद्यवृंद करि साथ तयाला ॥

टाळ्यांचा हो गजर ऐकुनी ।
मंडप घुमला जय नादानी ॥

कुणी महात्मा पुण्य पुरुष तो ।
सभा मंडपी प्रवेश करितो ॥

४ सत्पुरुषाचे घेउनि दर्शन ।
प्रमुदित झाले सर्व सभाजन ॥

कुतूहलाने प्रश्न टाकिला ।
पूज्यपाद श्री आचार्याला ॥

५ युद्ध ठेपले भारत द्वारीं ।
अशांत जनता गमे बिचारी ॥

सत्य अहिंसा मंत्र कळेना ।
व्यवहाराचे तंत्र कळेना ॥

विश्व भुकेले शांति सुखास्तव ।
आणि मानवी स्वातंत्र्यास्तव ॥

विवेक सुंदर दृष्टि कोणती ।
दिव्य गुणांची सृष्टि कोणती ॥

अशांतता कां जनी जीवनीं ।
उंच भराऱ्या जरि रात्रंदिनि ॥

वरुनि खालती खालुनि वरती ।
परि न जगाला मुळि विश्रांती ॥

अगणित शंका उठति अंतरीं ।
मार्गदर्शि पण हवा कुणी तरि ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तुझ्या कृपेने पूर्ण मनीषा ।
आज होउदे प्रकाश पुरुषा ॥

६ सत्पुरुषाची विवेक वाणी ।
वदे प्रीतिने प्रश्न ऐकुनी ॥

धैर्य असावे सदैव अंगीं ।
प्रकाशते मति हृदय तरंगीं ॥

कुशल प्रश्न अति विशाल अद्भुत ।
होति तयातुनि विचार जागृत ॥

जागृतीत त्या नित नूतनता ।
जागृतीत त्या नव मानवता ॥

आत्मशक्तिचा प्रभाव तेथे ।
अनंत ज्ञानी अनंत चरिते ॥

अनंतात त्या नित सौंदर्य ।
अपूर्व विक्रम अपूर्व वीर्य ॥

७ इथे भेद तर अभेद तिकडे ।
इथे अशांती सुशांति तिकडे ॥

अज्ञानातहि असति ज्ञानकण ।
अंध तमातहि प्रकाश दर्शन ॥

अभेद शोधू असुनि बंधनीं ।
शोधु शुद्धता अशुद्ध जीवनिं ॥

सृष्टि फुले मग नव चैतन्ये ।
फुला फुलातुनि स्फुरते गागे ॥

त्या गाण्यातुनि अमृत स्त्रवते ।
अमृतात त्या सृष्टि विहरते ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

८ आत्मा अविरत गुणरत्नाकर ।
अनादि अनिधन द्रव्य चराचर ।।

उत्पत्ति स्थिति लयहि तयाप्रति ।
नित्य उदित नव नित्य चमत्कृति ।।

तेच आत्म चैतन्य जीवनीं ।
जीवन घडते दृढ श्रद्धेतुनि ।।

लिंगांगातुनि अलिंग व्हावे ।
सम्यग्दृष्टी तिथे स्थिरावे ।।

९ भेद भिवविती व्यवहाराला ।
अभेदात आनंद बहरला ।।

अनंत शक्ती विशाल ज्ञानी ।
शुद्ध स्वच्छ नव प्रभुत्व जीवनिं ।।

निर्विकार दृढ निश्चय मेरू ।
स्वपर चराचर भाव कल्पतरु ।।

व्यक्ति संस्कृती समाज दर्शन ।
व्यवहारातिल नित्य नवेपण ।।

रणांगणातिल प्रताप सारा ।
आत्म शक्तिचा भाव फुलोरा ।।

१० स्वार्थ दृष्टिं सविकल्प समाधी ।
या न जयाला गमति उपाधी ।।

निर्विकल्पमति विशुद्ध आपण ।
त्रिकारांत त्या गमे उणेपण ।।

उणेपणातुनि प्रश्न प्रगटती ।
उत्तर त्याचे आत्मप्रचीती ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

११ आत्म प्रचीती अथांग सरिता ।
स्नान कराया बुडी मारिता ॥

थरारते तनु थरारते मन ।
आणिक होते पवित्र जीवन ॥

पवित्र जीवन शक्ति अनादी ।
जीवनात त्या विविध उपाधीं ॥

ज्ञान तिला ती काल गतीव्रर ।
मात कराया सिद्ध निरंतर ॥

कालमुखामधि कोटि कोटि जन ।
जन्म मृत्युचे तिथेच नर्तन ॥

काल जन्मलो उद्या मरावे ।
प्रश्न आजचा कसे जगावे ॥

तीन काल तरि एक प्रचीती ।
त्रिकालज्ञ मुनि मार्ग दाविती ॥

१२ जगद्गुरू ते जिवाजिवाचे ।
आदिनाथ प्रभु नाव तयाचे ।

नाभिराज कुळिं जन्म तयाचा ।
भरत भूपती पुत्र तयाचा ॥

१३ भरत खंड ही पवित्र भूमी ।
आणि जन्मलो तिथेच आम्हीं ॥

धर्म जाणतो कर्म जाणतो ।
संसाराचे वर्म जाणतो ॥

काल उद्याची हात मिळवणी ।
होत जगीं या संसारातुनि ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रश्न आजचे उद्या न उरती ।
कारण त्याचे आत्म प्रचीती ॥

आत्म प्रचीती प्रसन्न आत्मा ।
जीव व्हायचा जगिं परमात्मा ॥

१४ देवेंद्राचे राज्य अलौकिक ।
अमाप तेथे मिळे स्वर्गसुख ॥

कल्पतरूवन सभोवताली ।
दिवाळसण तो सांज सकाळी ॥

कुठे कुणाला उणे न पडते ।
परी शेवटीं अघटित घडते ॥

पुनर्जन्म ये पुण्य संपता ।
स्वर्ग सुखातिल शोकांतिकता ॥

स्वर्ग असो वा मृत्यु लोक तो ।
पुण्याईविण जन्म सफल तो ॥

कधीं होइना कळे जयाला ।
तोच महात्मा कृतार्थ झाला ॥

१५ इंद्रमित्र तो नाभिराज जगिं ।
जो जीवन सुख नित उपभोगी ॥

सौख्य आपुले देइ जनाला ।
सदैव जोडुनि पुण्य धनाला ॥

पुण्यबळाने जिंकुनि जनमन ।
आणि स्वर्गींचे देव मेळवुन ॥

निर्मि भूवरी नगर अयोध्या ।
इक्ष्वाकू कुल वंद्य सुविद्या ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१६ देव मानवी गुणिं समरसले ।
इक्षु रसातिल रहस्य हसले ॥

संजीवन गुणि जीव वनस्पति ।
संजीवन गुणि कुटुम्ब संस्कृति ॥

कुटुम्ब म्हणजे बीज जगाचे ।
जगातल्या या गणराज्याचे ॥

सुख फुलवावे दुःख हरावे ।
विवेक सुंदर कर्म करावे ॥

कर्म कुशलता धर्म मानवी ।
स्वर्ग सुखाहुनि तिची थोरवी ॥

स्वर्ग सुखाचे संपवूनि दिन ।
जगीं अवतरे देव दयाघन ॥

१७ देव स्वर्गिंचा जगिं अवतरतो ।
मरु देवीच्या उदरि जन्मतो ॥

स्वर्ग सुखामधिं उणे कांहिं तरि ।
म्हणुनि चळवळे जीव अंतरीं ॥

सरायचे सुख दुःख उरे पण ।
सुख दुःखाच्या अतीत आपण ॥

मार्ग शोधण्या आत्महिताचा ।
मृत्युलोकिं ये जीव स्वर्गिंचा ॥

१८ नाभिराज तो ती मरुदेवी ।
धर्म मार्ग रत कर्म स्वभावी ॥

तया गृहीं अवतार घ्यावया ।
आदिनाथ ये अयोध्येस या ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भोग भूमिचा त्याग घडे पण ।
कर्म भूमिचे नव आकर्षण ॥

माय पित्याचा पुत्र बने तो ।
आत्म सुखाचा धनी बने तो ॥

१९ प्रभात समयीं ये मरुदेवी ।
नाभिराज पद वंदुनि विनवी ॥

काल पाहिले स्वप्न एक ते ।
मनीं मानसी कधीच नव्हते ॥

बैल पाहिला सिंह पाहिला ।
आणि हत्तिही समीप आला ॥

चंद्र सूर्य ते नभीं पाहिले ।
देवेंद्राचे विमान आले ॥

स्वर्ण कलश तो सुरत्न राशी ।
नाग फणीसह जलाशयासी ।

समुद्र तेथे तिथे सरोवर ।
सरोवरातिल कमल मनोहर ।

कमलासन्निध मत्स्य विहरती ।
नृप सिंहासन अग्निशिखाती ॥

तिला देखुनी मनात भ्याले ।
असेल कां हे स्वप्न चांगले ॥

२० स्वप्न ऐकुनी भूप प्रमोदे ।
प्रिय पत्नीला धन्यवाद दे ॥

२१ अघटित घडते जगीं कांहिंतरि ।
देवेंद्राला कळे अंतरीं ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाभिराज कुलवृत्त ऐकुनी ।
येत इंद्र तो ये इंद्राणी ॥

नाभिराज करि स्वागत त्यांचे ।
तेज न्याहळुनि मरुदेवीचे ।

देवेंद्रासह ती इंद्राणी ।
तिला वंदिती प्रेमभरानी ॥

२२ पुत्र तुझा तो देव स्वर्गींचा ।
स्वर्ग–धरेला वंद्य व्हायचा ॥

भोगभूमि ती कर्म भूमिही ।
धर्म पुरुष तो पूज्य अम्हांही ॥

प्रपंच साधुनि परमार्थाचा ।
ध्वज उभविल तो जगीं सदाचा ॥

आदिनाथ तो तो तीर्थंकर ।
तुझ्या स्वप्निंचा तो वृषभेश्वर ।

म्हणुनि तियेची भरिली ओटी ।
पुत्रवती भव विश्व राहटी ॥

२३ प्रसन्न समयीं सुखे शुभदिनीं ।
प्रसूत झाली राजकामिनी ।

प्रसन्न राजा आणि राजकुल ।
राजधानिमधिं हो शुभ मंगल ॥

प्रजा जनांची रीघ लागली ।
माय पित्यावर फुले उधळिली ॥

देव स्वर्गीचा येइ धरेवरि ।
स्वर्ग धरेला हर्ष अंतरी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

देव स्वर्गिंचे गाउ लागले ।
तिथुनि भूवरी पाहु लागले ।।

ध्वजा तोरणे इथे तिथेही ।
मंगल वाद्ये इथे तिथेही ।।

दोन हात पण एकच टाळी ।
प्रसन्न मानव देव मंडळी ।।

२४ प्रश्न कुंडली पाहुनि गुरुजन ।
नव्या मुलाचे मुख अवलोकुन ।।

वृषभनाथ हे नाव ठेविले ।
इक्ष्वाकूकुल सुधन्य झाले ।।

२५ पूज्य पित्याचा पुत्र वृषभ तो ।
क्रमे राज्यपद सुभूषवीतो ।।

प्रजा जनांवर प्रेम तयाचे ।
दूर कराया दैन्य तयाचे ।।

तयास स्फुरती विविध कल्पना ।
कल्पनेतल्या विविध योजना ।।

प्रत्यक्षामधि स्वतः आणितो ।
आणि प्रेरणा जनास देतो ।।

२६ किती शेतकरि किति व्यापारी ।
धर्म कर्मरत अति सुविचारी ।।

सशस्त्र सैनिक सिद्ध लढाया ।
दक्ष मंत्रिगण साह्य कराया ।।

गृहा गृहामधिं विवेक बुद्धी ।
गृहा गृहामधिं सुख समृद्धी ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रजा जनांना अन्न वस्त्र धन ।
मुला मुलींना सुबोध शिक्षण ॥

तरुण पिढीने कसली कंबर ।
समाज नेंते समर धुरंधर ॥

धर्म व्यवस्था कर्म व्यवस्था ।
व्यवसायात्मक वर्ण व्यवस्था ॥

कुठे न चोरी कुणि न भिकारी ।
राज्य व्यवस्था कुटुम्ब भारी ॥

म्हणुनि वृद्धजन म्हणति तयाला ।
भला भूपती अम्हां लाभला ॥

२७ तरुण पराक्रमि पुत्र वृषभ तो ।
लौकिक त्याचा जगी पसरतो ॥

मायपित्याच्या मनीं कल्पना ।
पुत्र आपुला तरुण देखणा ॥

सुनमुख पाहू म्हणुनि इच्छिती ।
राज्य कन्यका सांगुनि येती ॥

यशस्वती ती आणि सुनंदा ।
स्नुषा रूपगुणि देति प्रमोदा ॥

२८ श्री वृषभाचे लग्न जाहले ।
गृही पाळणे हलू लागले ॥

यशस्वतीचा सुत भरतेश्वर ।
भरत भूमिचा भाग्य महेश्वर ॥

एक कन्यका नाम ब्राह्मि ती ।
अक्षर संख्येसहित लिपी ती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सुनंदेस सुत बाहुबली तो ।
भरतेशाचा सान बंधु तो ॥

आणि कन्यका नाम सुंदरी ।
कला कुशलतां भाव माधुरी ॥

प्रसन्न राजा प्रसन्न राणी ।
पुत्र कन्यका महा सद्‌गुणी ॥

२९ बघुनि मनी संतुष्ट जरी ते ।
तरी काहितरि अपूर्ण गमते ॥

हवी जीवनी आत्म प्रचीती ।
म्हणुनि विवेकी विरक्त बनती ॥

३० राज्य आणि संसार भिन्न ना ।
राज्य प्रपंची विवेक बाणा ॥

सौख्य प्रजेचे धर्म मार्ग तो ।
मात शत्रुवर राज मार्ग तो ॥

राज्य प्रजेचे पुण्य परायण ।
तिथे नृपाचे कृतार्थ जीवन ॥

पुढे चालविति वंश राहटी ।
असे लाभले सुत परमेष्ठी ॥

राज्य पत्निना मंत्रिगणांना ।
पुत्र कन्यका प्रजा जनांना ॥

श्री वृषभेश्वर करी निमंत्रण ।
आणि पातले सर्व सभाजन ॥

३१ इक्ष्वाकूकुल पवित्र मोठे ।
तेवि अयोध्या राज्य गोमटे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राज्य प्रपंची प्रसन्न जीवन ।
राज्य प्रपंची सुखी सर्व जन ॥

बीज पेरिता धान्य उगवले ।
भुकेजल्यांना अन्न लाभले ॥

कणा कणाची हो मण खंडी ।
व्यापारांत न कुठे लबाडी ।

असो दीन वा असो धनी तो ।
अजाण कोणी कुणि ज्ञानी तो ॥

राज्य प्रपंची समान सारे ।
प्रजा प्रजापति माय लेकरे ॥

३२ हवे प्रपंची अन्न वस्त्र धन ।
हवे प्रपंची समाज शिक्षण ॥

हवी प्रपंची कला कुशलता ।
तशी प्रपंची स्वराज्य सत्ता ।

स्वराज्यात या शक्ति शालिनी ।
प्रजा पाहिजे सदा सद्‌गुणी ॥

पुरुष असो की असोत महिला ।
राज्य प्रपंची मान तयाला ॥

समता ममता स्वतंत्रता ती ।
गण-राज्याची पुण्य प्रचीती ॥

३३ गण-राज्यातिल मीहि एकजन ।
जना सारिखे मलाहि पण मन ॥

मना मनामधि विविध भाव ते ।
नित्य उमटती कुणा न कळते ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कळेल तो जन वरिल विरक्ती ।
तिथे आत्मसुख आत्म प्रचीती ॥

असो भूपती असो प्रजाजन ।
जन्म मृत्युचे चक्र सुदर्शन ॥

जिवाभोवती नित वावरते ।
जनि क्षणभंगुर जीवन गमते ॥

जित्या जीवनी मार्ग मुक्तिचा ।
क्रमिति महात्मे आत्मस्फूर्तिचा ॥

स्फूर्ति तयांची जनास तारी ।
वनी विहरती जन संसारी ॥

३४ जन संसारी पुण्य पाप ते ।
जन संसारी शिव्या शाप ते ॥

जन संसारी धर्म परीक्षा ।
जन संसारी मुनिजन दीक्षा ॥

जन संसारी गृह सुत दारा ।
राजमान्यता मोह पसारा ॥

मोह आवरा म्हणति साधु जन ।
मन निर्मोही विवेक लक्षण ॥

पुत्र विवेकी प्रजा विवेकी ।
गणराज्याची जगात शेखी ॥

आज असे ती उद्या वाढवा ।
तोच जगाचा गुढी पाडवा ॥

३५ देह प्रपंची मन परमार्थी ।
वरिन या पुढे वनात शांती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

म्हणुनि निघति प्रभु कैलासावर।
राज्य मुगुट वरि श्री भरतेश्वर ॥

३६ कैलासावर आदि प्रभू ते।
करिं अभिवादन इंद्र तयाते ॥

ॐ नमो हा सिद्ध मंत्र जनि।
मंत्र शक्तिचा गमे मेरुमणि ॥

सिद्ध मंत्र तो सिद्ध मुनी तो।
मंत्र अंतरी बाहिर घुमतो ॥

भूप सुखाने वरि मुनि दीक्षा।
आत्म-शक्ति ती दिव्य परीक्षा ॥

श्रेयांसानें अहार दिधला।
दान व्रताचे पुण्य तयाला ॥

अनंत दर्शन अनंत ज्ञानी।
अनंत सुखिजन वीर्यवंतमुनि ॥

ध्यानमग्न प्रभु कर्म जळाले।
जगि अर्हत्पद तया लाभले ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खंड दुसरा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१ आदि प्रभूची प्रयोगशाला ।
परी अगोचर दृष्टि सृष्टिला ॥

काल आज वा उद्या न तेथे ।
अनादि गुणनिधि नाव तयाते ॥

जीव आणि जड पदार्थ दोन्ही ।
परस्पराच्या गुणीं गुंतुनी ॥

वाढविती जन प्रपंच जगती ।
परमात्म्याची घडे विस्मृति ॥

२ परमात्म्याची जया न ओळख ।
जगी तयांना मिळेल कां सुख ॥

प्रपंचात सुख मानुन जगणे ।
आत्म सुखाला जगिं आंचवणे ॥

जन्म घेति ते वृथा मराया ।
पूर्व जन्मिचे पुण्य हराया ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

३ पूर्व जन्मिचे सुकृत काही ।
म्हणुनि मानवी जन्म अम्हाही ॥

आज जन्मलो उद्या जन्मती ।
किती जन्मले तया न गणती ॥

अंकगणित ते नको च आता ।
परमात्म्याचे प्रेम प्रगटता ॥

४ जीव जन्मला जरा-मरणही ।
असे ज्याला कळुनि सर्वही ॥

का न प्रभूला शरण जाति नर ।
पूर्व जन्मिचे पाप भयंकर ॥

५ शत वर्षांचे आयु जीवनीं ।
करील तो किति पाप पुण्य जनिं ॥

जन्मताच का पाप प्रकृती ।
जन्मताच का आत्मविस्मृती ॥

असुनि विलासी विरक्त होती ।
जगजेत्यांना शरण आणिती ॥

जे शरणागत तथा तारिते ।
परमात्म्याचे प्रेम प्रगटते ॥

६ परमात्म्याचें प्रेम जीवनीं ।
म्हणुनि जिवाला नवजीवन जनिं ॥

प्रेम निर्मिते जगात जीवन ।
श्री भरतेश्वर पुण्यपरायण ॥

७ चक्रवर्ति-श्री भरतेशाची ।
महा प्रतापी प्रजापतीची ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दे दिन चर्या प्रगट प्रेरणा ।
मंत्रि महाजन प्रजाजनांना ॥

महामंत्रि ये करि अभिवादन ।
म्हणे धन्य तूं तव अनुशासन ॥

प्रजा नांदते सुखात सारी ।
तुझ्या कृपेचे छत्र शिरावरि ॥

प्रजाजनांची एक मनीषा ।
श्रवण करी रे प्रताप-पुरुषा ॥

८ प्रजा सुखी तर राज्य सुखी हे ।
सुख-संवादी ध्येय तुझे हे ॥

शत खंडामधिं किती तरी जन ।
तयाहि लाभो तव अनुशासन ॥

९ अनुशासन गुण लोक-संग्रही ।
लोक-शक्ति दे मनास ग्वाही ॥

पुण्यबळाने पाप नासते ।
घरोघरी चैतन्य हासते ॥

मूर्तिमंत चैतन्य इथे तू ।
चक्रवर्ति तू प्रजापती तू ॥

धर्म मार्ग तव प्रभावशाली ।
पडो तयाची प्रभा भूतली ॥

१० ये संरक्षण मंत्रिमहाजन ।
प्रसन्न चित्ते करि अभिवादन ॥

म्हणे नरेशा नवल वर्तले ।
शस्त्रसंग्रही चक्र प्रगटले ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चक्रवर्तिचे चक्र सुदर्शन ।
करो जगाचे सदैव रक्षण ॥

११ शस्त्रसंग्रही चक्र सुदर्शन ।
सभेत दुसरे घडे नवल पण ॥

पुत्रप्राप्तिची प्रसन्न वार्ता ।
वदे दूत ती ऐकुनि जनता ॥

गाउ लागली नाचु लागली ।
जय जयकारे गर्जु लागली ॥

१२ अजि मंगल दिन प्रसन्न वेला ।
प्रभा फाकली पूर्व दिशेला ॥

रवि राजाची मूर्ति रथावरि ।
सृष्टि तयाला अभिवादन करि ॥

पुष्प वेलिवर हास्य उमलले ।
त्या हास्यातुनि गंध दरवळे ॥

कोकिल कूजन मयूर नर्तन ।
मंगल गीते गृहा गृहातुन ॥

शुचिर्भूत स्त्री-पुरुष मंदिरी ।
प्रभुरायाचा नाम गजर करि ॥

चक्रवर्तिच्या नव पुत्राचा ।
जन्म दिवस हा आनंदाचा ॥

१३ चक्रवर्ति नृप आणि प्रजाजन ।
प्रजा पुत्रवत् धर्म सनातन ॥

गृह संसारी धर्म नांदतो ।
प्रजाननांना पुलकित करितो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रजापतीचा पुत्र पहाया ।
माय पित्याचे दर्शन घ्याया ॥

उधळुनि सुमने राजकुलावरी ।
प्रजा आपुले प्रेम प्रगट करि ॥

१४ प्रसन्न सुंदर शकुन चांगला ।
राजकुलासह हर्ष प्रजेला ॥

प्रजाजनाते नमुनि अंतरी ।
ये भरतेश्वर राजमंदिरी ॥

१५ प्रपंचातल्या या प्रेमाचे फळ ।
राजकुलाचे भविष्य उज्वल ॥

राजपत्नि ती कुशीत घेते ।
दे दर्शन सुख भरतेशाते ॥

१६ राजपत्नि तूं राजपुत्र हा ।
राज कुलातिल दीप नवा हा ॥

पुण्यशील कुलवेल आमुची ।
गुण सुमनाने फुलावयाची ॥

आज मुलाची माय जाहलिस ।
आत्मसुखाने अति मोहरलिस ॥

हृद्गत माझे तुलाच ठावे ।
तुझ्या सुखाने सौख्य दुणावे ॥

पायगुणी हा पुत्र आपुला ।
दे नवजीवन लाख जिवाला ॥

१७ सुखी जीव जो सुखास वितरी ।
म्हणुनि प्रपंची गमत माधुरी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तू आणिक मी आपण झालो ।
आपुलाच हा म्हणुनि म्हणालो ॥

हास्य तुझे हे हास्यहि माझे ।
बाल मुखावर पहा विराजे ॥

१८ बालराज हा तुझा आमुचा ।
बालराज हा सर्व प्रजेचा ॥

बोल बालका तुझा पिता मी ।
उद्या जायचा रणसंग्रामी ॥

राजपुत्र तू दे मज आज्ञा ।
जिंकिन जग मी धर्म-प्रतिज्ञा ॥

१९ वीरस्नुषा मी वीर कन्यका ।
वीर पत्नि मी वीर बालका ॥

जन्म देउनी कृतार्थ झाले ।
प्रपंच धर्मी पुण्य जोडिले ॥

प्रजापतीचा धर्म आठवे ।
प्रजापतीचे कर्म आठवे ॥

धर्म कर्म रत तुम्हि रणसुंदर ।
विजयश्रीचे छत्र तुम्हावर ॥

म्हणुनि कामिनी सबाष्प नेत्रे ।
भरतेशाला तिलक लाविते ॥

२० म्हणे माय ती श्री भरतेशा ।
धन्य कुलातिल सुधन्य पुरुषा ॥

तुझ्या पित्यासह पितृकुलाची ।
किर्ती गाजते जगांत साची ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पोर सानुले सून लाडकी ।
तुझ्या वैभवे मीहि पण सुखी ॥

जन संसारी गृह धन आशा ।
करी काळगति अजब तमाशा ॥

पाप कुणाचे कुणा बाधते ।
राज्य-प्रपंची युद्ध प्रगटते ॥

राजधर्म तव मलाहि ठावा ।
महा-दुष्ट जन नष्ट करावा ॥

दुर्जन-दण्डन जगिं रण-नीती ।
नीतिनिपुण तूं धन्य प्रजापति ॥

सदैव इच्छित माय मुलास्तव ।
चिरंजीव हो जगि विजयी भव ॥

२१ म्हणे प्रजापति प्रजाजनानो ।
धर्म कर्म रत रण मर्दानो ॥

विजया - दशमी आज पातली ।
सृष्टि सुंदरी पहा हासली ॥

फुलवेली किति बहरुनि आल्या ।
नम्र होउनी बोलु लागल्या ॥

पर्वत नटले किति मोदाने ।
नयन मनोहर रवि तेजाने ॥

तुडुम्बले किति नद्या सरोवर ।
कृपा प्रभूची तुम्हा अम्हावर ॥

२२ शरद् ऋतूमधि हंस सुखावति ।
परी मयुर का दुःखित होती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

इथे एक तर दुजे तिथे ते ।
हेच द्वैत जगि युद्ध निर्मिते ॥

२३ मी आणिक तू द्वैत तामसी ।
दे तामस गुण दुःख जिवासी ॥

जिवा जिवा मधि नसें जिव्हाळा ।
करी कलंकित जगि मानवतेला ॥

जगि मानवता कुटुम्ब वत्सल ।
वत्सलते मधि संघटना बल ॥

संघटनेचे राज्य भूवरी ।
कुणी न राजा कुणी भिकारी ॥

सर्व सारखे सर्व सुखी ते ।
उणे न लेखिति कुणी कुणाते ॥

एक दुजाचा नित सहकारी ।
आत्म-स्फूर्तिने दुःख निवारी ॥

दुःख निवारण सुख संवर्धन ।
संघटनेचे प्रसन्न दर्शन ॥

दर्शन सुख हे देउ जगाला ।
जगातल्या या जिवाजिवाला ।

२४ विश्व-कुटुंबी राज्य आपुले ।
अम्ही जाणतो कोण कोठले ॥

कोण आपुला कोण परा वा ।
केवि दुजा तो दूर करावा ॥

सामन्तादिक समाज कंटक ।
नेती प्रजेचे हिराऊनि सुख ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रजा असावी सुखि संसारी ।
जो न प्रजेचे दुःख निवारी ॥

तो नच राजा ती न राजवट ।
तिथे युद्ध जरि प्रयत्न दुर्घट ॥

२५ युद्ध दुंदुभी पहा वाजते ।
तुम्हा अम्हाला रणी बाहते ॥

सामन्तांचा स्वार्थ अनावर ।
करी आक्रमण प्रजाजनावर ॥

असें आक्रमण जे न वारिती ।
प्रजाजनातिल दुर्बलता ती ॥

२६ दुर्बलता जगि पाप भयानक ।
करि स्वर्गाचा नरक अचानक ॥

जरी जगामधि सज्जन दुर्जन ।
नच नरकातिल किडे कुणी पण ॥

दुर्जनदण्डन पाप नव्हे ते ।
पुण्यमार्ग तो धर्म युद्ध ते ॥

२७ समाज सन्मुख समर संस्कृती ।
प्रेम पराक्रम आत्म - जागृती ॥

रणमर्दांमधि स्वार्थ कोठला ।
प्राप्ति यशाची प्रजा जनाला ॥

प्रजा सुखी तर राज्य सुखी हे ।
सुख - संवादी विश्वसूत्र हे ॥

सुखात व्यत्यय कुणी आणिती ।
असोत कुणि ते पाप प्रकृती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तिथे आपपर भेद असेना ।
राजदण्ड करि शासन त्यांना ॥

धर्म कर्म रत हे अनुशासन ।
म्हणे गाजवा अम्हा रणांगण ॥

२८ शस्त्रधारि या अस्त्रधारि या ।
अनुशासन प्रिय कर्मचारि या ॥

हत्यार करि वा करी लेखणी ।
सैनिक सारे राजकारणी ॥

धनिक श्रमिक या शेतकरीही ।
अन्न वस्त्र धन धान्य संग्रही ॥

ब्राम्हण क्षत्रिय वैश्य शूद्र ते ।
समाज सेवक कर्म कुशल ते ॥

कर्म कुशलता अति सुविचारी ।
जिवा जिवाचे दुःख निवारी ॥

कलावंत या साधु संत या ।
जिवा जिवाचे दुःख हराया ॥

कुणि धन्वंतरि परिचर्या प्रिय ।
बंधु भगिनि या तुम्हा न मुळि भय ॥

भय मरणाचे मरे रणांगणि ।
उरे कीर्ति जगि जगन्मोहिनी

२९ युद्ध पर्वणी नव्हे क्रूरता ।
समाजसन्मुख सावधानता ॥

सत्य अहिंसा प्रेम तिथे पण ।
आदि अंति तो सावधान गुण ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सावधान गुण धर्म ईश्वरी ।
ऐश्वर्यचि राज्य जगात्तरि ॥

त्या राज्यातिल अम्ही सर्वजण ।
कितीक सज्जन कितीक दुर्जन ॥

दुर्जन गांजिति दीन दुर्बला ।
सज्जनास ये तिथे कळवळा ॥

करुणासागर शूर प्रजापति ।
धर्म संस्कृती मनी पूजिती ॥

परि रक्ताची तहान ज्यांना ।
सशस्त्र शांती भिडे तयांना ॥

३० अम्ही शांतिचे पाइक सारे ।
सत्य अहिंसा व्रत जपणारे ॥

परी भीरुता आणि अशांती ।
राज - शासनीं कुणी निर्मिती ॥

राष्ट्र - शक्तिचे ते नित वैरी ।
घाव तयांच्या घालु शिरांवरि ॥

३१ रक्त रंगणी अम्हा नाहणे ।
स्वर्ग आक्रमू रण - मरणाने ॥

करू जितेपणि राज्य आमुचे ।
पुत्र पौत्र जनि उरावयाचे ॥

नसेल तेथे कधी अशांती ।
रण मरणाची कुणा न भीती ॥

अन्नवस्त्र धन ज्ञान प्रजेला ।
राजकारणी मान प्रजेला ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सदा सुखाने जगेल जनता ।
रणि विजयश्री प्रसन्न होता ॥

३२ प्रजापतीची घेउनि आज्ञा ।
सैनिक सारे करुनि प्रतिज्ञा ॥

चहू दिशेला करिति आक्रमण ।
साह्य तया करि चक्र सुदर्शन ॥

जगि विजयश्री प्रसन्न होते ।
चक्रवर्ति श्री भरतेशाते ॥

३३ चहू दिशेला अनेक राजे ।
भरत तयामधि श्रेष्ठ विराजे ॥

का न श्रेष्ठतर का न श्रेष्ठ तम ।
रणमर्दाच्या मनात संभ्रम ॥

रणमर्दाचा हा भ्रम मोठा ।
शस्त्रास्त्रांचा प्रचण्ड साठा ॥

सैनिक सारे सिद्ध लढाया ।
जग जेते पण सुखे वराया ॥

विजय मिळे पण जगजेते पण ।
का न मिळे हा प्रश्न विलक्षण ॥

अपूर्ण तोवरि चक्रवर्तिपद ।
मी न ठेवितो अयोध्येत पद ॥

म्हणुनि सुदर्शन - चक्र थांबते ।
रण - विजयश्री भ्रमांत पडते ॥

३४ रण - विजय - श्री क्षात्र संपदा ।
संपदेस त्या जन मर्यादा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जना मना मधि विविध भावना ।
जना मना मधि धर्म कल्पना ॥

धर्म कल्पना ब्रम्हभाव तो ।
जग जेत्यांना शरण आणितो ॥

३५ चक्र सुदर्शन पुढे चालते ।
सर्व सुरक्षा सैनिक तेथे ॥

शस्त्रास्त्रासह सुसज्ज सेना ।
करि सेनापति मार्ग दर्शना ॥

भरतेशाचा लौकिक भारी ।
जगी जाणती जन संसारी ॥

ग्राम-भूप ते नगर-भूपती ।
राज-विलासी सुखे लोळती ॥

देति भूमिजन जरि नजराणा ।
ऐतखाउना पुरा पडेना ॥

म्हणुनि भांडती परस्परामधि ।
गृह कलहाला सुवर्ण संधी ॥

राजविलासी दुर्बल राजे ।
दीन प्रजेला गांजिति जेजे ॥

शस्त्र तयावरि धरि भरतेश्वर ।
गण राज्याचा महा महेश्वर ॥

३६ ग्राम नगर वा प्रांत भेद ते ।
एक छत्रि साम्राज्य एक ते ॥

एक सूर्य पण अनंत किरणे ।
कुणी कुणाला उणे न गणणे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असो प्रजाजन असो भूपती ।
सु-चक्र वर्तनि तयास प्रीती ॥

चक्रवर्तिपद जणू मिळाले ।
म्हणुनि सैन्य ते गृहास आले ॥

इथेच अडले चक्र सुदर्शन ।
गृह कलहाचे तंत्र विलक्षण ॥

३७ चक्र थांबले यंत्र शक्ति ती ।
राज्य यंत्रणा जनास भीती ॥

सैनिक सारे म्हणति अशुभ हे ।
कुणी विरोधक अम्हास आहे ॥

पिता बंधु वा पुत्र संतती ।
असोत कुणि जे विरोध करिती ॥

विरोधकावर दया न करणे ।
क्षात्र धर्म तो विजय मिळविणे ॥

राज्य आणि साम्राज्य शक्ति ती ।
कुठे उणी तर कुठे दुणी ती ॥

उण्या दुण्याची झुंज लागली ।
श्री भरतेश्वर आणि बाहुबलि ॥

३८ आदि प्रभूचे तुम्ही अम्ही सुत ।
राज्ययंत्रणा प्रजेस सम्मत ॥

प्रजाजनाच्या स्वतंत्रतेचा ।
मान राखणे धर्म आमुचा ॥

भरत भूमितिल कणकण माती ।
भरतेशाची बदिक नव्हे ती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जिंकुनि घे तू शरण येइना ।
बाहुबलीचा स्वतंत्र बाणा ॥

३९ बंधु बंधु चे द्वंद युद्ध तें ।
परस्परांना अजिंक्य होते ॥

एक व्यक्तिची स्वतंत्रता ती ।
साम्राज्याची दुजास प्रीती ॥

स्वतंत्र वृत्ति हार जाइना ।
परी दुजाची हार साहिना ॥

जिथे पराक्रम तिथे प्रेम ते ।
ब्रम्हभावना तिथेच स्फुरते ॥

४० राज्ययंत्रणा प्रचण्ड शक्ती ।
आणि एकली स्वतंत्र व्यक्ती ॥

यंत्रणेस त्या हाणुनि ठोकर ।
सत्रे तिलांजलि सर्वस्वावर ॥

देउनि आपण वरी विरक्ती ।
बाहुबलीची सुधन्य कीर्ती ॥

४१ साम्राज्याचे छत्र मस्तकी ।
भरतेश्वर पण मनात दुःखी ॥

राज्य आणि साम्राज्य दुःखमय ।
भरत बाहुबलि जय न पराजय ॥

राज्य प्रपंच न देइ सुखासी ।
सखे बंधु जन अजि वनवासी ॥

जिथे शांति सुख तिथेच मुक्ती ।
पुण्य पराक्रम वीर विरक्ती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

४२ मुक्ति मार्ग तो जयास ठावा ।
असा सद्गुरु जगी असावा ॥

जगद्गुरू ते पूज्य पिताजी ।
व्यथा तयांना कथीन माझी ॥

मार्ग दावितिल क्षमाहि करितिल ।
उपदेशामृत मला पाजितिल ॥

म्हणुनि निघाला कैलासावर ।
चक्रवर्ति तो श्री-भरतेश्वर ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खंड तिसरा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१ चक्रवर्ति श्री भरतेशाने ।
षट्खंडावर विजय मिळवुनी ॥
दर्शन करण्या आदि प्रभूचे ।
प्रयाण केले आनंदानी ॥

प्रसन्न सुंदर प्रसंग पाहुनि ।
कैलासासहि मोद जाहला ॥
ओंजळ भरुनी फुलवेलीनी ।
फुले अर्पिली भरतेशाला ॥

ताल गीत संगीत नृत्यमय ।
स्वागत केले पशु पक्ष्यांनी ॥
मंजुळवारा वाहु लागला ।
निज सौगंधे दाहि दिशांनी ॥

प्रसन्न होउनि गंगामाई ।
कलश अर्पिते मधुर जलाचा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भरतेशाच्या आदि प्रभूचा ।
दर्शन क्षण हा अति भाग्याचा ॥

२ सभा मंडपी आदि प्रभूचे ।
दर्शन झाले भरतेशाला ॥

दर्शन घडता पुनः पुनः ये ।
आनंदाचा पुनः उमाळा ॥

दो नयनांची तृप्ति होइना ।
मनी दाटले प्रेम अती ॥

त्या प्रेमाची फुले वाहुनी ।
प्रभु चरणाची करी स्तुती ॥

३ पुण्य पुरुष तू तीर्थ-स्थान ।
तुझ्या दर्शने पवित्र जीवन ॥

अज्ञानाचे पटल निघाले ।
मन माझे हे प्रसन्न झाले ॥

बाह्य वैभवे मोहित झालो ।
आत्म वैभवे सावध बनलो ॥

नसे शांति मज दिग्विजयात ।
मिळो सौख्य मज आत्मजयात ॥

४ छत्र चामरे पुण्य प्रभावी ।
बाह्य लक्ष्मी सहज स्वभावी ॥

अनंत शक्ती अगणित ज्ञान ।
परी आत्म सुख तिथे मिळे न ॥

अंतरलक्ष्मी पुण्य प्रभावी ।
प्रकाशते नव आत्मवैभवी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पुण्य भक्तिचे शुभ फळ मिळते ।
पाप वृत्तिने अशुभहि घडते ॥

पुण्य पाप करि जगि भवबंधन ।
शुद्ध भक्ति करि मुक्त जिवा पण ॥

तव नामाचा अपार महिमा ।
भक्ति तुझी जगि सुखवित आम्हा ॥

५ अलख निरंजन रूप सदाचे ।
कसे स्तवन करु मी प्रभु तुमचे ॥

तुम्ही पूर्ण मी अपूर्ण अज्ञुनी ।
तुम्ही शुद्ध मी बद्ध अडाणी ॥

निर्विकार तुम्हि मीच विकारी ।
निराकूल तुम्हि अकुलित सारी ॥

निराकार तुम्हि मी साकार ।
निर्विकार तुम्हि अम्ही प्रकार ॥

दिक् दृष्टि दिग्तेज दिव्य तूं ।
अपूर्ण मी मम अपूर्ण हेतू ॥

पूर्णत्वाची ओढ लागुदे ।
तुझ्या प्रसादे पूर्ण होउदे ॥

हीच मनीषा तव भक्ताची ।
तव पुत्राची भरतेशाची ॥

६ करुनि विनंती प्रभु वृषभाला ।
म्हणे तारि प्रभु तारि अम्हाला ॥

प्रभु चरणाला पुन्हा वंदुनी ।
जाउनि बसला अपुल्या स्थानी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

७ सभा डोलते आनंदाने ।
भरतेशाच्या स्तुति श्रवणाने ॥

प्रभुवचनामृत पान कराया ।
उत्सुक झाली सारी दुनिया ॥

उत्सुक झाले मुनी आर्यिका ।
उत्सुक श्रावक आणि श्राविका ॥

उत्सुक झाले स्वर्गातिल जन ।
गणराजेश्वर आणि महाजन ॥

सिंह व्याघ्रही तिथे पातले ।
हरिणशावका सवे बैसले ॥

पशु पक्ष्यांनी गजबजले वन ।
तिथे वैर ना सान थोरपण ॥

जिवा जिवाची शांति सभा ती ।
प्रभुवचनामृत सेवित होती ॥

८ गंध कुटी ती समवशरण ते ।
गमे धन्यता देवेंद्राते ॥

प्रभु सिंहासन छत्र चामरे ।
धर्म चक्र ही तिथेच विहरे ॥

प्रसन्न वातावरण तेथले ।
कधि न पाहिले कधी ऐकिले ॥

भरतेशाने बघुनि सोहळा ।
म्हणे धन्य किति प्रसन्नवेळा ॥

९ ॐकार ध्वनि निनाद मंजुळ ।
भासति साऱ्या दिशा सुमंगल ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रभुदेवाची अमृत वाणी ।
जना मनाला घेइ वेधुनी ॥

नरजन्माचे सार्थक व्हावे ।
असे वाटते जया स्वभावे ॥

स्वभावात त्या स्फुरे जागृती ।
जागृतीत त्या आत्मप्रचीती ॥

जरी प्रचीती हवी जिवाला ।
अभ्यासाचा मार्ग चांगला ॥

१० अभ्यासे जगि जीवन घडते ।
अभ्यासाने सर्व साधते ॥

हवे शुद्ध कुल शुद्ध जाति ती ।
तिथेच रुजते शुद्ध मती ती ॥

शुद्ध बीज तर फळे गोमटी ।
चालत आली जगी राहटी ॥

जन्म कर्म रत ही सज्जाती ।
शुभ संस्कारे प्राप्त होत ती ॥

जन्म आणि संस्कार जिवाला ।
संस्काराने जगा वेगळा ॥

जीव भासतो ही पुण्याई ।
कुठे भासते कुणात नाही ॥

११ शुभ संस्कारे धर्म प्रगटतो ।
मळीन अंतर पवित्र करितो ॥

पाषाणाचा परिस होउनी ।
लोखंडाचे सुवर्ण करुनी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करी जगामधि सुख समृद्धी ।
संस्काराची पुण्य प्रसिद्धी ॥

शुभ संस्कारी मानव प्राणी ।
महाजनांची गमे रत्नखनि ॥

बहु मोलाचे रत्न होति किति ।
कोटि कोटि जन तया वंदिती ॥

१२ नरदेहाचे सार्थक झाले ।
म्हणुनि तया हे ज्ञान लाभले ॥

शुद्ध जाति कुल शुद्ध ज्ञान ते ।
सम्यद्दर्शन तिथेच घडते ।

शुद्ध जीवनी व्रताचार गुण ।
शुभ संस्कारे प्रापंचिक जन ॥

आचार्यांच्या आशीर्वचनें ।
नित नैमित्तिक मार्गदर्शने ॥

धर्म जीवनी साधिति स्थिरता ।
नित्य पूजिती जिन भगवंता ॥

फळ भक्तीचे पुण्यमार्ग तो ।
भाग्यवंत कुलि जन्म लाभतो ॥

१३ भाग्यवंत कुलि धर्म भावना ।
नव्या जीवनी नवी प्रेरणा ॥

सत्कार्याचे श्रेय साधते ।
पाप कोणते पुण्य काय ते ॥

काय करावे काय त्यजावे ।
स्फुरे अंतरी ज्ञानस्वभावे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तिथेच शांती तिथेच समता ।
जन सेवा व्रत त्याग तत्वता ॥

घडे दान करि क्रिया पालटे ।
जीवन सुंदर घडे गोमटे ॥

१४ शुभ संस्कारे जीव भव्य तो ।
कर्म कुशल तो श्रावक बनतो ॥

गृहस्थ धर्मी स्त्री पुत्रादिक ।
गृहस्थधर्मी सुयोग्य लौकिक ॥

कृषि आणिक वाणिज्य प्रपंची ।
कला आणि कौशल्य प्रपंची ॥

शिल्प निर्मिती भव्य दिव्य ती ।
चकित होति जन बघुनि नित्य ती ॥

संसाराचा व्याप मनोहर ।
सौंदर्याचा ध्यास मनोहर ॥

असोत सारे सुखी भावना ।
म्हणुनि जना तो दुःख देइना ॥

शुभ कर्माचे सुयोग्य पालन ।
नित्य अंतरी प्रभु - गुण - गायन ॥

गुणीच गाती गुणिजन कीर्ती ।
जगि संपादुनि वाढविती ती ॥

१५ सद्गुण मार्गे विकसत आत्मा ।
गृहित तत्व जगि तो परमात्मा ॥

गृहस्थ धर्मी सुजाण व्यक्ती ।
गुरुवचनावर ठेवुनि भक्ती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वृत्ति शुद्ध करि क्षणाक्षणाला ।
असुनि प्रपंची गमे निराळा ॥

तया दिगंबर रूप आवडे ।
परिव्राजक व्रत तया आवडे ॥

मोक्ष पदाची मनात जाणिव ।
धरुनि सदा करि गुरु जन गौरव ॥

१६ गुरुकृपेने क्रिया पालटे ।
मनोमंदिरी प्रकाश दाटे ॥

अज्ञतमाची होत झाडणी ।
क्रमे महाजन गमे महामुनि ॥

विशुद्ध कुल ते चरित्र सुंदर ।
स्वयें भासतो ज्ञान दिवाकर ॥

दाहि दिशेला प्रकाश त्याचा ।
देवेंद्रापरि मान तयाचा ॥

देवेंद्रहि पद वंदि तयाचे ।
धन्य श्रेष्ठ पद अरिहंताचे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खंड चवथा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ॐ

१ षट्द्रव्याचे मीलन हे जग ।
निसर्ग निर्मित प्रमेय हे जग ॥

विश्व घडे जड चेतन द्रव्यें ।
जीव अजीवहि तयास नावें ॥

नसे जगी कुणि जगन्नियंता ।
नसे जगाचा कुणि निर्माता ॥

जीव जीव जगि स्वतंत्र आत्मा ।
तोच व्हायचा जगि परमात्मा ॥

२ द्रव्य तिथे गुण अनन्त धर्महि ।
वस्तु वस्तुमधि व्यापुनि राही ॥

अनन्त गुण पर्याय द्रव्य ते ।
सामान्यासह विशेष गुण ते ॥

वस्तु वस्तुमधि अस्ति भाव तो ।
जो न कधीही नाश पावतो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वस्तु वस्तुमधि अर्थकारिता ।
ती उपकारक ती गुणवत्ता ॥

वस्तु वस्तुमधि द्रव्य शक्ति ती ।
क्षणा क्षणाला बदल घडविती ॥

वस्तु वस्तुमधि प्रमेय नांदे ।
ज्ञान विषय तो मति आनंदे ॥

वस्तु वस्तुमधि अगुरुलघुत्वहि ।
गुण न कुणाचे कधी न घेई ॥

वस्तुमात्रि आकार विराजे ।
प्रदेशत्वगुण तयात साजे ॥

३ वस्तु वस्तु मधि मुख्य सहा गुण ।
जरी तयामधि असति बहू गुण ॥

जीव द्रव्यि या वसे चेतना ।
पुद्गलात त्या जडत्व नाना ॥

धर्म तिथे गति अधर्म स्थिरता ।
नभ द्रव्यामधि अवगाहनता ॥

चलन वलन करि काल द्रव्य ते ।
षट् द्रव्यातिल विशेष गुण ते ॥

मुर्ति अमूर्तिक हे सम्मीलन ।
विश्व गुणाने गमे अम्हापण ॥

४ जीव द्रव्य जगि धर्म अधर्महि ।
काल आणि आकाश सर्वही ॥

पाच अमुर्तिक द्रव्यसंपदा ।
तिथेच पुद्गल आणित बाधा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मूर्तिमंत ते द्रव्य एकले ।
अणु स्कंधांनी अति नटलेले ॥

तिथे स्पर्शगुण ती रसवत्ता ।
तिथे गंध तो वर्ण विविधता ॥

खेळ तयांचा ही जड सृष्टी ।
सृष्टि द्रव्य पण गुण परमेष्ठी ॥

५ सहा द्रव्य ते वस्तु अनादी ।
उत्पत्ति स्थिति लयहि तयामधि ॥

क्षणा क्षणाला हो परिवर्तन ।
जन्ममृत्युचे चक्र सुदर्शन ॥

६ विनाश असुनी का अविनाशी ।
विश्व गमे हे जिवाजिवासी ॥

षट्द्रव्यातिल नित्य नवेपण ।
तेच घडविते हे ध्रुव दर्शन ॥

जीव असो की अजीव वस्तू ।
नित्य बदलणे स्वभाव हेतू ॥

नित्य बदलले तरि न नासते ।
की अविनाशी मूळ द्रव्य ते ॥

७ स्वभाव त्याचा ध्रुव अविनाशी ।
गुण पर्यायी भाव तयासी ॥

ध्रुव स्वाभाविक गुणास संज्ञा ।
गुणकार्यी पर्याय प्रतिज्ञा ॥

स्वाभाविकता द्रव्य दृष्टि ती ।
महा निश्चयी स्वतंत्र वृत्ती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पर्यायाची दृष्टि विभाविक ।
पराश्रयी व्यवहारी रुखरुख ॥

गुण भेदामधि जो न रंगतो ।
ध्रुव स्वभावी सदैव स्थिर तो ॥

तया अंतरी नच अस्थिरता ।
तया शिवेना कधी भीरुता ॥

स्वाभाविकता तयास ठावी ।
दृष्टि विभाविक तो न आठवी ॥

प्रति द्रव्यामधि भाव नांदती ।
भाव गुणी त्या अगाध शक्ती ॥

जीव पुद्गली चलन वलन ते ।
ते स्वाभाविक वैभाविक ते ॥

अमूर्तिकामधि गमे भाव गुण ।
जीव पुद्गली क्रिया शक्ति पण ॥

इथे तिथे जगि विहार त्यांचा ।
खेळ सर्व त्या क्रियाशक्तिचा ॥

८ जिवा जिवामधि स्वाभाविक गुण ।
तिथे ज्ञान ते चरित्र दर्शन ॥

कर्तृत्वासह भोक्तृत्वहि ते ।
स्वतंत्र सत्ता प्रभुत्व तेथे ॥

गुण स्वाभाविक अति पुरुषार्थी ।
वीर्यत्वाची ध्वजा गाजती ॥

उरे पाप ना उरे पुण्य ते ।
ज्ञान अखंडित तिथे प्रगटते ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आत्म गुणाचा तिथे फुलोरा ।
जनी वनी मनि सुगंध सारा ।।

९ जीव जडाचा बंध अनादी ।
बंधनात त्या कर्म उपाधी ।।

कुणापासुनी कोण जन्मते ।
प्रश्न खुळा हा नकोच येथे ।।

जमीनीतले अशुद्ध सोने ।
खाण कधीची कुणास पुसणे ।।

अशुद्ध सोने शुद्ध कराया ।
अग्नि गुणाची हवीच किमया ।।

ज्ञान शक्ति ती आत्म्याचा गुण ।
पाषाणातिल सुवर्ण कणकण ।।

घेत वेचुनी अशुद्ध त्यजिते ।
ज्ञान शक्तिला सर्व शक्यते ।।

१० वस्तु स्वभावे जरी एक ती ।
प्रति पर्याये अनेक गमती ।।

वस्तु वस्तुमधि गमे नित्यता ।
प्रति पर्याये नाशिवंतता ।।

पदार्थ येथे पदार्थ तेथे ।
आकर्षिति नित परस्पराते ।।

पदार्थ आपण दुजा होइना ।
आणि दुजाचा गुण हि साहिना ।।

११ निजस्वभावे स्वतंत्र असणे ।
परस्वभावामधि न गवसणे ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असणे नसणे धर्म जयाला ।
अनेकान्त गुण म्हणति तयाला ॥

१२ प्रति वस्तूंचा स्वतंत्र धर्म ।
नित परिणामी स्वगुण स्वधर्म ॥

वस्तुतत्व हे सर्व दिशांनी ।
पारखून घ्या विचार करुनी ॥

अनेकान्त हे तत्व सांगते ।
सम्यग्दृष्टी तिथेच स्फुरते ॥

१३ विवेक मतिंने विचार करिता ।
विचार सागर वळे तत्वता ॥

श्रद्धा त्यांची सम्यक् बनते ।
ज्ञान तयांचे पूर्ण प्रगटते ॥

चरित्र त्यांचे पवित्र मंदिर ।
मूर्तिमंत तो विवेक सुंदर ॥

समता शांती तिथेच संतत ।
वैर साहिना कुठे जगात ॥

ते सर्वोदय तीर्थ सुमंगल ।
विश्वाचे कल्याण आत्मबल ॥

तोच धर्म या दृश्य जगाचा ।
जगातल्या या जिवा जिवाचा ॥

१४ कुणि माता वा पिता असो मग ।
प्रजा प्रजापति शत्रु मित्र जग ॥

शील आणि व्रत बंध तयांना ।
पाप पुण्य फळ प्राप्त तयांना ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धर्म बोलवी धर्म चालवी ।
धर्म नीति कर्तव्य पालवी ॥

कर्तव्यातिल दोष पाप ते ।
कर्तव्यातिल दोष वैर ते ॥

जिवा जिवामधि दोष असा का ।
आत्म निरीक्षणि नुरेल शंका ॥

१५ धर्म सदा निःशंक अंतरी ।
धर्म पराङ्मुख जन अविचारी ॥

जन्म घेउनी विचार याचा ।
जो न करी तो बद्ध सदाचा ॥

धर्म मुक्तिचा राजमार्ग हा ।
त्या मार्गावर जीव उभा हा ॥

धर्म मुक्तिचे अलख निरंजन ।
धर्म जगातिल प्रसन्न जीवन ।

१६ जीव जन्मला जगी जगाया ।
जित्या जीवनी मुक्ति वराया ॥

साथ तयाला निसर्ग देई ।
निसर्ग नीती आत्मप्रवाही ॥

जगाव्याचा हक्क हवा तर ।
जगवावे पण स्फुरते उत्तर ॥

उत्तरात त्या आत्म प्रचीती ।
तिथेच मिळते सदैव शांती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खंड पांचवा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१ धर्म जागवी स्फूर्ति देवता ।
तीच अहिंसा अनादि गीता ॥

निसर्ग शक्ती उदार भारी ।
परि जीवातिल स्वार्थ आसुरी ॥

स्वार्थ आणि परमार्थ पारडे ।
परमात्म्याचे ज्ञान रोकडे ॥

जगा जगूंद्या धर्म जागवा ।
तरीच मुक्ती मिळे मानवा ॥

२ मानवतेचा धर्म अहिंसा ।
मानव्रतेचा अर्थ अहिंसा ॥

काम मोक्ष ही तिचीच बाळे ।
तिच्या शक्तितचि विश्व जन्मले ॥

मुक्त व्हावया जीव सिद्ध जरि ।
धर्म तयाची बघत पायरी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जन्म घेउनी जीवन जगता ।
हवि संसारी सावधानता ॥

३ जिथे असेना सावधान गुण ।
तो अज्ञानी प्रमाद लक्षण ॥

ज्ञानाविण ना मोक्ष जीवनी ।
असो प्रपंची परमार्थी कुणि ॥

प्रपंचात किति घात पात या ।
कुणी शत्रू ये युद्ध कराया ॥

युद्धाचे आघात भयंकर ।
स्वार्थबुद्धिचे ते प्रत्यंतर ॥

निःस्वार्थी ना जगात कोणी ।
मोक्ष इच्छिती आत्मज्ञानी ॥

४ आत्मनिष्ठ जन जीवन जगणे ।
जगता जगता जग जागविणे ॥

जगि जगण्याची क्रिया अपूरी ।
पुनर्जन्म घे जन संसारी ॥

जन्म मृत्युचे चक्र चुकाया ।
धर्म आचरुनि मुक्त व्हावया ॥

धर्म पाहिजे कर्म पाहिजे ।
कर्मयोगि गुरुग्रंथ पाहिजे ॥

५ गुरु प्रपंची गुरु परमार्थी ।
गुरु ग्रंथामधि अनंत शक्ती ॥

शक्ति अहिंसा सदैव निर्भय ।
समरांगणिही तिचाच हो जय ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धर्म रक्षणा कर्म आचरी ।
कर्म कराया शस्त्र सावरी ।।

माय मुलांना करिते ताडन ।
परी प्रीतिला न ये उणेपण ।।

देवि अहिंसा शस्त्र-धारिणी ।
माय प्रीतिची कर्म-कारिणी ।।

धर्म तराया धर्म कराया ।
धर्माचे प्रतिपालन व्हाया ।।

शस्त्रास्त्रासह सज्ज होउनी ।
स्वये उतरते धर्म-रणांगणि ।।

६ पाप वृत्ति नच मनुष्य धर्म ।
मनुष्य जाणति कर्म अकर्म ।।

धर्म अहिंसा कर्म मार्गरत ।
सत्कर्मावर प्रेम अखंडित ।।

जिथे धर्म ना तिथे कर्म ना ।
प्रेम पराङ्मुख जड जीवना ।।

झुंज झुंजुनी शस्त्रास्त्राने ।
धर्म रणांगणि यशस्वि होणे ।।

ही नच हिंसा नव्हे अधर्म ।
आत्म शक्तिचे जीवन कर्म ।।

७ सदैव जागृत देवि अहिंसा ।
परमात्म्यावर तिचा भरवसा ।।

विश्वासाचा घात साहिना ।
तिथे प्रगटते युद्ध प्रेरणा ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

युद्ध कशास्तव युद्ध कुणास्तव ।
कळे जिवाला जीवन वास्तव ॥

कोण आपुला कोण परावा ।
कुणी कुणाचा पक्ष धरावा ॥

सत्पक्षाची शक्ति अहिंसा ।
सत्यार्थावर तिचा भरवसा ॥

८ आत्मज्ञानी जन आनंदी ।
तयासि साधे सहज समाधी ॥

हा तर त्यांचा स्वाभाविक गुण ।
धर्म अहिंसा विश्व विलक्षण ॥

सदाचारि तो अति सुविचारी ।
प्रेम तयाचे जिवा जिवावरि ॥

घात कुणाचा कधी न करतो ।
मुनी महात्मा जगी वंद्य तो ॥

९ तोच यतीश्वर तोच मुनीश्वर ।
महा व्रती तो वृत्ति दिगंबर ॥

पूर्ण अहिंसा तो व्रत पाळी ।
श्रमण संस्कृती जगी आगळी ॥

लाखातिल तो एक महात्मा ।
पूज्य सदा तो गृहस्थधर्मा ॥

१० जीव आणि जड द्रव्य अनादी ।
जिवाजिवाला जगी उपाधी ॥

पृथ्वि आप वा तेज वायु तो ।
वनस्पतीचा गुणाकार तो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्पर्श तयांना ते एकेन्द्रिय ।
स्थावर वस्तु जगात निर्भय ॥

किडा मुंगि वा पशू पक्षि ते ।
जगि पंचेन्द्रिय मनुष्य तेथे ॥

तयास येते दया तयाची ।
प्रीति तयावर मुनिवर्याची ॥

११ कधी कुणाची घडो न हिंसा ।
विश्ववंद्य तो धर्म अहिंसा ॥

स्वये आचरुनि जनास सांगे ।
साध्य तया व्रत विरक्ती--योगे ॥

महाव्रती तो वंद्य महात्मा ।
मार्ग दावितो गृहस्थ-धर्मा ॥

१२ गृहस्थ धर्मी जनसंसारी ।
अशक्य त्यांना मुनिवर्या परि ॥

व्रताचार तो म्हणुनि लोक ते ।
सदाचार प्रिय अणुव्रताते ॥

प्रपंचात या पालन करिती ।
तयास गुरुजन श्रावक म्हणती ॥

१३ धर्म अहिंसा अधर्म हिंसा ।
पाप विमोचन धर्म प्रशंसा ॥

नेणुनि घडले पाप जरी करि ।
धर्म तयाला तिथे सावरी ॥

पाप नव्हे तो प्रमाद घडला ।
तिथे न हेतु दोष कुणाला ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१४ दोष मनातिल पाप प्रकृती ।
सावधान गुण धर्म जागृती ॥

धर्म मार्गरत मी पुण्यात्मा ।
मला मानिना तो पापात्मा ॥

बोल बोलता दुखावते मन ।
दुजा दुखविता दोष घडे पण ॥

कुणी कुणाला मनी दुखविले ।
कुणी कुणाचे प्राण घेतले ॥

दुखावले मन ती पण हिंसा ।
प्राण घेतला ती पण हिंसा ॥

१५ एक पातकी भाव-क्रिया ती ।
एक पातकी द्रव्य-क्रिया ती ॥

असो भाव की असो द्रव्य ते ।
तया दुखविता पातक घडते ॥

पातक हिंसा शस्त्र दुधारी ।
स्पर्श करीना तो सुविचारी ॥

१६ सत्यमेव जयते हा धर्म ।
जगावयाचे जगि सत्कर्म ॥

कर्म पुण्यमय चिरंजीव ते ।
कर्म पातकी जनि संचरते ॥

पाप वृत्तिच्या क्रूर श्वापदा ।
हवी ग्रासण्या जीव संपदा ॥

अहिंसेस ये दया तयाची ।
क्रूर श्वापदे शत्रु तियेची ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वार्थ बुद्धिचा मानव प्राणी ।
गमे भयंकर क्रूर पशूहुनि ॥

तिथे प्रगटते युद्ध भयंकर ।
लढे अहिंसा करि घेउनि शर ॥

१७ शरांत शक्ती सत्यार्थाची ।
सत्य शाश्वती जगि विजयाची ॥

विजय जिवाच्या जीव रक्षणा ।
धर्म रक्षणा कर्म रक्षणा ॥

मृत्यु मुखामधि पाप प्रबळते ।
अहं बुद्धिने स्वयेच शिरते ॥

शिरते मरते उरे शांतता ।
तीच अहिंसा स्वधर्म सत्ता ॥

जगि हिंसारत जीव प्रमादी ।
पाप प्रकृती तिथे उपाधी ॥

जिथे असेना प्रमाद लक्षण ।
आणि नांदतो सावधान गुण ॥

साधु गुणे कुणि जगो मरो वा ।
पुण्य भाव परि तयास ठावा ॥

तिथे प्रसंगी घडेल हिंसा ।
पुण्य प्रकृती शुद्ध अहिंसा ॥

१८ सत्याने जग मंगल बनते ।
सत्याने सौंदर्य चमकते ॥

असत्य खपते नच सत्याला ।
तिथे न थारा अज्ञ तमाला ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कोण प्रपंची कुणि परमार्थी ।
व्यवहाराची एकच रीती ॥

जन हृदयातुनि सत्य उमलते ।
प्रेम पूर्ण व्यवहार साधिते ॥

सत्य जगाचे सदैव भूषण ।
कठोर अप्रिय वचन विवेचन ॥

अशा प्रमादा तिथे न आश्रय ।
सावधानता धर्म निरामय ॥

१९ धर्म बोलती धर्म चालती ।
सत्य धर्म ही जगि जन रिती ॥

निसर्गात या सत्य प्रगटते ।
सहज स्वभावे जना बाहते ॥

सत्य शोधिते भेद विकारी ।
निर्विकारिता तया अंतरी ॥

आत्म स्वभावे सत्य रंगते ।
निजानंद गुणि सत्य डोलते ॥

२० अपूर्ण जीवन पूर्ण होउदे ।
दु:खित मानव सुखी होउदे ॥

सत्य न हो वश कधि ढोंगाला ।
सत्य न हो वश कधि कपटाला ॥

सत्य जिवातिल भाव फुलोरा ।
सत्य जिवातिल प्रकाश सारा ॥

वस्तु स्वभावे अनंत असती ।
परि सत्याते स्वये शोधिती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राष्ट्र शक्तिची कमान चढते ।
विश्व शांति ही तिथे नांदते ॥

२१ सद्द्रव्याचा मानव स्वामी ।
अस्तेय व्रत हित परिणामी ॥

आत्मगुणाचा असे तोच धनि ।
कुलाचार कुल धर्म मुगुट मणि ॥

परद्रव्याची तया न ममता ।
रुचे न चोरी तया तत्वता ॥

आत्मगुणाचा असे तोच धनि ।
कुलाचार कुल-धर्म मुगुट मणि ॥

परद्रव्याची तया न ममता ।
रुचे न चोरी तया तत्वता ॥

पराधीनता पाप मानितो ।
पाप कर्दमी कधी न रुततो ॥

बद्ध भावना पारतंत्र्य ते ।
पारतंत्र्यि ना सौख्य तयाते ॥

गृही ग्रामि वा असो स्वदेशी ।
जगात मिळते कीर्ति तयासी ॥

स्वार्थ सुखास्तव कुणी कुणाना ।
नको हडपणे कळे तयाना ॥

आत्महिताची ओळख पटते ।
विश्व कुटुम्बी प्रेम बहरते ॥

सावधान गुण आत्म प्रचीती ।
स्वतंत्रता ती तिथेच शांती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लोक संग्रही प्रपंच बाणा ।
परि अपरिग्रह हवा जिवाना ॥

निराकूल मन हवे जीवनी ।
लोभ वृत्तिची नको जाचणी ॥

आकुलता हा लोभ प्रभावी ।
निराकूल मति सहज स्वभावी ॥

सहज स्वभावे मनास शांती ।
तिथेच घडते जीवन क्रांती ॥

२३ ब्रह्मचर्य व्रत सदैव सुंदर ।
ब्रह्मचारिते कुणि नारीनर ॥

आत्म सुखामधि विहार करिती ।
जन संसारी सौख्य वितरिती ॥

भौतिक परिमित सांत जगाला ।
सुशीलता दे रंग निराळा ॥

निसर्ग ओढित मनास इकडे ।
धर्म जागवी जनास तिकडे ॥

जनामनाचे युद्ध अखंडित ।
युद्ध कुशलता ब्रह्मचर्य व्रत ॥

२४ काम कल्पना सदा विकारी ।
काम कल्पना अति अविकारी ॥

काम कल्पना परगृहवासी ।
काम कल्पना मुकवि सुखासी ॥

शीलवंत तो लढे प्रसंगी ।
शीलवंत हो कीर्तिवंत जगि ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दुर्बलता निःसत्व निराशा ।
जगी झाकिते आत्म प्रकाशा ॥

हवे आत्मबल सदा जीवनी ।
जिथे सत्व ना तो नच ज्ञानी ॥

२५ स्वदार रति ही प्रपंच निष्ठा ।
नसे प्रपंची काम प्रतिष्ठा ॥

असुनि प्रपंची जे न बहकले ।
ब्रह्मचर्य ते प्रपंचातले ॥

इंद्रिय निग्रहि जन संसारी ।
परमार्थाचे प्रेम तयावरि ॥

शुद्ध स्वच्छ संसार तयाचा ।
राज मार्ग तो परमार्थाचा ॥

२६ ब्रह्मचर्य व्रत उदार सद्‌गुण ।
सदा विवेकी सदैव चिंतन ॥

काय हवे वा काय नको जगि ।
वृत्ति भली वा वृत्ति वाउगी ॥

तयास कळते तयास वळते ।
भोगवादि मन तिथेच चळते ॥

२७ ब्रम्हचर्य व्रत प्रसन्न जीवन ।
संसारातुनि नव्हे पलायन ॥

घाण घरातिल गृहस्वामि तो ।
दूर कराया सदैव झटतो ॥

साह्य तया करि गृहस्वामिनी ।
गृही प्रगटते प्रजा सद्‌गुणी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कुटुम्ब ह्मणजे प्रजाराज्य ते ।
विश्व कुटुम्बी प्रेम प्रगटते ॥

तिथे रंगते मन सुविचारी ।
तिथे न मैथुन भोग विकारी ॥

अशा प्रपंची ज्ञान हरखते ।
दिव्यत्वाचे दर्शन घडते ॥

२८ सत्य अहिंसा ब्रम्हचर्य व्रत ।
करिति प्रपंची सुखमय जीवित ॥

नितान्त सुंदर धर्म साधना ।
गृहस्थ यतिवर क्रमिति जीवना ॥

कुणी उणे ना कुणी अधिक ते ।
सदाचार गुणि जीवन फुलते ॥

इथे तिथे तो धर्म फुलोरा ।
धर्म हीन नर पाप पसारा ॥

२९ परमात्म्याची शक्ति जीवनी ।
कधि न गुंतते पापाचरणी ॥

पाप निवारी जीव यथाक्रम ।
तोच जिवाचा पुण्य पराक्रम ॥

३० गृहस्थ म्हणजे श्रावक मेळा ।
क्रमे साध्य करि परमार्थाला ॥

प्रपंच म्हणजे परमार्थाची ।
प्रयोग शाळा गमे सदाची ॥

प्रपंचात ना सौख्य जिवासी ।
परंतु मानव भुले तयासी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जीवन शाश्वत नव्हे कळे पण ।
कळुनि वळेना मानव लक्षण ॥

त्यात सुलक्षणि कितीक असती ।
व्रताचार गुणि प्रपंच क्रमिती ॥

क्रमे त्याच मन निर्मळ होते ।
जीव पात्र हो परमार्थाते ॥

३१ भोगवादि मन अवखळ भारी ।
तया आवरित जो संसारी ॥

तोच शाहणा जन प्रापंचिक ।
परमार्थाची तयास ओळख ॥

संसाराचा बंध सुटेना ।
परि दृढबंधन सोडविताना ॥

मना घालिती लगाम जे जन ।
ते प्रापंचिक पुण्य परायण ॥

३२ ध्यान आणि उपवास पारणे ।
देव आणि गुरु साधु दर्शने ॥

देह झिजवितो चरित्र गातो ।
तया सारखे होइन म्हणतो ॥

आल्या अतिथा दान देतसे ।
तपोधना सन्मान देतसे ॥

कुणा अन्न दे कुणा औषधी ।
कुणा अभय दे कुणा ज्ञान निधि ॥

भुकेजलेला जीव तृप्त हो ।
रोग ग्रस्त जन रोगमुक्त हो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कुणी गांजिती दीन दुर्बला ।
करित संकटी सहाय्य त्याला ।।

कुणी ज्ञानि जन शिक्षण देती ।
आणि साधिती लोक जागृती ।।

कुणि अभ्यासक समाज सेवक ।
ग्रंथ निमिती धर्म प्रवर्तक ।।

करी प्रीतिने सहाय्य त्याते ।
नाव चतुर्विध दान तयाते ।।

३३ तिथेच जप तप ध्यान धारणा ।
तिथेच पुजा पाठ प्रेरणा ।

तिथे चतुर्विध दान घडे ते ।।
आणि नवविधा भक्तिहि घडते ।।

तिथेच घडतो साधु समागम ।
आणिक झडतो प्रपंच विभ्रम ।।

३४ असुनि प्रपंची मन परमार्थी ।
सुख दुःखातहि मनात शांती ।।

नश्वर काया क्षणिक सौख्यते ।
म्हणुनि इच्छि मन शाश्वत सुखते ।।

सहज तुटे मग प्रपंच बेडी ।
आत्म सुखाची स्फुरे आवडी ।।

आत्म सुखामधि रंगुनि जातो ।
कळे न केव्हा देह पडे तो ।।

धन्य प्रपंची मुक्त महात्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खंड सहावा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१ ज्ञान व्हावया हवी सन्मती ।
वीतराग गुण तिलाच म्हणती ॥

जन्म जरा ना मरण तयाते ।
क्षुधा तृषा ना झोप तयाते ॥

रोग राग भय शोक मोह ना ।
नसे प्रेम वा द्वेष भावना ॥

नसे अशांती न खेद विस्मय ।
श्रम न अहंता सदा जितेंद्रिय ॥

आत्म सुखी ते जीव सद्‌गुणी ।
पुराणकालिन मुनी महामुनि ॥

असतिल आजहि उद्या जन्मतिल ।
जे उद्धरतिल जीव जगातिल ॥

जगद्‌गुरू ते निजानंद मति ।
नमस्कार त्या त्रिवार प्रणती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

२ धन्य तयाची विवेक निष्ठा ।
अध्यात्माची प्राण प्रतिष्ठा ॥

त्रिखंड कीर्ती त्रिकाल ज्ञानी ।
काया वाचा मने करोनी ॥

जीव व्हायचा जगी आत्मरत ।
सदा सिंचिती उपदेशामृत ॥

३ अनंत कोटी जीव जगी या ।
जन्म घेति नित सौख्य वराया ॥

परि न तयांना सौख्य लाभते ।
जन्म मृत्यु भय तया बाधते ॥

सुख दुःखाची अशी साखळी ।
कुणी कळेना कशी निर्मिली ॥

या बंधातुनि कसे सुटावे ।
आत्महितास्तव कसे झटावे ॥

मार्ग दाविती गुरुजन सज्जन ।
उपदेशामृत सदैव सिंचुन ॥

४ नाशिवंत जग शाश्वत आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

असुनि खरे का खूण पटेना ।
अज्ञ तमाने दुःख हटेना ॥

दृश्य जगत् जड मूळ प्रकृती ।
तिथे मातिच्या मूर्ति आकृती ॥

कणा कणा मधि जीव गुंतला ।
जीव दान ते मिळे सृष्टिला ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

५ सृष्टि जन्म दे वृक्ष वल्लिना ।
पान फुलांना आणि फळांना ॥

कितीक आंबट गोड फळे ती ।
जीव जगातिल नित्य सेविती ॥

विषहि ओकिती किति तरुवेली ।
तेहि सेवुनी कितीक मेली ॥

जन्म मृत्युचा लंपडाव हा ।
प्राण घातकी गुप्त घाव हा ॥

बसेल केव्हा कुणि न जाणतो ।
जीव भ्रमाने दुःखित होतो ॥

६ जगि एकेंद्रिय जीव जागृती ।
मातृहीन ते निगोद म्हणती ॥

तरीहि तेथे प्राण संभवे ।
तरीहि तेथे ज्ञान संभवे ॥

नच मायेचा स्पर्श तयाना ।
तिथे स्थान ना गुणा अवगुणा ॥

रुजते भिजते हले डुले पण ।
जीव वनस्पति अंति जळे पण ॥

परी असे का कुणा न कळते ।
दुःख जिवाचे ज्ञान अल्प ते ॥

७ एक श्वास तो काळ कितीसा ।
परि न जिवाचा तिथे भरवसा ॥

तशी अशाश्वत जीव सृष्टिही ।
आत्म शक्ति पण गमे तिथेही ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पृथ्वि अग्नि जळ आणिक वारा ।
विविध वनस्पति जीव पसारा ॥

लाजाळूचे पान लाजता ।
झुळ झुळणारे गीत ऐकता ॥

हलते डुलते नृत्य पाहुनी ।
हर्षित होते मूक मेदिनी ॥

आणि पेटतो मधीच वणवा ।
दुःख सांगता ये नच जीवा ॥

८ ही एकेंद्रिय जीव संपदा ।
जन्म मृत्युची भोगि आपदा ॥

हात पाय ना कर्ण नेत्र ही ।
केविलवाणी कळे न काही ॥

मरण चुकेना म्हणुनि मरावे ।
मरणाचे ही स्मरण नुरावे ॥

९ महा पातकी जीवन असले ।
त्याहुनि काही पुण्य गवसले ॥

जगि एकेंद्रिय जीवन सरते ।
तरी जिवातिल तगमग उरते ॥

कीटक मुंगी भृंगगती ती ।
दोन तीन वा चतुरेंद्रिय ती ॥

एकाहुनि जरि दुजे शहाणे ।
ज्ञान माखले परि अज्ञाने ॥

त्यातुनि कोणा पुण्य साधते ।
मग पंचेन्द्रिय प्राणि होति ते ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१० जीव घेति ते जन्म जळी स्थळि ।
आणि तयाची तऱ्हा निराळी ॥

वाघ सिंह कुणि गाय वासरू ।
मनुष्य त्यातिल एक लेकरू ॥

एक दुजाला मारुनि खातो ।
एक दुजाला सदा भिववितो ॥

एक राबतो दुजा राबवी ।
हार जीत ही जगास ठावी ॥

११ जीव जिवाचा नव्हेच कोणी ।
पक्षि श्वापदे मानव प्राणी ॥

जरि पंचेंद्रिय मानव मेळा ।
तरी मनाने गमे आगळा ॥

मुकी बिचारी क्रूर श्वापदे ।
क्षुधा तृषा ती तया दुःख दे ॥

कधी भुकेने व्याकुळ होती ।
कुण्या दुर्बळा मारुनि खाती ॥

नित्य गांजिती सबळ दुर्बळा ।
जीव पाप करि भूकेजलेला ॥

१२ सिंह व्याघ्र जरि जपति पिलांना ।
आणि मारिती गाइ गुरांना ॥

गाइ वासरे जरि न क्रूरती ।
जीव वनस्पति निपटुनि खाती ॥

वाघ सिंह वा गाइ वासरे ।
वनस्पतीचे भाव हासरे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कां हसणारे क्षणात रडती ।
सबळ दुर्बळा सदैव छळिती ॥

१३ छळणारांचा तो न पराक्रम ।
जगि दुबळ्याचा गमे दिनक्रम ॥

ते दैनंदिन कृत्य मृत्युचे ।
पिसाळलेल्या मूढ भुकेचे ॥

परि मानव का पिसाट प्राणी ।
का मूढाहुनि मूढ गमे जनि ॥

१४ तया आवडे जीव वनस्पति ।
पशु पक्षाची तयास प्रीती ॥

वाघ सिंह ही अंकित त्याचे ।
घरी कळप ते गाइ गुरांचे ॥

खुराड्यात किति पक्षि कोंडितो ।
आणि तयांना मारुनि खातो ॥

जलचर स्थलचर भक्ष तयाचे ।
भूक तयाची जगात नाचे ॥

राज्य पाहिजे म्हणुनि जगी रण ।
भूक शमेना रण-मरणा विण ॥

अजाण मानव पिसाट पशु तो ।
जित्या जिवनी नरक निर्मितो ॥

१५ मानव म्हणजे मनो भूमिका ।
तिथेच शंका तिथे कुशंका ॥

भूमिकेत त्या विश्व साठवे ।
स्वर्ग मृत्यु पाताळ आठवे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

इंद्र स्वर्गीचा देव होत तो ।
पुण्य संपता परतुनि येतो ॥

जन्म मृत्युचे चक्र चुकावे ।
विचार करितो सहज स्वभावे ॥

स्वभावेच त्या बंध उलगडे ।
ते भ्रम निरसन पुण्य केवढे ॥

१६ भ्रम निद्रेतुनि जीव जागला ।
तरि न शांति सुख मिळे तयाला ॥

तयास कळते रूप सृष्टिचे ।
तरि न ज्ञान त्या परमात्म्याचे ॥

जगी जन्मती जीव वनस्पति ।
कितीक जगती कितीक मरती ॥

कीटक मुंगी आणि भृंग ते ।
क्रूर श्वापदे पशु पक्षी ते ॥

परस्परांचे वैर साधिती ।
पाप आचरुनि नरक भोगिती ॥

किती भयंकर नरक यातना ।
यातनेस त्या जगी अंत ना ॥

१७ कळे तया तो मानव प्राणी ।
तया असे मन तयास वाणी ॥

तोच मनाने विचार करितो ।
आणि वाणिने दुःख वदे तो ॥

तया आठवे दुःख जगाचे ।
जगातल्या या मुक्या जिवाचे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुक्या जिवाची प्रगति परागति ।
मानव प्राणी सहज जाणती ॥

१८ तया आठवे स्वर्ग नरक तो ।
तया आठवे मृत्यु लोक तो ॥

मृत्युलोकि या पुण्य करावे ।
मग स्वर्गीचे सौख्य वरावे ॥

१९ स्वर्ग लोकि जव जीव विहरतो ।
इन्द्र येउनी स्वागत करितो ॥

कल्पतरू ये कामधेनु ये ।
वरि चिंतामणि रत्नकरी ये ॥

काय हवे ते तया मिळे पण ।
हवे गाठिशी तिथे पुण्य धन ॥

२० जीव स्वर्गिचा जरी देव तो ।
पुण्य संपता परतुनि येतो ॥

पुनरपि जननं पुनरपि मरणं ।
पुनरपि जननी जठरे शयनं ॥

कालचक्र नित भ्रमे भोवती ।
जीव विसरला परमात्म्या प्रति ॥

सम्यग्दर्शन ज्ञान चरित ना ।
म्हणुनि जीव जगि भोगि यातना ॥

२१ अज्ञानाचे पटल केवढे ।
अभ्दुत सुंदर जगा एवढे ॥

वस्तुमात्र जरि जगात सुंदर ।
तरी क्षणोक्षणि नाश भयंकर ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जीव आपुले मूळ विसरला ।
मी तर माणुस म्हणू लागला ॥

तो पंचेंद्रिय जीव दुर्गुणी ।
विपरित मतिची तिथे पेरणी ॥

रानदांडगे पीक तेथले ।
कणाकणामधि प्रेम गुंतले ॥

प्रेम नव्हे तो भ्रम जीवाचा ।
जिवा जिवातिल चैतन्याचा ॥

२२ जगी जडाशी जडता नाते ।
सत्य कळेना जड-जीवाते ॥

अमूर्त आत्मा मूर्त जीव तो ।
जड सहवासे मूढ बने तो ॥

तयास होते आत्मविस्मृती ।
आणि भ्रमे तो जडाभोवती ॥

२३ जीव आणि जड आश्रव बंधन ।
संवर निर्जरा आणि मोक्ष पण ॥

सप्त तत्व हे ज्ञान जयाला ।
नसे जीव तो सुखास मुकला ॥

तिथेच विपरित मती उपजते ।
आणि झाकिते चैतन्याचे ॥

२४ अनुपम सुंदर आत्म चेतना ।
असुनि कळेना बद्ध जिवाना ॥

पुद्गल वा नभ धर्म अधर्महि ।
आणि पाचवे काल द्रव्य-ही ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

या पाचाहुनि जीव भिन्न तो ।
परी जीव तो तिथेच भ्रमतो ॥

२५ महामोहिनी ही विपरित मति ।
स्वतंत्र आत्मा गणी जिवाप्रति ॥

पुद्गल म्हणजे चलन वलन ते ।
इथे एक तर दुजे तिथे ते ॥

क्षणात गवसे क्षणात नासे ।
नाशिवंत जग जिवास भासे ॥

२६ जग जडबुद्धी जीव नव्हे जड ।
परि जडतेतुनि सुटणे अवघड ॥

जीव जडाचा धर्म स्वीकरी ।
परावलम्बन पाप आचरी ॥

सहवासातुनि स्वभाव घडला ।
दोष कुणाला काळ गतीला ॥

२७ नभ अवलोकी काल गती ती ।
जीव जडाची कुसंगती ती ॥

सुख-दुःखी मी राव-रंक मी ।
गृह धन गोधन गणाधिपति मी ॥

मज कन्या सुत मज प्रिय कांता ।
अज्ञ सूज्ञ मी भाग्य विधाता ॥

देह लाभता मीच जन्मतो ।
आणि नासता मी पण मरतो ॥

जड वस्तूचा संग दुःखमय ।
परी जीव घे तिथेच आश्रय ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

२८ परवस्तूवर ममत्व जडते ।
तिथे जिवाचे सुख अवघडते ॥

नामवंत मी पुण्यवंत मी ।
स्वर्ग सुखाचा धनी तोच मी ॥

जीव भ्रमे जरि किति बडबडला ।
तरि भव-बंधन सुटे न त्याला ॥

जीव जडाची सुटे शृंखला ।
तिथे आत्मसुख मिळे जिवाला ॥

२९ वैराग्याविण ज्ञान होइना ।
वैराग्याविण बंध सुटेना ॥

बंध मुक्तिचा मार्ग सुखाचा ।
स्वभाव सुंदर वैराग्याचा ॥

परि न विरागी मती रंगते ।
भव चक्रातचि सौख्य मानिते ॥

तिथे शुभाशुभ बंध कितीतरि ।
भ्रमति निरंतर भव चक्रा वरि ॥

त्यात भ्रमाने जीव गुंततो ।
शिव रूपाला विसरुनि जातो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खंड सातवा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१ अनुपम सुंदर आत्मरूप ते ।
जिवा जिवामधि नित्य विहरतें ॥

जीव जडाची घडे संगती ।
सगुण मनोरम विश्व प्रकृती ॥

त्या विश्वामधि अनंत प्रतिमा ।
गमे तया मधि तो जीवात्मा ॥

अमूर्त सुंदर ज्ञान रूप जरि ।
जीव प्रकृती भ्रमे भूवरी ॥

जीव आणि जड आश्रव बंधन ।
संवर निर्जरा मोक्ष तिथे पण ॥

मुक्त असुनि का जीव भ्रमावा ।
मुक्ति मार्ग तो तया न ठावा ॥

२ जगि जीवात्मा निजानंद मति ।
जगि परमात्मा मुक्त मनःस्थिति ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जित्या जीवनी विमुक्त जीवन ।
आत्म रूप ते तिथे न बंधन ॥

जीव सुखी पण पडे बंधनी ।
बंधनात त्या दुःख भोगुनी ॥

मुक्त व्हावया जरि धडपडतो ।
विपरित मतिने पुनः भ्रमे तो ॥

मुक्त असुनि ही बद्ध म्हणविणे ।
बंधनात त्या सौख्य मानणे ॥

विपरित मति ही सुटेल जेव्हा ।
भव बंधन हे तुटेल तेव्हा ॥

३ आत्म सुखी तो मुक्त महात्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

कोण असे मी जया न कळते ।
कुठे असे मी जया न कळते ॥

मार्ग कोणता आत्म सुखाचा ।
तया न जगि या कळावयाचा ॥

४ मी परमात्मा जगि जड बंधन ।
बंधनात मी म्हणुनि जीव पण ॥

जया जीवनी स्फुरे विरक्ती ।
तिथे आत्म-सुख आत्म-जागृती ॥

५ सम्यग्दर्शन ज्ञान चरित ते ।
निजानंद मति तिथेच स्फुरते ॥

तिलाच कळते जीव कोण तो ।
तिलाच कळते जीव कसा तो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तिलाच कळते जगात का जड ।
तिलाच कळते जीवन अवघड ॥

६ जीव जडाचा शत्रुमित्र ना ।
परि जड-बुद्धी भ्रमवि जिवांना ॥

तिथेच वादळ तिथेच लाटा ।
तिथेच आश्रव भाव करंटा ॥

तो भव सागर भावबंध तो ।
जीव जडाच्या गुणी गुंततो ॥

७ बंध मुक्तिचे ज्ञान जयाला ।
संवर निर्जरा घडे तयाला ॥

विपरित मतिचे तरंग नाना ।
जगी भ्रमविती जिवा जिवांना ॥

जीव जाणता अति सुविचारी ।
आश्रव आवरि बंध निवारी ॥

संवर निर्जरा नाव तयाते ।
जीव विवेकी वरित मुक्तिते ॥

८ जिथे त्याग हा तिथे विरक्ती ।
सुखी जीव तो निजानंद मति ॥

जीव मुक्त तो मुक्त व्हायचा ।
परि न लाभ का घडे मुक्तिचा ॥

ती विपरित मति कालविते विष ।
अहं बुद्धिचे मनात किल्मिष ॥

९ ही नैसर्गिक अंह भावना ।
जगी भ्रमविते जिवा जिवांना ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जीव जडाचा वरुनि धर्मगुण ।
म्हणे मुक्त मी महामूर्ख पण ॥

भाव जिवाचे भाव जडाचे ।
तिथे नांदते द्वैत सदाचे ॥

जगि पंचेन्द्रिय जीव भाव तो ।
विषय कर्दमी सदैव रमतो ॥

कुदेव तेथे कुधर्म कथिती ।
आणि कुगुरु ते विविध प्रकृती ॥

नाव तयांना देव-धर्म-गुरु ।
निवडुंगाला म्हणति कल्पतरु ॥

१० देव धर्म ते आत्म घातकी ।
आणिक गुरु ते महा पातकी ॥

जिथे न सम्यग्ज्ञान न दर्शन ।
तिथे चरित ते असेल कोठुन ॥

सम्यग्दर्शन ज्ञान चरित ना ।
जगी जीव तो मुक्त होइना ॥

११ आत्म सौख्य ते अति हितकारी ।
आकुलता ती सर्व निवारी ॥

आकुलतेचा नाश सौख्य ते ।
सम्यग्दर्शन ज्ञान चरित ते ॥

१२ सत्यार्थाचे शिखर मोक्ष तो ।
निश्चय मार्गे मोक्ष मिळे तो ॥

निश्चय मार्गी हवी साधना ।
गुण व्यवहारे साध्य जिवाना ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

या सर्वाहुनि अतीत मुक्ती ।
स्वतंत्र आत्मा आत्म प्रचीती ॥

१३ निज आत्म्यावर सदैव श्रद्धा ।
निज आत्म्याची ज्ञान संपदा ॥

निज आत्म्यातचि सदैव रमतो ।
हा तर निश्चय मार्ग गमे तो ॥

व्यवहाराचा मार्ग तिथे पण ।
परी कळेना दृढ श्रद्धे विण ॥

१४ जगि जीवादीं सात तत्वते ।
व्यवहारी मन मानि तयाते ॥

खरे देव गुरु आणि शास्त्रही ।
त्यावरि श्रद्धा सदैव राही ॥

सम्यग्दर्शन म्हणति तयाला ।
तत्व मान्य जगि व्यवहारा ॥

१५ खरे देव गुरु आणि शास्त्र ते ।
ज्ञान तयाच्या मनात ठसते ॥

सम्यग्ज्ञानी तो व्यवहारी ।
ज्ञान मार्ग तो सदा आचरी ॥

सत्यदेव तो कळे तयाला ।
सत्यवादि गुरु पूज्य तयाला ॥

सत्शास्त्राचे ज्ञान अंतरी ।
विहित कर्म तो नित्य आचरी ॥

सत्य अहिंसा व्रताचारि तो ।
जिवा जिवा वर करी प्रेम तो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तयास सम्यक् चरित्र म्हणती ।
जगि व्यवहारी रीत रम्य ती ॥

१६ चैतन्याची विविध प्रेरणा ।
कर्म कर्मफल ज्ञान चेतना ॥

कर्म आपुले भोगिति प्राणी ।
परी निराळा मनुष्य त्याहुनि ॥

तयास असते मनो-भावना ।
पाप पुण्य ते कळे तयाना ॥

तया लाभते कर्माचे फळ ।
पवित्र कोठे कुठे अमंगल ॥

श्रेष्ठ तयाहुनि ज्ञान भावना ।
तिथे नांदते आत्म प्रेरणा ॥

१७ प्रसन्न आत्मा शुद्ध सुलक्षण ।
कर्मफलाचे तिथे न बंधन ॥

घडे कर्म तरि तिथे न इच्छा ।
परमात्म्याची शुद्ध सदिच्छा ॥

जीव सदाचा असे ज्ञानमय ।
स्वभाव दर्शन चरित निरामय ॥

निजरुपाला स्वये विसरतो ।
कर्म बंधनामधि सापडतो ॥

राग लोभ भय बंध तयाचे ।
गढूळ करिती ज्ञान तयाचे ॥

तुरूंगात त्या करी पदार्पण ।
कर्मबंध हे अति प्रिय मानुन ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१८ जीव स्वभावे विरक्त होतो ।
वैभाविक गुण कर्म भाव तो ॥

अज्ञानाने जीव जखडला ।
काया वाचा मने गुंतला ॥

आत्म प्रदेशी घडते स्पंदन ।
तिथेच सूक्ष्म कर्माणू पण ॥

बंध तयाचा महा विकारी ।
करी आक्रमण जिवाजिवावरि ॥

तवा तापला त्यावर पाणी ।
पडे क्षणामधि जात जळोनी ॥

तोच जिवाचा कर्मबंध तो ।
जगतो मरतो पुनः जन्मतो ॥

१९ अज्ञानातिल अणु परमाणू ।
आत्म शक्तिशी झुंज घेति जणु ॥

तिथेच पुद्गल विभावना ती ।
आत्म शक्तिचा घात इच्छिती ॥

ज्ञानावरणे ज्ञान झाकते ।
दर्शन कर्मे दृश्य लपे ते ॥

ढळवित श्रद्धा मोहनीयता ।
चरित्र चाळवि मोहनीयता ॥

शक्ति असेना अंतरायतो ।
वीर्य टिकेना अंतरायतो ॥

दान देइना लाभ घडेना ।
भोग आणि उपभोग होइना ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घडे घात पण कळू न देई ।
अंतराय तो करि नवलाई ॥

२० वेदनीय ते कर्म दुधारी ।
कुठे देइ सुख दुःखहि भारी ॥

आत्म सुखाचा लेश न तेथे ।
मिळेल कैसे प्रपंचात ते ।

नाम कर्म ते देहरचिवला ।
आयु कर्म तो जगू लागला ॥

जिथे तिथे ते जीव शरीरी ।
आयुष्यावर मदार भारी ॥

२१ नामकर्म जगि क्षणाक्षणाचा ।
खेळ दाखवी स्थिती गतीचा ॥

कुंभाराचें जणू चक्र ते ।
फिरे चांगले कधी वक्र ते ॥

तिथे मृत्तिका कुंभ किती तरि ।
तोच जीव हा शरीर धारी ॥

२२ श्वासोश्वासी पुद्गल लक्षण ।
तिथे इंद्रिये आणि तिथे मन ॥

रंगरूप रस गंध कांति ती ।
स्थिर अस्थिरता भाव निर्मिती ॥

तिथे शुभाशुभ कर्म बंध ते ।
यश अपयशही तया बाधते ॥

गोत्र कर्म जगि प्रपंच वाढे ।
जित्या जिवाचे तिथे पवाडे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कुठे उच्चता कुठे नीचता ।
कुठे बंध वा बंध मुक्तता ।।

कर्म बंध हे जगी नांदती ।
तीच अष्टधा कर्म प्रकृती ।।

२३ किती वदावी कर्म कहाणी ।
जीव जाणता तो अज्ञानी ।।

अज्ञानाचे घालि आवरण ।
ते जगि पुद्गल द्रव्य विलक्षण ।।

जीव होत जव राग द्वेषी ।
भाव शुभाशुभ होति तयासी ।।

तिथे प्रगटती विकार नाना ।
मोहविती ते जिवाजिवांना ।।

२४ पुद्गल शक्ती महामोहिनी ।
जीव विकारी तिथेच भुलुनी ।।

तो कळसूत्री बने बाहुली ।
पुद्गल करणी जिवा भोवली ।।

२५ कुणी घाल्तिती दुधात पाणी ।
आणि प्राशिती दूध मानुनी ।।

परंतु नोहे शुद्ध दूध ते ।
पुद्गल करणी जिवा मोहिते ।।

२६ दूध निराळे निराळेच जल ।
कर्म बंध हे घडवित पुद्गल ।।

मेघ वृष्टि हो भूतलि पाणी ।
सृष्टि बहरते फुला फळांनी ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ती नैसर्गिक घडते घटना ।
तेवि बंध हे घडति जिवांना ॥

२७ निमित्त नैमित्तिक हे बंधन ।
जीव सुटेना कधी तयांतुन ॥

जीव प्रकृती भाव तिथे ते ।
गुण कर्मांचे बंधन घडते ॥

उपशम सत्ता नाश तिथे क्षय ।
उदय जिथे तो प्रपंच अक्षय ॥

२८ काहि नासते काहि राहते ।
उरे तयातुनि उयद पावते ॥

उदय पावते कर्मांचे फळ ।
कधी होइना जीवन निर्मल ॥

अशुद्ध तेथे उरे भाव तो ।
तो परिणामी बंध पावतो ॥

देह वचन मन पचेंद्रियते ।
श्वास आणि आयुष्य तिथे ते ॥

दश प्राणांनी जीवन जगतो ।
जगुनि जीवनी प्रपंच करितो ॥

चैतन्या मधि वसे शुद्धता ।
चिर परिणामी विशुद्ध सत्ता ॥

तीच चेतना विशुद्ध जीवन ।
जीव-भाव तो महा विलक्षण ॥

२९ जीव चेतना तयां ज्ञान ते ।
तिथेच दर्शन सदैव घडते ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वपर वस्तुना स्वये जाणतो।
स्वपर वस्तुना स्वये पाहतो ॥

तीन काळ वा तीन लोकही।
अखंड ज्ञानी क्षणात पाही ॥

प्रत्यक्षामधि आत्म्याचा गुण।
पराधीनता परोक्ष लक्षण ॥

ऐकुनि शिकणे परोक्ष मति ती।
इंद्रिय मन ते सहाय्य करिती ॥

स्वयं पूर्ण ते सम्यग्दर्शन।
आत्म जागृती पुण्य परायण ॥

सम्यग्दर्शन सहित सुमति ती।
सुमति - ज्ञान ते पुण्य प्रचीती ॥

३० मिथ्यादर्शन जगी कुमति ती।
जिवाजिवाची अधोगती ती ॥

सुश्रुत ज्ञानी शद्ब संहिता।
करि जिनवाणी प्रसन्नचित्ता ॥

गृहस्थ मुनिची तिथेच चरिते।
धर्म आणि आचार ग्रंथ ते ॥

द्रव्य गुणासह तत्व विवेचन।
त्रिलोकातले अमृत दर्शन ॥

३१ भगवंताची दिव्यध्वनी ती।
द्रव्य - श्रुते जगि ओळखिते ती ॥

भाव श्रुताने निजात्म प्राप्ती।
अनित्य मिथ्या श्रुती कुमति ती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जरी सुश्रुती तिथे भेद पण ।
विकल्प तेथे करी ज्ञान धन ॥

घडेल जेव्हा आत्म प्रचीती ।
साक्षात्कारी निजानंद मति ॥

निजानंदि त्या भेद कोठुनी ।
नमति इंद्रिये मन हि उन्मनी ॥

चैतन्या मधि नुरेच जडता ।
भेद मावळे अखंड सत्ता ॥

३२ अवधिज्ञाने कळे पूर्व भव ।
आत्म प्रभावे भविष्य संभव ॥

ही मर्यादित ज्ञान संपदा ।
पुद्‌गल द्रव्या कळे सर्वदा ॥

मन-पर्यायी ज्ञानि चांगला ।
अणू अणूची ओळख त्याला ॥

केवलज्ञानी विशुद्ध आत्मा ।
तो अरिहंत प्रभु परमात्मा ॥

३३ त्रिकालज्ञ तो त्रिलोक ज्ञानी ।
ज्ञान जगा हो तया पासुनी ॥

ज्ञान मूर्ति ती अनंत वैभव ।
दृश्य जगाचा होत पराभव ॥

त्याच पराभवि दिश्व सुखावे ।
तिथेच शांती सहज स्वभावे ॥

३४ केवल ज्ञानी जीव धन्य तो ।
स्वातंत्र्याचा भोग भोगितो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जीव जगातिल स्वतंत्र व्हावा ।
जीव जगातिल सुखी असावा ॥

म्हणुनि सुखे जगि विहार करितो ।
जगदोद्धारक तीर्थंकर तो ॥

तो तीर्थंकर इथे तिथे ही ।
सिद्ध शिलेवर सुस्थिर होई ॥

३५ जीव आणि जड आश्रव बंधन ।
संवर निर्जरा आणि मोक्ष पण ॥

जिवा दाविती जरी मोक्ष पथ ।
दृढ श्रद्धेची हवीच संगत ॥

देह धारि मी म्हणवित जगती ।
तो बहिरात्मा जीव मूढमति ॥

अंतरात्म मति त्याहुनि ज्ञानी ।
उत्तम मध्यम कनिष्ठ कोणी ॥

जीव जडाहुनि असे निराळा ।
स्फुरे अंतरी ज्ञान तयाला ॥

उत्तम यतिवर निजात्म बोधी ।
निर्विकल्पता साधि समाधि ॥

३६ मध्यम मुनि अणि प्रतिमाधारी ।
अव्रति श्रावक कनिष्ठ भारी ॥

प्रभु परमात्मा तो अरिहंत ।
देह-धारि पण सदैव मुक्त ॥

प्रभु परमात्मा सिद्ध मुक्त तो ।
ज्ञान शरीरी सदा विहरतो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

३७ आदि प्रभूचे ऐकुनि प्रवचन ।
भरतेशाते प्रसन्न हो मन ॥

धुवुनि निघाला मनातला मळ ।
आणि जाहले जीवन निर्मल ॥

शुद्ध जीवने प्रभुपद क्षाळित ।
सहस्र नामे सुमन सुगंधित ॥

उधळुनि सुमने करित वंदना ।
गमे सभोवति आत्म भावना ॥

३८ सुश्रुत गणधर अनेक मुनिते ।
साधु-वृंदही अगणित तेथे ॥

भगिनि आर्यिका ब्राम्हि सुंदरी ।
फुले वाहती पितृपदावरि ॥

आणिक बघती इकडे तिकडे ।
बंधु दिसेना कुठे चहुकडे ॥

३९ बाहुबलीचे स्मरण जाहले ।
नयनिनीर मग भरूनि आले ॥

आपण दोघे बंधु बंधु जरि ।
तरी भांडलो जन संसारी ॥

जन संसारी विजय पराजय ।
मी हरलो हो तयाचाच जय ॥

श्रेष्ठ बंधु मी महाभूपती ।
सान राज्य तो सान प्रजापति ॥

तरिहि तयाने मला हरविले ।
विजयश्रीने तयास वरिले ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

४० तीच तयाला बाधक झाली ।
राज्य प्रपंची विरक्ति आली ॥

राज्य सोडुनी जात वनांतरि ।
तरिहि शल्य ते उरे अंतरी ॥

४१ पूज्य पित्यापरि श्रेष्ठ बंधु मी ।
तयास करितो पराभूत मी ॥

जरी विजय मम तरी पाप ते ।
पाप असे का हातुनि घडते ॥

राज्य नको मज म्हणुनि विरक्ती ।
विरक्तीतही मिळे न शांती ॥

अशांतता ती दूर कराया ।
भरत समुत्सुक होत जावया ॥

४२ भरत बाहुबलि बंधु भेटले ।
किल्मिष अंतरि मूळी न उरले ॥

चढत बाहुबलि मुक्ति पदावर ।
अयोध्येस ये श्री भरतेश्वर ॥

४३ आदि प्रभूचे तपाचरण फल ।
तपोबलाने अंतर निर्मळ ॥

कर्म बंध ते सर्व नासती ।
दाहिं दिशा त्या दिव्य भासती ॥

कर्पुरारती शरीर बनले ।
कापुर सारे उडून गेले ॥

उरे गंध मय प्रकाश सारा ।
विश्व शांतिचा दिवस हासरा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निजानंदि ते निमग्न झाले ।
सिद्ध शिलेवर सुखे शोभले ॥

४४ तोच सत्य शिव सुंदर आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

नरतनु नश्वर शाश्वत कीर्ती ।
भरत विवेकी ढळे न शांती ॥

सोडुनि जाती पिता बंधु जरि ।
भरत विवेकी शोक आवरी ॥

४५ श्री भरतेश्वर वीर विरागी ।
असुनि प्रपंची विरक्त त्यागी ॥

संसाराचा भार जगाचा ।
तिथेच पडतो विसर स्वःताचा ॥

स्वतः विसरता झडे अहंता ।
तीच पुण्यमय स्वधर्म सत्ता ॥

स्वधर्म सत्ता स्वयं प्रभा ती ।
तिथेच शांती तिथेच मुक्ती ॥

सदा मोक्ष पद सिद्ध तयास्तव ।
आणि भूवरी अखंड गौरव ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खंड आठवा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१ आदिनाथ प्रभु श्री भरतेश्वर ।
सुख संवादी तत्व मनोहर ॥

तीच आदि वा अनादि गीता ।
सुतासि झाला पिता सांगता ॥

पुत्र पित्याच्या संवादातिल ।
तत्व मनोहर सार तयातिल ॥

तुम्हास कथिले तुम्ही ऐकिले ।
परी येथवर कोठुनि आले ॥

सांगति गणधर ऐकति नृपती ।
धर्म कथेची परंपरा ती ॥

२ परंपरेने प्राप्त जाहले ।
ज्ञान तेच मी तुम्हासि कथिले ॥

ज्ञान दान व्रत आचरिती जन ।
तेच महात्म्ये पुण्य परायण ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

३ जम्बुद्वीपि या सुमेरुपर्वत ।
तया भोवती लोक वसाहत ॥

भरत भूमिही एक त्यातली ।
मायभूमि ती अम्हा लाभली ॥

राज्य अयोध्या इथेच होते ।
राम धनुर्धर इथेच होते ॥

इथेच होती सती जानकी ।
हनुमंता सम महाभक्त की ॥

लक्ष्मणाची भ्रातृभावना ।
लंकेशाची काम वासना ॥

इथेच होते पुण्य पाप ते ।
आणि लाभले फळहि तयाते ॥

धर्म कथेची करू पेरणी ।
कुणि लाखातुनि होइल ज्ञानी ॥

४ श्री रामाची अमर कहाणी ।
ऐकिली न वा वाचिलि कोणी ॥

असा न माणुस कुणी भारती ।
पुन: ऐकुया पुन: गाउ ती ॥

ज्ञानवन्त जन जीव जितेंद्रिय ।
तोच जिनेश्वर रवि तेजोमय ॥

रविकुल भूषण राज्य अयोध्या ।
सत्य धर्म साम्राज्य अयोध्या ॥

दशरथ राजा राज्य तिथे करि ।
करी पुत्रवत् प्रेम प्रजेवरि ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

५ प्रजा प्रपंची राज्य सुखावे ।
तोच धर्म संसार स्वभावे ॥

जनगण त्याचा अंश वंश तो ।
वंश वेलिवर जीव विहरतो ॥

म्हणुनि जीवनी प्रपंच प्रीती ।
धर्म परायण आत्म प्रचीती ॥

६ राज्य प्रपंची श्रेष्ठ प्रजापति
आणि प्रजाजन गृहगण भोवति ।

प्रजा जनांच्या मनांत रुखरुख ।
हवा प्रजापति नव उदयोन्मुख ॥

वृद्ध प्रजापति नित्य असावा ।
पुत्र हवा पण प्राण विसावा ॥

पुत्राविण गृह गमे उणे ते ।
राज्य प्रपंची नवीन नेते ॥

प्रजा जनांची मनो भावना ।
करि परमात्मा पूर्ण कामना ॥

७ कौसल्येच्या उदरि जन्मला ।
राम प्रजापति नाम तयाला ॥

सती सुमित्रा पुत्र लक्ष्मण ।
राम दुजा तो वीर विलक्षण ॥

भरत आणि शत्रुघ्न बंधु ते ।
देइ कैकई जन्म तयाते ॥

वंश वेलिची फुले विलोकुन ।
सुखी प्रजापति सुखी प्रजाजन ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

८ धन्य प्रजापति धन्य पुत्र ते ।
धन्य राम तो धन्य राज्य ते ॥

९ श्री रामाचे प्रसन्न जीवन ।
धर्म शील अति पुण्य परायण ॥

पुण्य परायण जन संसारी ।
जीवनात त्या रम्य माधुरी ॥

जीवनांत त्या किती महात्मे !
जीवनांत त्या किती हुतात्मे ॥

जीवनांत त्या गुणिजन सज्जन ।
जीवनांत त्या वीर महाजन ॥

स्वये प्रपंची दुःख साहती ।
आणि जगाला मार्ग दाविती ॥

१० श्री रामाचे राज्य गाजले ।
परि न प्रपंची सौख्य लाभले ॥

दुःख सुखाची प्रथम पायरी ।
सत्य धर्म हा स्फुरे अंतरी ॥

तेच महात्मे जन सत्याग्रहि ।
विश्व कुटुम्बी लोक संग्रही ॥

मोक्ष मार्गिचे तेच प्रवासी ।
धर्म कर्म रत गृह जन वासी ॥

११ पुण्य मार्ग तो जया न ठावा ।
व्यर्थ प्रपंची घेति विसावा ॥

जीव प्रवासी प्रवास मोठा ।
तया संगती धर्म चोरटा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रवासांत त्या किती लफंगे ।
सिद्ध मुनींची घेऊनि सोंगे ॥

तयास छळिती स्वार्थ साधिती ।
जिवाजिवाची अधोगती ती ॥

१२ सत्य कळेना जिवास जोवरि ।
प्रपंचात या दुःख तोंवरी ॥

सत्य जगातिल एकच आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

१३ परमात्म्याचा वास भूवरी ।
परी पाहिजे ध्यास अंतरी ॥

माय बाप बा बंधु बंधु ते ।
असो कुणाचे कसे हि नाते ॥

भिन्न भिन्न ती जीव प्रकृती ।
भिन्न भाव तो भिन्न संस्कृती ॥

पुण्य परायण जीव आगळा ।
जगांत असुनी जगा वेगळा ॥

तिथे नांदते धर्म संस्कृती ।
ती मानवता विवेक शक्ती ॥

१४ शक्ति साहते दुःख सुखानें ।
ध्येय तियेचे विजय मिळविणे ॥

विजयश्रीची माळ गळ्यामधि ।
सुख दुःखाचीं फुले तयामधि ॥

सुख दुःखाचा धनी राम तो ।
जीव जिनेश्वर गुणी राम तो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१५ राम सानुला बंधु सानुले ।
बंधु बंधुचे भाव सानुले ॥
माय पित्याची प्रीत थोर ती ।
प्रजा प्रीतिमधि पोहत होती ॥
त्या लाटेवरि राम तरंगे ।
तरंगात त्या जीवन रंगे ॥

१६ रंग ढंग ते राज विलासि ।
राम मानि परि क्षणिक तयासि ॥
क्षणिक सौख्य तर क्षणिक दुःखही ।
हाच भाव मनि सदैव राही ॥
तोच जीवनी नित्य झगडतो ।
आणिक शाश्वत सौख्य भोगितो ॥
शाश्वत सुखितो प्रसन्न आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

१७ श्री रामाचे सरे बालपण ।
आणिक फुलले प्रसन्न यौवन ॥
प्रसन्न सीता जनक नंदिनी ।
श्री रामाची धर्म चारिणी ॥
सत्य धर्म संसार तयाचा ।
विश्व कुटुम्बी वन वासाचा ॥
जनांत मंगल वनांत मंगल ।
मनांत आत्माराम सुमंगल ॥

१८ थोर पितृकुल पिता पुण्य धन ।
प्रेमळ माता बंधु लक्ष्मण ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भरत आणि शत्रुघ्न त्या सर्वे ।
सती जानकी पत्नि स्वभावें ॥

श्रीरामाचा असा भाग्य-पट ।
परी भूवरी प्रपंच दुर्घट ॥

१९ असो भूपती असो भिकारी ।
दुःख तयाच्या सदा शिरावरि ॥

भये तयाच्या जीव झुरे तो ।
राम मस्तकी मुगुट मानितो ॥

२० जगी जीवनी दुःख असे का ।
दुःख सागरी जीवन-नौका ॥

हलते डुलते आणिक बुडते ।
बुडता बुडता सत्य सांगते ॥

बुडायचे जड स्वतंत्र आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

२१ परमात्म्याची अगाध करणी ।
राम जनी वनि आणि जीवनी ॥

पिता माउली पुत्र संतती ।
जरी एक कुल भिन्न प्रकृती ॥

प्रपंचात या कुल मर्यादा ।
राज्य प्रपंची जन मर्यादा ॥

परंपरेने राम थोरला ।
आणि आवडे माय पित्याला ॥

राजवटीची धुरा तया करि ।
करू समर्पण म्हणति अंतरी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जरी राज मत मान्य प्रजेते ।
परी कालगति विघ्न आणिते ।।

२२ म्हणे कैकई राम लक्ष्मण ।
मम पुत्रापरि मला हि प्रिय पण ।।

परी आपुला भरत थोरला ।
शत्रुघ्नाची साथ तयाला ।।

राम लक्ष्मण सुत एकुलते ।
सान थोरपण तिथे न गमते ।।

जिथे दोन ना कोण थोर तो ।
राज्यपदाचा मोह घोर तो ।।

२३ श्री रामाची विवेक बुद्धी ।
राज्य सुखाची त्यजुनि उपाधी ।।

वनवासाचा मार्ग स्वीकरी ।
सवे चालली जनक कुमारी ।।

२४ म्हणे लक्ष्मण नमुनि तयांना ।
तुम्हा संगती मलाहि घ्याना ।।

वनवासाची कुणा न भीती ।
बंधु भावना अखंड प्रीती ।।

काय व्हायचे काय घडे पण ।
सती जानकी राम लक्ष्मण ।।

वनवासाची करिति तयारी ।
भरत बिचारा झुरे अंतरी ।।

२५ मनी विरक्ती शिरी राजवट ।
गमे जीवनी प्रपंच दुर्घट ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वृद्ध प्रजापति वरित विरक्ती ।
तरुण प्रजापति उदास मूर्ती ॥

मूढ प्रजेचे गूढ दैवबल ।
परि रामाचे पूढेच पाउल ॥

२६ श्री रामाचा वास काननी ।
सवे लक्ष्मण जनकनंदिनी ॥

दूर राहिले स्वकीय सोर ।
नव्या प्रपंची नवीन वोर ॥

नव्या जुन्याचे क्षेम चिंतिती ।
निसर्ग संगे काळ कंठिती ॥

२७ निसर्ग त्यांना वाट दावितो ।
धर्म पाठही तयास देतो ॥

परमात्म्याची सृष्टि–संपदा ।
अहं बुद्धिची तिला न बाधा ॥

अहंकार तो जिवा जिवाचा ।
तो तर रावण कोटि मुखाचा ॥

कोटि कोटि ते रावण रानी ।
मरायचे ते तुझ्या शरांनी ॥

तुझ्या अंतरी स्वधर्म शक्ती ।
ती विजयश्री आत्म प्रचीती ॥

२८ पवित्र सरिता प्रसन्न वारा ।
रम्य वनश्री परिसर सारा ॥

श्री रामाचे चरण क्षाळिती ।
सृति सीतेला सुखे न्हाणिती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लक्ष्मणाला म्हणति विनोदे ।
पति पत्निला इथे राहुदे ॥

मातृभूमि तव तुझ्या संगती ।
जीव संपदा तिच्या भोवती ॥

फुले फले ती तरुवेलीवर ।
किती गोड ती किती मनोहर ॥

भुकेजलेले तृप्त होति ते ।
सुमन भूषविति सौंदर्याते ॥

सुंदर सीता राम काननी ।
भक्ति भावना तुझ्या जीवनी ॥

तूच आमुचा नव नजराणा ।
करुनि समर्पण पूजि तयाना ॥

२९ उंच उंच तो डोंगर माथा ।
राम लक्ष्मण आणिक सीता ॥

पर्णकुटी मधि सुखे राहती ।
पशुपक्षीगण सदा भोवती ॥

वसे अंतरी सावधानता ।
तिथे न भीती तिथे न चिंता ॥

३० येति कधी कधि वनवासिजन ।
स्वागत त्याचे करी लक्ष्मण ॥

पाहुनि सीता राम लोचनी ।
अश्रु ढाळिती वृद्ध कुणी कुणि ॥

राजकुलातिल तरुण दंपती ।
बघुनि वनी ते तयास म्हणती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निष्ठुर तुमचे माय बाप ते ।
वनवासा मधि कष्ट किती ते ॥

तुम्हा न माहित तया न माहित ।
अम्ही साहतो तरी सदोदित ॥

निष्ठुर निष्ठुर नगरवासिजन ।
अम्ही अडाणी बरे तयाहुन ॥

३१ अश्रु नेत्रिचे ती तर माया ।
वन्य जनांचा भाव बघुनिया ॥

राम वंदुनी वदे तयांना ।
दोष न द्यावा माय पित्यांना ॥

आप्त इष्टजन सर्व चांगले ।
परी कालगति कुणास नकळे ॥

काल गतीवर मात कराया ।
जीव जन्मला असे जगी या ॥

३२ तो जगि राजा तोच प्रजाजन ।
जगी आत्मसुख स्वराज्य कारण ॥

राज्य असावे विवेक वादी ।
प्रजा असावी सुख संवादी ॥

सुखात व्यत्यय जगी आणितो ।
जिवा जिवातिल अहंकार तो ॥

३३ जैन जितेंद्रिय जगात रविकुल ।
जगी तयाचे भविष्य उज्ज्वल ॥

भविष्यात वन लिहिले होते ।
म्हणुनि भेटला तुम्ही अम्हाते ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मिळे खावया मिळे प्यावया ।
तुम्हासंगती मिळे रहाया ॥

भोळि भाबडी वन्य संस्कृती ।
नगर जनाना माहित नव्हती ॥

अम्हास गमते इथे नवे जग ।
काय व्हायचे उद्या बघू मग ॥

३४ श्री रामाची प्रसन्न वाणी ।
तीच जगातिल मंत्र मोहिनी ॥

श्रवणि ऐकुनी सान थोर जन ।
करिती तयाचे ते शुभचिंतन ॥

३५ राम लक्ष्मण जनक नंदिनी ।
वन्य जनासह सुखे काननी ॥

सुख दु:खाच्या गोष्टि सांगती ।
वनवासाचा काळ कंठिती ॥

३६ तो लंकेश्वर प्रचण्ड रावण ।
वनी तयाची भगिनि वसे पण ॥

पुत्र तिचा करि शस्त्र साधना ।
आणि गांजितो वन्य जनाना ॥

३७ वन्य जनाचा कुणी न वाली ।
काल गतीची तऱ्हा निराळी ॥

बंधु लक्ष्मण फुला फळास्तव ।
फिरे काननी तिथेच अभिनव ॥

शस्त्र देखुनी क्षणिक स्थिरावे ।
आणि घेइ करि सहज स्वभावे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सहज वेलिवर बघत परजुनी ।
मरे असुर ये रक्त तयातुनि ।।

हाच अकल्पित रक्तपात तो ।
राम रावणा रणा जुंपितो ।।

३८ माय मुलाची मृत्यु काहणी ।
कथुनि रावणा म्हणे तया क्षणि ।।

घेशिल ना जरि सूड षंढ तूं ।
पावशील जगि धर्म दण्ड तूं ।।

रावण क्रोधे जळे अंतरी ।
अहंकार तो कळे अंतरी ।।

३९ श्री रामाला म्हणे लक्ष्मण ।
शस्त्र लाभले वनी त्रिलक्षण ।।

किती विलक्षण अघटित घटना ।
काय व्हायचे उद्या कळेना ।।

शस्त्र लाभले शकुन चांगला ।
न कळत कोणी तिथेच मेला ।।

असेल का कुणि थोर महात्मा ।
असेल किंवा कुणी दुरात्मा ।।

तुला मला ते कसे कळावे ।
वन्य जनाला असेल ठावे ।।

तो तर भोळा भाव चांगला ।
होइल सुख की दुःख तयाला ।।

दोष आपुला दुःख तया कां ।
हीच अंतरी भिववित शंका ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

४० शस्त्र लाभले शकुन चांगला ।
नकोच शंका रण मर्दाला ॥

मर्द मनाचे भले वन्य जन ।
पाप पुण्य ते कळे तया पण ॥

तूं निष्पापचि असशि सदाचा ।
हवा कशाला वाद उद्याचा ॥

काय व्हायचे घडेल अंती ।
असो शस्त्र करि मनांत शांती ॥

४१ डुम डुम डुम डुम ढोल नगारे ।
वनी वाजती नाद संचरे ॥

किती वन्य जन नाचत येती ।
किती स्त्रिया किति मुले भोवती ॥

करी तयांच्या फूल आणि फळ ।
आणि तयांचा सुरेख परिमल ॥

राम लक्ष्मण जनक नंदिनी ।
बघुनि वंदिती प्रेम भरानी ॥

तुम्हा मुळें जगि संकट टळले ।
राक्षस मेला राम हासले ॥

४२ लक्ष्मणाला शक्ति लाभली ।
राम हासला सीता हसली ॥

हासत नाचत सर्व वन्य जन ।
जळे अंतरी परंतु रावण ॥

४३ कपट नाटकी रावण मोठा ।
कपट नीतिचा तिथे न तोटा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कपट बुद्धिने येइ काननी ।
नेइ हिरावुनि जनक नंदिनी ।।

४४ कपट पटूंचे राज्य भूवरी ।
सौख्य जिवाला मिळे न तोवरि ।।

वनी एकली पाहुनि सीता ।
रावण झाला भीक मागता ।।

अन्न वाढता नेइ हिराउनि ।
विरोध केला पशु पक्ष्यानी ।।

निषेध केला शक्ति अल्प ती ।
दुःख जिवाचे दैव गती ती ।।

४५ कुठे जानकी राम लक्ष्मण ।
तिला शोधिती सवे वन्य जन ।।

गिरी कंदरी इथे तिथे ना ।
राम विचारी वृक्ष वेलिना ।।

तुम्ही पाहिली असेल सीता ।
सवे दुष्ट तो रावण होता ।।

तिला मारिले असेल त्याने ।
असेल दिधला प्राण तियेने ।।

प्राण हीन ती पत्नि बिचारी ।
प्राण पती मी किति अविचारी ।।

अति अविचारी असेल रावण ।
तया न सतिचे कळे थोरपण ।।

४६ पतिव्रता स्त्री ज्योत अग्निची ।
प्राण संकटी जळावयाची ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जळता जळता घेत आहुती ।
मरेल रावण परी कुठे ती ।।

४७ तिला शोधिती राम लक्ष्मण ।
सवे सैन्य ते वन–वासीजन ।।

हनुमंताची वीर वृत्ति ती ।
तया न शंका त्या न भीती ।।

म्हणे राम जरि जिवंत येथें ।
असेल सीता इथे न तेथे ।।

असेल तेथे तिला शोधितो ।
पृथ्वि पालथी घालुनि येतो ।।

४८ वन्य जनांची भाव भावना ।
पुण्य पराक्रम साह्य सज्जना ।।

राम सद्गुणी रावण पापी ।
अम्ही न साहू पाप कदापी ।।

अम्हास नलगे पाप पुण्य फल ।
अम्हास ठावे एक आत्मबळ ।।

आत्मबळी पीळि कान जगाचा ।
काय पाड मग लंकेशाचा ।।

असेल लंका दूर कुठे तरि ।
नसेल परि ती पृथ्विहूनि दुरि ।।

जिथे जिथे करि प्रवेश वारा ।
तिथे तिथे हा राम–सोयरा ।।

राम धनी मी दास तयाचा ।
अंतःकरणी वास तयाचा ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

४९ रामदूत हनुमान इथे मी ।
राम नाम ध्वनि गर्जत व्योमी ॥

विहार करितां देवदूत ते ।
मार्ग दावितिल सदैव माते ॥

शक्ति दानवी आणि मानवी ।
देव गुणाची प्रचीति यावी ॥

जिथें प्रचीती तिथें आत्मबल ।
तिथे पराक्रम आणि पुण्यफळ ॥

५० श्री रामाचे नांव गाजुदे ।
राज्य दानवी बीज भाजुदे ॥

हनुमंताची वीर गर्जना ।
ऐकुनि चढले स्फुरण जनाना ॥

५१ असेल सीता तिथे सुरक्षित ।
कारण रावण जैन धर्म रत ॥

भोग बुद्धिचे किटण तयावरि ।
म्हणुनि अहंता रुजे अंतरी ॥

जिथे अहंता तिथेच मृत्यू ।
राम राज्य तर पवित्र हेतू ॥

५२ हवा भोग की त्याग जीवनी ।
रावण किंवा राम यातुनी ॥

कोण आवडे जिवा जिवाला ।
प्रश्न न पडला हनुमंताला ॥

भोग बुद्धिची जगात माती ।
त्याग बुद्धि जगि आत्म–उन्नती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आत्मोन्नतिचे बीज अंतरी ।
त्या बीजाचे राज्य जगावरि ॥

रावण म्हणजे शुद्ध अराजक ।
वनि रामाला नसे राज्यसुख ॥

राजवरील काय पाहिजे ।
सैनिक सेनापतीहि जे जे ॥

ते ते सारे सिद्ध वनी या ।
भोग बुद्धिची मरेल दुनिया ॥

उरेल तेथे रामराज्य मग ।
म्हणेल त्याला धन्य धन्य जग ॥

५३ हनुमंताची गगन भरारी ।
पृथ्वि थरारे नदी सागरी ॥

उसळति लाटा जिथे तिथे जल ।
डोंगर माथ्यावरी पाणथळ ॥

अशोक वनि ये प्राशुनि वारा ।
आत्म शक्तिचा प्रभाव सारा ॥

५४ लंकेशाची राजधानि ती ।
रक्षक सेना तिच्या भोवती ॥

शस्त्र धारिते अस्त्र धारिते ।
परी न सीता तयास भीते ॥

पतिव्रतेचा स्वधर्म साधा ।
बाह्य भीतिची तिला न बाधा ॥

एक राम तो पति स्वभावे ।
अन्य जनाना कशास भ्यावे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बाप बंधु ते जगी अन्य जन ।
वैर साधितो वनांत रावण ॥

पाप कर्म ते जगी कर्म फळ ।
चुकेन कोणा म्हणे आत्मबळ ॥

५५ आत्म विवेकी पतिव्रता ती ।
अशोक वनि त्या विहरत होती ।

तिथें येउनी राम दूत तो ।
राम पत्निला मुदे वंदितो ॥

५६ श्री रामाचे कुशल ऐकुनी ।
सुखावली मनि जनक नंदिनी ॥

राम लक्ष्मण स्वये शूर ते ।
शूर तुम्हासम सहाय्य करते ॥

गाजणार जगि विजय दुंदुभी ।
मरेल रावण उद्या अभागी ॥

५७ भविष्य हे तर मी हि जाणते ।
काल गती मम दुःख भोगिते ॥

सुशील कांता बंधु विवेकी ।
पराक्रमी सुत प्रजा न दुःखी ॥

स्वये आचरी जैन धर्म व्रत ।
मला न केले कधी कलंकित ॥

अकलंकित मी तरी सौख्य ना ।
पराधीनता शाप सग्दुणा ॥

५८ सग्दुण मार्गी दुःख असे कां ।
मनी बाधते सदैव शंका ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दुखावलेला अहंकार तो ।
प्रपंचात या विघ्न निर्मितो ॥

प्रपंच खोटा हे नच उत्तर ।
पुण्य पराक्रम युद्ध निरंतर ॥

५९ समर संस्कृती नव्हेच हत्या ।
सशस्त्र सेना ज्योति जागत्या ॥

रणि विजयश्री धर्म दिवाळी ।
अहंकार तम समूळ जाळी ॥

मरेल रावण अहंकार तो ।
अनंत विजयी रामप्रभू तो ॥

६० पतिव्रतेची करुण काहणी ।
प्रेम अंतरी अश्रु लोचनी ॥

तरीहि तेथे धर्म जागृती ।
तरीहि तेथें कर्म जागृती ॥

धर्म कर्म रत प्रपंच संस्था ।
सुख दु:खाचे घात्र झेलिता ॥

सत्य शोधिते शोधित शांती ।
परि न साहते मनोविकृती ॥

६१ मनो विकृती प्रचण्ड रावण ।
नाश तयाचा राम राज्य गुण ॥

रामदूत तो रामपत्नि ती ।
राम राज्य गुण सांगत होती ॥

गुण सुमनाचा भाव गंध तो ।
अशोक वनि त्या क्षणि दरवळतो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

६२
राजधानि मधि सुखे संचरे ।
आणि रावणा भरे कापरे ॥

हनुमंताची वीर गर्जना ।
जाळिल लंका वधिल रावणा ॥

परी न आज्ञा राम प्रभूची ।
प्रपंचातल्या परमार्थाची ॥

हीच कसोटी ही मानवता ।
असो आत्मबल नसो अहंता ॥

६३
लंकेशाच्या गुप्त चरांनी ।
कथिली वार्ता स्वये ऐकुनी ॥

रावण क्रोधे जळू लागला ।
विवेक त्याचा पळू लागला ॥

अविवेकी जन असोत मोठे ।
कर्म तयाचे समूळ खोटे ॥

६४
सति मंदोदरि तिथें पातली ।
हात जोडुनी म्हणू लागली ॥

परस्त्रियेची कां अभिलाषा ।
नाश कुलाचा टळे न सहसा ॥

सीता सति ती अग्नि शलाका ।
जळुनि निघाली सुवर्ण लंका ॥

लंकेशाच्या मनांत काळे ।
जाळणार ती भविष्य कळले ॥

नका विषाची पाहु परिक्षा ।
हवी मला हो एकच भिक्षा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

६५ लंकेशाचा क्रोध अनावर ।
म्हणे तिला जा येथुनि सत्वर ॥

पट्टराणि तूं तुला लागले ।
कां भिक्षेचे आज डोहळे ॥

अपार सत्ता अपार सेना ।
पराक्रमी सुत मीहि शाहणा ॥

राम कोठला तो वनवासी ।
हवी कशाला पत्नि तयासी ॥

साह्य तया दे वनचर सेना ।
वनवासातिल साथ तयाना ॥

नसे अन्नना वस्त्र गाठिशी ।
एक धनकुलि शस्त्र पाठिशी ॥

६६ रावण त्याला कधी न भीतो ।
भय ग्रस्तांना तुच्छ लेखितो ॥

बंधु धाकला विवेक वादी ।
म्हणे रावणा क्रोध उपाधी ॥

तुझ्या सवे ती अम्हाबाधते ।
आणि दुःख दे प्रजाजनाते ॥

तूं तर राजा अम्ही प्रजाजन ।
मुठीत तुझिया किति जन जीवन ॥

ते न पातकी तया न सत्ता ।
अम्हा मान्यना तुझी अहंता ॥

धर्म आंधळा देव निमाले ।
भिकार तत्वज्ञान कोठले ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

६७ मी जगि राजा ही न अहंता ।
व्यक्ति व्यक्तिची तिथे पात्रता ॥

राज पदाला पात्र इथे मी ।
मज बोधाया अपात्र तुम्ही ॥

असाल माझे तुम्ही प्रजाजन ।
दिले दुःख ना तुम्हा मीहिपण ॥

प्रजाजनांची प्रथम पायरी ।
हवा भरवसा प्रजापतीवरि ॥

शंभर सीता हव्यात माते ।
देइन त्या मी प्रजाजनाते ॥

मला तयाची नच अभिलाषा ।
ठेवणार का तुम्ही भरवसा ॥

६८ अविश्वास हा जिवास नडतो ।
म्हणुनि एकला दुजा भांडतो ॥

उपदेशाची फुकट पेरणी ।
जन्म घेत या गृहकलहातुनि ॥

असे अराजक प्रजाजनातिल ।
कोण शाहणा राजा साहिल ॥

ती नच सीता जिद्द आमुची ।
जिवंत तोवरि उरावयाची ॥

६९ गृह कलहातुनि सजे रणांगण ।
जिद्द जागवित मरेल रावण ॥

हनुमंताची गगन भरारी ।
घे लोटांगण रामपदावरि ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जाळुनि लंका विजयि वीर तो ।
सति सीतेचे क्षेम सांगतो ॥

रावण वध हा घडेल निश्चित ।
सीता सतिचे असेच हृद्गत ॥

क्षात्र कन्यका क्षत्रिय कांता ।
वनवासी व्रत सुखे कंठिता ॥

पडे तिच्यावर कामुक दृष्टी ।
म्हणुनि जानकी सदैव कष्टी ॥

शील सतीचे जरि न भंगले ।
क्षात्र तेज पण पणा लागले ॥

कामुक राजा समाज कंटक ।
केवि प्रजेला देइल तो सुख ॥

प्रजेत कांता पुत्र पती ते ।
मातृपितृ ते बंधुभगिनि ते ॥

पवित्र नाते शील सग्दुणी ।
पाप नसावे जनी आणि मनिं ॥

७० समाज शास्ता भ्रष्ट प्रजापति ।
न्याय बुद्धिची घेत आहुती ॥

अन्यायाला हवेंच शासन ।
रावण वध हा धर्म सनातन ॥

७१ हनुमंताची युद्ध घोषणा ।
रामलक्ष्मण वन्य जनांना ॥

गमे झडे जणु समर दुंदुभी ।
सशस्त्र सेना सभोवती उभि ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हळूच उतरत डोंगर माथा ।
पुढे दांडगा समुद्र होता ॥

सीता सतिचे सखे सहोदर ।
तरंगती जळिं प्रचण्ड पत्थर ॥

वाट जाहली वनचर सेना ।
सिंधु लंघिते करित गर्जना ॥

७२ राम नाम गुणि नभ हि दणाणें ।
वृत्त ऐकिले लंकेशाने ॥

हनुमंताच्या लक्ष आकृत्ती ।
नेत्रि तयाच्या उभ्या राहती ॥

जाळुनि गेला एक नगर हे ।
मरायचे तर मलाहि आहे ॥

मरेल रावण राम राहिना ।
मृत्यु पुढें पण जिद्द जाइना ॥

७३ दुष्ट भूपती भ्रष्ट प्रजाजन ।
धर्म बुद्धिचे तिथे विडंबन ॥

नित्य दिखाऊ दान दक्षिणा ।
हेतु तयातिल कळे न कोणा ॥

सदैव पूजा पाठ मंत्र ते ।
प्राण घातकी लोक तंत्र ते ॥

अंगणांत कुणि चिमणा चारा ।
धर्म बुद्धिने घालि पाखरा ॥

तिथे वेचिती कुणी अन्न कण ।
परी आसुरी अन्नाचा गुण ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

७४ अंगणात त्या कणखर जाळे ।
त्या जाळ्यामधिं पाय अडकले ॥

सजीव पक्षी अन्न इष्ट ते ।
नित्य भक्षिती असुर दुष्ट ते ॥

७५ धर्म दुष्ट तो प्रजा दुष्ट ती ।
दुष्ट प्रजापति तयास भीती ॥

म्हणेल तो ते खरे मानणे ।
करील तो ते खरे मानणे ॥

परी त्यांत कुणि निघे शाहणा ।
आणि उजळितो विवेक बाणा ॥

७६ म्हणे बिभीषण लढू नको तूं ।
पाप कर्दमी पडू नको तूं ॥

श्री रामाला गृही बोलवुनि ।
सुखे समर्पुनि जनकनंदिनी ॥

हो जनकासम तूहि प्रजापति ।
पडेल ना तर मुखात माती ॥

७७ रावण खवळे पुत्र खवळला ।
म्हणति निंदुनी बिभीषणाला ॥

निघा येथुनी फितूर सारे ।
नकोत तुमचे निगम नगारे ॥

फंद फितूरी राज घराणे ।
दुःख सहावे तिथे प्रजेनें ॥

विहिरीतले मचूळ पाणी ।
बीज चांगले जात जळोनी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राजवटीची तशी गती ती ।
तिलाच अंती नरक बोलती ॥

७८ त्या नरकातिल बडा किडा तो ।
अहंकारि तो दुराचारि तो ॥

तो तर रावण राजधानि ती ।
पाप कर्दमी पोहत होती ॥

७९ लंकेशाचा बंधु धाकला ।
विवेक सांगे ज्येष्ठ बंधुला ॥

फितूर म्हणुनी शिवी वाहिली ।
मानहानि ती जिवा झोंबली ॥

पाप बंधुचे प्रजेस बाधे ।
जळू लागले अंतर क्रोधे ॥

जळो बंधु तो जळो प्रजा ती ।
रामप्रभूवर अथांग प्रीती ॥

धरुनि पातला ओळख पटते ।
तिथे एक त्या हनुमंताते ॥

८० हनुमंताची अचूक दृष्टी ।
रावण बंधू बघूनि कष्टी ॥

स्नेह बुद्धिने स्वागत केले ।
श्री रामाची धरी पाउले ॥

म्हणे राघवा तारि मला तूं ।
जाणुनिया मम पवित्र हेतू ॥

मी नच पापी पाप बंधुचे ।
आणि पातकी प्रजाजनाचे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घेउनिया शिरि येत येथवर ।
तारि मला तूं करुणा सागर ॥

८१ बंधु थोरला थोर घराणे ।
धर्म आचरित अति अभिमाने ॥

तिथेच त्याची घोर अहंता ।
साह्य तिला करि प्रचण्ड सत्ता ॥

दीन प्रजाजन मानव जाती ।
दावणीतली जनावेरे ती ॥

कधि अंजारी कधि गोंजारी ।
कधि मानेवरि चालविती सुरि ॥

कुणा कशाचा नसे भरवसा ।
राजहंस वा कुणा वायसा ॥

८२ राज्य प्रशासक मानव प्राणी ।
गुणी कालचा आज दुर्गुणी ॥

म्हणे मीच जगिं धर्म नियंता ।
कारण माझी जगांत सत्ता ॥

बळास भीती मूर्ख माणसे ।
ती दुर्बलता समाज नासे ॥

समाज शासनि न्याय नीति ना ।
समाज शासनि धर्म प्रीतिना ॥

सर्व बोलके श्वापद तेथे ।
राज्य प्रपंची पाप नांदते ॥

८३ करीन मी ते कर्म चांगले ।
म्हणेन मी ते घडून आले ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तया निंदिती ते मम वैरी ।
नाव तयाचे राज्य आसुरी ॥

रावण त्याचा मुकुटमणि तो ।
कामुक व्यसनी अहंमन्य तो ॥

थोरांची जगिं थोर अहंता ।
करि राज्याचा नाश तत्वता ॥

८४ तूं पुण्यात्मा जगिं अविनाशी ।
शरण तुला मी तार अम्हासी ॥

पाप कर्दमी पुण्य कमल तूं ।
तुझा जाणिला उदात्त हेतू ॥

हनुमंताची दृष्टि तुझ्यावर ।
धर्म प्रभेची वृष्टि तुझ्यावर ॥

जगि धर्माचा नहो पराभव ।
क्षणिक दुःख जगि लीला लाघव ॥

८५ दुःख साहणे धर्म कसोटी ।
दुःख साहता कधी न कष्टी ॥

तोच महात्मा नव लंकेशा ।
ठेवि अम्हावर पूर्ण भरवसा ॥

८६ तूं शरणागत मी वनवासी ।
नसे राजवट तुम्हा अम्हासी ॥

समान सुख वा, दुःख जगी ते ।
शत्रु-मित्रता इथे निर्मिते ॥

हे न खेर रे सत्य निराळे ।
पूर्व जन्मिचे प्रताप सगळे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

८७ पडे समुद्री एक डाहळी ।
दोन पाखरे त्या ढाळीवरि ॥

एक पुरुष तो दुजी गर्भिणी ।
पुत्र सुखास्तव मनी मोहरुनि ॥

त्या ढाळीवर बांधिति घरटे ।
परि तीघांचे दैव करंटे ॥

मरण ओढवे वादळ वारा ।
ठेवि सुरक्षित सान पाखरा ॥

८८ भव सागरिची अम्ही पाखरे ।
पोहत आलो सर्व इथे रे ॥

जुळे स्नेह संबंध इथे जरि ।
पुढे संकटे भासति भारी ॥

पुरे सत्य संकल्प आपुला ।
संकट काली तरावयाला ॥

८९ मी न चिंतिले वैर कुणाचे ।
दुःख भोगितो वनवासाचे ॥

तूं न पातकी अम्हास कळले ।
पाप बंधुचे तुला बाधले ॥

पिता पुत्र कुणि पत्नि पती तो ।
थोर सानुला कुणी बंधु तो ॥

प्रत्येकाची भिन्न प्रकृती ।
गमे एकता समाज म्हणती ॥

समाज चेष्टा नव्हे धर्म तो ।
जीव जीवनी दुःख भोगितो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

९० समाज शास्ता हवा जीवनी ।
पुष्पवंत तो प्रताप तरणी ॥
पाप आपुले सुखे भोगितो ।
दोष कुणाला कधी न देतो ॥
तरि पुण्यात्मा प्रयत्नवादी ।
दैव तयाचे सुख संवादी ॥

९१ सुख संवादी धर्म फुलोरा ।
परमात्म्याचा खास आसरा ॥
तारिल आम्हा तोचि दयाघन ।
करील अपुले प्रसन्न जीवन ॥

९२ रावण म्हणजे अहंकार गुण ।
क्षणांत सज्जन क्षणांत दुर्जन ॥
सीता सतिला हरुनि आणिले ।
शील तियेचे परी पाळिले ॥
द्विधा वृत्ति ही युद्ध मनातिल ।
मरण तयाहुनि बरे रणातिल ॥

९३ कुणास मृत्यू कोण मारितो ।
मरणारा ही शूर ठरे तो ॥
रावण योद्धा मान्य मलाही ।
विजय आपुला दे मन ग्वाही ॥
नव्हे क्रूर मी नव्हे दुष्ट मी ।
मम दैवावर नसे रुष्ट मी ॥
कर्तव्याची कास धरावी ।
विजय मालिका स्वये वरावी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

९४ विजय रणातिल जगीं सत्व गुण ।
मरेल पापी मरेल दुर्जन ॥

रावण मेल्याविना जगी ना ।
सती जानकी मुक्त होइना ॥

मुक्ति तियेची मम जीवन व्रत ।
धर्म भावना सदैव शाश्वत ॥

९५ धर्म भावना युद्ध निर्मिते ।
अहंकार मति मरून जाते ॥

कुणी जिंकिती मनास ज्ञानी ।
रणात मरती किति अज्ञानी ॥

रणास भीतो जिते मरण ते ।
संसाराचे स्मशान होते ॥

म्हणुनि झगडती जन संसारी ।
युद्ध नीति मधि धर्म माधुरी ॥

९६ युद्ध जुंपले रावण मेला ।
लंके मधि हो धर्म सोहळा ॥

करि सीता सति अग्निदिव्य ते ।
सुवर्ण झाले सुवर्ण होते ॥

जळावयाची भीति कुणाला ।
अंगि हीनता असेल ज्याला ॥

पवित्र सीता शूर राम तो ।
नव लंकेश्वर तया वंदितो ॥

९७ नगरि अयोध्या सुखावली अति ।
रामराज्य हो लोक वानिती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री रामाची धर्म कथा ही ।
पवित्र सुंदर पुण्य प्रवाही ॥

तरेल गाउनि कुणि पुण्यात्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

९८ चिरंजीव परमात्म तत्व ते ।
नाशिवंत जन इतर जीव ते ॥

श्री रामाचा वंश वाढला ।
नाम लवांकुश पुत्र तयाला ॥

कालचक्र गति विचित्र भारी ।
पुत्र माउली वसति वनांतरि ॥

श्री रामासह युद्ध जाहले ।
पुत्र पित्याचे तया लाभले ॥

धन्य राम तो धन्य मुले ती ।
सुशील सीता सती धन्य ती ॥

९९ राम प्रभू तो वंद्य जगाला ।
रामराज्य नव हवे अम्हांला ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खंड नववा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१ रामप्रभूच्या मनीं विरक्ति ।
करी राज्य पण नच आसक्ती ॥

नारीकेल फल आतुनि सुटते ।
गमत सारखे बघणाराते ॥

बघणारा नच अंतरज्ञानी ।
म्हणे हेंच ते बघुनि लोचनी ॥

असेल ज्ञानी करात घेइल ।
कर्ण संपुटी तया पारखिल ॥

सुकले पाणी शद्ब उमटतो ।
अरिहंताचा नाद ब्रम्हतो ॥

२ राम प्रभूची ब्रम्ह भावना ।
नित उपदेशी प्रजाजनांना ॥

कुणी निमाले दुरावले कुणि ।
कुणी घेति रस राजशासनी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पत्नि पुत्र वा बंधु सोयरे ।
प्रजा प्रजापति आणिक दुसरे ॥

जरी आपुले मी न तयाचा ।
विरक्त बाणा रामप्रभूचा ॥

३ विरक्त वृत्ति लोकसंग्रही ।
तिथे आपपर कुठेच नाही ॥

असो सान वा असो थोर तो ।
असो शत्रु वा असो मित्र तो ॥

असो प्रपंची कुणि परमार्थी ।
उपदेशामृत पाजि तयाप्रति ॥

४ उपदेशामृत वचन माधुरी ।
स्वये तरुनि या जनास तारी ॥

तीच जगाची तारक नौका ।
जिन धर्माची पुण्य पताका ॥

राम डोलवी नित नत मस्तक ।
भरत बंधुगण शत्रूघ्नादिक ॥

होति अंतरी तृप्त प्राशुनि ।
राम प्रभूची विवेक वाणी ॥

५ म्हणे राम प्रभू जीवा मानवा ।
भवसागर हा भयाण वणवा ॥

यातुनि आपण तरावयाचे ।
पैल तिरावर स्थिरावयाचे ॥

जे तरले ते सदैव तरले ।
आणि तयानी जग उद्धरिले ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जगद्गुरु ते जीव जितेंद्रिय ।
आत्मसुखी ते ते सुख अक्षय ॥

६ अक्षय सुख ते हवे तुलाही ।
अक्षय सुख ते हवे मलाही ॥

तू आणिक मी मिळुनि बने जग ।
परि नश्वर ते तिथेच तगमग ॥

तगमग तळमळ असंतोष तो ।
या भवसागरि पहा उसळतो ॥

७ तरिहि तरावे तुला वाटते ।
तरिहि तरावे मला वाटते ॥

आज वाटते तुला मला जे ।
तोच ध्यास जगि घेतिल जे जे ॥

उद्धरतिल ते जीव सर्वही ।
देति जिनेश्वर जगास ग्वाही ॥

८ उद्धाराची आस अंतरी ।
आज उदेली तुला मला तरि ॥

हाच गमे मज शकुन चांगला ।
हा भवसागर तरावयाला ॥

९ जरी न नौका नच नावाडी ।
उद्धाराची परी आवडी ॥

आवडीत या सुगंध नांदे ।
जगद्गुरूंचे हृदय प्रमोदे ॥

घे आकर्षुनि येइल सत्वर ।
नेइल आम्हा पैल तिरावर ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१० इथे तिथे जग जगांत सुख ना ।
हे तर ठावे जगीं आपणा ॥

दुःख भोगिता स्वप्न सुखाचे ।
कां मग पडते जिवास साचे ॥

सुख स्वप्नातिल सत्य शोधिता ।
सत्यरूप हो जीव तत्वता ॥

तोच जगातिल शाश्वत आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

११ तू आणिक मी भिन्न मानितां ।
सुख दुःखाची जगांत वार्ता ॥

अगणित संख्या जगी जिवाची ।
तीच स्थिती त्या सुख दुःखाची ॥

सुख दुःखाच्या अतीत होता ।
पैलतीर ते ये मग हाता ॥

सांगुनि गेले आज सांगती ।
जीव जिनेश्वर आत्मप्रचीती ॥

१२ आत्मप्रचीती हवी जीवनी ।
तोच ज्ञानमय जीव सद्गुणी ॥

गुण सुमनाचा जगी फुलोरा ।
सेवि मृत्तिका सुगंध सारा ॥

सुगंध ठायी बसुनि दरवळे ।
नकोच वाणी नकोच डोळे ॥

जगि पंचेंद्रिय जीव संस्कृती ।
भिन्न तयाहुनि आत्म जागृती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धनी तिचा तो तू तर आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

१३ शुद्ध स्वच्छ तू सिद्ध पुरुष तू ।
निसर्ग सुंदर विमल ज्ञान तू ॥

कधी मातिमधि सुवर्ण पडते ।
हीन तयावर सर्वेचि चढते ॥

जळे अग्निमधि हीन सर्व ही ।
जसा तसा तू सुवर्ण पाही ॥

१४ क्षणात पर्वत क्षणात माती ।
निसर्ग निर्मित कालगती ती ॥

कालगतीवर विजय मिळविता ।
सर्व आत्मसुख येइल हाता ॥

आत्म सुखी तू प्रसन्न आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

१५ जगात भासे दृश्य सर्व ते ।
कुणी न निरखिति अदृश्याते ॥

तो तर आत्मा आणि तोच तू ।
काल आज वा उद्या न हेतू ॥

ब्रह्मा विष्णु महेश सारे ।
परमात्म्याचे स्वरूप बारे ॥

ज्ञान भक्ति वैराग्ययुक्त तो ।
कर्मबंधनामधुनि मुक्त तो ॥

आत्मसुखाची ध्वजा विराजे ।
समय नाम जगि तुलाच साजे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ऐक्य सुखद ते दुःख भिन्नता ।
दुःख प्रसवते जगी विविधता ॥

गमे विविधता क्षणैक सुंदर ।
आदि अंति पण दुःख निरंतर ॥

१६ जीव जडाचे सदैव भांडण ।
भांडणांत त्या गमे जीव गुण ॥

मांगल्याचा धनी जीव तू ।
दृश्य सृष्टितिल प्रसन्नता तू ॥

भोग भोगणे कर्म अनादी ।
कर्म त्यागिता सहज समाधी ॥

जगद्गुरूंचे घडेल दर्शन ।
स्फुरेल अंतरि वीतराग गुण ॥

१७ जीव जाणतो जरी जगाला ।
तरी असे तो जगावेगळा ॥

समुद्र पाणी पृथ्वी मृत्तिका ।
तयास त्याची नसेच शंका ॥

तेवि तत्व तू जगि अविनाशी ।
दृश्य सृष्टिला उगाच भीशी ॥

१८ अखंड आत्मा खण्ड पृथ्विचे ।
अनेक तांडे तिथे जिवाचे ॥

संसाराचा असा पसारा ।
तयात आत्मा एक बिचारा ॥

सापडायचा तिथे कसा तो ।
जिवा जिवाला प्रश्न पडे तो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१९ भेद बुद्धिमधि अभेद नांदे ।
विघ्न निर्मितो भेद विनोदे ॥

शीतल वारा कुणा दिसेना ।
स्पर्श सुखवितो परी जिवाना ॥

सुखी व्हायचे आत्म्याचा गुण ।
परी रडविती तिथे धूलि कण ॥

व्यवहारातिल भेद जाणता ।
अखंड आत्मा कळे तत्वता ॥

२० धर्म शास्त्र स्वाध्याय ग्रंथ ते ।
आणि सद्गुरू प्रसाद दाते ॥

व्यवहारातिल तत्व सांगती ।
परमार्थाची तिथे प्रचीती ॥

परमार्थाचे ज्ञान ज्ञान ते ।
परमात्म्याविण नसे आन ते ॥

अन्य ग्रंथ ते पोपटपंची ।
सुविचाराची तिथे न उंची ॥

२१ गरुड भरारी दीपकिडे ते ।
पाखरेच पण गुणी भिन्न ते ॥

भिन्न भावना तीच विषमता ।
आत्म प्रचीती तिथेंच समता ॥

२२ तू तर ज्ञानी मूर्त चेतना ।
सुख न मिळे जगि जड जीवाना ॥

सत्य व्रताची तुला आवडी ।
तुला न रुचते चोरि लबाडी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शुद्ध मार्ग जरि तुज आढळला ।
तरी पाहिजे प्रवास केला ॥

२३ प्रवासात या तुला भेटती ।
भले बुरे जन भिन्न प्रकृती ॥

असुनि जलातचि अलिप्त असते ।
कमल सरोवरि तेवि मुक्त ते ॥

तू तर आत्मा नित्य मुक्त तू ।
धर्म सत्य तू अविनाशी तू ॥

२४ साध्य साधना हवेच साधन ।
आत्म साधना धर्म विलक्षण ॥

जिथे न श्रद्धा ज्ञान नव्हे ते ।
ती निष्क्रियता जिवास छळिते ॥

तू तर आत्मा राज्य तुझे हे ।
साहिल ओझे कोण दुजे हे ॥

२५ नव्हेच निद्रा नव्हे जागृती ।
विघ्न थोर हे स्वप्न भ्रमंती ॥

स्वप्न संभ्रमी तारिल तो गुरु ।
विश्वविलासी काम कल्पतरु ॥

आत्मगुणाचा विसर पडेना ।
कर्मबंध तरि घडे जिवाना ॥

दर्पणात जरि सूर्य भासतो ।
परि न समावे दर्पणात तो ॥

इथे तिथे तो तरी उष्णता ।
ती सूर्याची स्वभावसत्ता ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वभाव सत्ता जगी निरंतर ।
असो भूपती असो मुनीश्वर ॥

२६ शिंपल्यात जरि मौक्तिक माला ।
परी न मोती गमे शिंपला ॥

तेवि शरीरी जरि परमात्मा ।
तरी नव्हे जड पुद्गुल आत्मा ॥

परमात्म्याची भेट हवी तर ।
करी प्रेम त्या परमात्म्यावर ॥

२७ बहिर्दृष्टिने ज्ञान नासते ।
कर्म बंध हो जिवाजिवाते ॥

बहुरूप्याचे सोंग टाकिता ।
विमुक्त आत्मा तूच तत्वता ॥

ज्ञानवंत तू तुला नेणसी ।
जडबुद्धीच्या भ्रमांत पडसी ॥

आणिक होशिल जडाहूनि जड ।
भवचक्रातुनि सुटणे अवघड ॥

दृष्टि आंधळी बुद्धि शुद्ध ना ।
तीच जिवाची आत्मवंचना ॥

२८ नव्हेस तू जड पुद्गल ओझे ।
शिरी मिरविसी मानुनि माझे ॥

बुडेल ते जड बुडू नको तू ।
रडविल हे जग रडू नको तू ॥

२९ हा विश्वाचा भव्य पसारा ।
सत्य शोधिता प्रभूच सारा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तिथे कोण तू तिथे कोण ते ।
प्रभु पूजेचे दिव्य द्रव्य ते ॥

दृश्य वस्तुतुनि शुद्ध शोधितो ।
तो तीर्थंकर जना वंद्य तो ॥

३० वचन तयाचे ती भगवत् स्तुति ।
भगवंताची रम्य मूर्ति ती ॥

रम्य मूर्ति ती परमात्म्याची ।
ज्योति अखंडित परमात्म्याची ॥

समान तेथे राव रंक जन ।
समान तेथे भक्तिरसायन ॥

भक्तिरसाची अवीट गोडी ।
कर्मबंधना समूळ तोडी ॥

पुरे अंतरी ज्ञानशलाका ।
बंधमुक्तिची तिथे न शंका ॥

सदैव श्रद्धा सदैव भक्ती ।
सदैव प्रीती आत्मप्रचीती ॥

३१ राजधानि ती नच राजाविण ।
परी न राजे दुजे नगर जन ॥

तेवि मुक्त तू स्वतंत्र आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

३२ तू तर आत्मा मुक्त सदाचा ।
दास होशि का दश प्राणाचा ॥

जिंकिताच ती जग जेतेपण ।
सहजचि येइल तव पदि चालुन ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जगद्वंद्य तू प्रसन्न आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

३३ मोह कर्दमी नको वावरू ।
मार्ग दावितिल तुला सद्‌गुरु ॥

वीतराग गुणि दिगंबरा रे ।
दे फेकुनि जड किल्मिष सारे ॥

धन्य जितेंद्रिय जीव जिनेश्वर ।
तूच तयाचा प्रतिनिधि सुंदर ॥

३४ चंदनगंधा वरित मृत्तिका ।
सुगंध येथे तिथे सारखा ॥

स्वपरभेद हा जिवास ठावा ।
कोण आपुला कोण परावा ॥

३५ परिट घडीचे घेउनि कपडे ।
परिट मिरवितो इकडे तिकडे ॥

मालक म्हणतो वस्त्र मला दे ।
परिट तयाला म्हणे विनोदे ॥

वस्त्र सुताचे वस्त्र रेशमी ।
खरे दिगंबर तुम्ही आणि मी ॥

भेद शोधिता विवेक जागे ।
त्याग बुद्धि ये सर्वच संगे ॥

त्याग पराचा तो परमार्थी ।
नकोच जगणे जीवन स्वार्थी ॥

तिथेच दर्शन ज्ञान चरित ते ।
साम्य भावना तिथें नांदते ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

३६ सोड गाठिची सुवर्ण ग्रंथी ।
क्षणांत येइल तुज श्रीमंती ॥

राख कोळसे आणि अग्नि कण ।
रूप अग्निचे त्रिविध विलक्षण ॥

अनंत गुणि तू तसाच आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

३७ अभेदांत सुख देह दुःखमय ।
जीव प्रंपची बनेल निर्भय ॥

भवभय मोचक ज्ञान अंतरी ।
बुडी मारुनी पहा घडीभरि ॥

भव तारक ते ज्ञान पोहणे ।
जल न बुडविते भयांत मरणे ॥

जीव जिनेश्वर सदैव निर्भय ।
तिथे शांति सुख ते सुख अक्षय ॥

३८ थेंब जलाचा नव्हेच सागर ।
हस्तिदंत ना गज-राजेश्वर ॥

देह निमाला जीव अनादी ।
जन्म मृत्युची तिथे न व्याधी ॥

म्हणुनि कुणी का कुणा मारिते ।
धर्म रक्षितो व्यवहाराते ।

३९ धर्म अहिंसा अधर्म हिंसा ।
एक अग्नि तर एक कोळसा ॥

चैतन्याची तऱ्हा निराळी ।
जड कर्माणु सदैव जाळी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जगांत शाश्वत एकच आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

४० धर्म सखा तो विवेक वादी ।
व्यवहाराची सुवर्ण संधी ॥

नित्य साधितो तोच शाहणा ।
सत्य कळेना कधीं दुर्जना ॥

दश प्राणांनी शरीर नटले ।
मीच शरीरी जिवा वाटले ॥

जड देहाचा कळे न कावा ।
तोवरिं जीवा नसे विसावा ॥

अविश्वास भय तिथेच हिंसा ।
स्वधर्म कौशल धर्म अहिंसा ॥

४१ कुण्या नृपाची मिरवणूक ती ।
कुणी बालिका पाहत होती ॥

असेल राजा भला थोरला ।
परि माणसा समान गमला ॥

राज्यश्रीची तीच भव्यता ।
जिवा जिवातिल रम्य दिव्यता ॥

कमल मृत्तिका आणिक पाणी ।
सरोवराची रम्य आखणी ॥

विशुद्ध पाणी अशुद्ध माती ।
नयन मनोहर कमल प्रकृती ॥

व्यवहाराच्या अतीत होता ।
तत्व अलौकिक येइल हाता ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

४२ जड सृष्टीचे रूप क्षणिक ते ।
क्षणा क्षणाला तुला शिकवितेे ॥

नश्वर काया तू नच नश्वर ।
तू परमात्मा प्रति परमेश्वर ॥

४३ परवस्तूची चटक लागली ।
पद्‌गल कर्दमि मती गुंगली ॥

अज्ञानाचा प्रपंचपट तो ।
फेडिताच प्रभु तिथे प्रगटतो ॥

सकल सृष्टिवर तुझीच सत्ता ।
तिथेच समता तिथेच ममता ॥

परि न आठवे स्वतंत्रता ती ।
जिवा जिवाची अधोगती ती ॥

४४ जिवाजिवामधि नित्य भिन्नता ।
कुठे दिव्यता कुठे भव्यता ॥

खमंग कोठे पुरण पोळि ती ।
परि लोखंडी चणे न शिजती ॥

कर्म चुकेना जगी कर्मफल ।
घडे भोगणे तिथेंच निश्चल ॥

ज्ञान लाभता तुटति बंधने ।
आणि प्रगटती पुण्य लक्षणे ॥

४५ राजहंस तू होशिल तेव्हां ।
दूध आणि जल निरखिसि तेव्हां ॥

मुक्त मण्याचा सेवुनि चारा ।
जगी विहर तू धर्म पाखरा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

४६ लोकमित्र तू शत्रु तुला पण ।
तुला भेटतिल सर्वेचि आपण ॥

मानधनाच्या करितिल चेष्टा ।
पावशील तू तिथे प्रतिष्ठा ॥

काल बदलता वैर साधिती ।
तिथे आपपर येइ प्रचीती ॥

तिथे आत्मरत तोच शाहणा ।
सुख दुःखातहि विवेक बाणा ॥

सौख्य आपुले वाटित सारे ।
दुःख भोगिता मुळि न घाबरे ॥

तोच भूवरी प्रसन्न आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

४७ जड आणिक चैतन्य भिन्न ते ।
होति कुणाचे कुणि न मित्र ते ॥

तुझे शत्रु ते ती जड बुद्धी ।
तुला देति ते दुःख उपाधी ॥

उपाधीस त्या दूर सारिता ।
त्वरे आत्मपद येइल हाता ॥

४८ तुझे शत्रु ते मित्र तयाचे ।
शिरी धरिति तव छत्र भ्रमाचे ॥

छत्रपती तुज म्हणतिल सारे ।
प्रेमभराने करितिल मुजरे ॥

सर्व नाटकी खेळ तयांचा ।
तूच एकला प्रभू जगाचा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

४९ संसारातिल सुखात रमता ।
हारपेल तव मुक्त अवस्था ॥

जडबुद्धी जगि विणीत जाळे ।
त्यात जीव हे किति सापडले ॥

बुडेल आपण तुलाहि बुडविल ।
पायदळी तुज वृथाच तुडविल ॥

विषास अमृत मानु नकोरे ।
घनांधकारी रवि न संचरे ॥

५० मृत्युलाच का मानुनि जीवन ।
दूर लोटिसी तुझे अमरपण ॥

कारण आणिक कार्य एक ते ।
नच मातीचे सुवर्ण बनते ॥

जगी जडाच्या मुखात माती ।
शाश्वत सुंदर आत्म प्रचीती ॥

इष्ट वियोगे अनिष्ट घडते ।
अनिष्ट घडतां शांति भंगते ॥

अशांततेमधि कर्म कटकटी ।
अशांततेमधि भल्या खटपटी ॥

कर्मपटलि या ज्ञान झाकले ।
अंतरंग तप मळीन झाले ॥

५१ आत्मस्वरुपी निर्मल आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

आत्म स्वरूपी लीन होइना ।
नच घाण्याचा बैल शाहणा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तोंड बांधले चाबुक पाठी ।
कर्मगतीची मति उफराटी ॥

तोड बंधने वरिशिल मुक्ति ।
तिथे पाहिजे आत्म प्रचीती ॥

५२ जीव जडाची अशुभ संगती ।
जिवा जिवाची अधोगती ती ॥

धर्म आठवे कर्महि सुटते ।
तरि पाण्यातिल अंतराळ ते ॥

गगन कुठे ते मातट पाणी ।
अधोगतीची कर्म कहाणी ॥

५३ कर्म संचये धर्म घडेना ।
पुण्य वाढवी अहं भावना ॥

हीच अहंता जिवास जाळी ।
राग लोभभय शत्रु मंडळी ॥

कळप मृगाचा मनांत भीतो ।
स्वतंत्र आत्मा सिंह वाघ तो ॥

तुझ्या भोवती बंधन सारे ।
गगनि भरारी घेइ जिवारे ॥

गगनि भरारी उर्ध्वगती ती ।
अनंतात त्या आत्मप्रचीती ॥

५४ काम क्रोधना कुठे स्वार्थ तो ।
परमार्थाचा रम्य प्रांत तो ॥

तिथे न जडता अशिव भावना ।
आत्म शक्तिची समाराधना ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निजानंद तो जिकडे तिकडे ।
जिवा जिवाचे सुटे साकडे ॥

५५ कुंभाराच्या घरांत माती ।
घागर मडकी तवा पराती ॥

फुटले रांजण पुन: मृत्तिका ।
कुंभाराला कुठे न धोका ॥

जडातील तू स्वतंत्र आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

५६ विश्व सृष्टिचा तूंच आरसा ।
जीव तुझ्यावर ठेवि भरवसा ॥

असेल तैसे दिसेल तेथे ।
आत्मरुप ते तुझे आयते ॥

तूच ज्ञानमय निजानंद घन ।
जिथे तिथे तू तुझेच दर्शन ॥

५७ बाग फुलाची तिथेच माळी ।
परि बीजाची कळा निराळी ॥

बीजाविण जगि बाग फुलेना ।
परि माळ्याविन पान हलेना ॥

बीज बाग फल आणिक माळी ।
संसाराची रम्य साखळी ॥

५८ प्रपंच हा परमार्थ जाणतो ।
म्हणुनि जगाला गमे बंधतो ॥

अथांग सागर उफाळतो नित ।
भरति ओहटी क्रिया हि अभ्दुत ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

परि न सोडितो कधि मर्यादा ।
जीव भ्रमाने भोगि आपदा ॥

५९ जडास जाणिव नसे कोण मी ।
नियम सृष्टिचे हित परिणामी ॥

वायु जलाचा सुरेख संगम ।
नाचति लाटा तिथे नसे भ्रम ॥

परंतु मानव तिथेच भ्रमतो ।
बुडेन का मी जलांत म्हणतो ॥

जलात बुडता मृत्यु चुकेना ।
जन्म मृत्यु भवबंध तुटेना ॥

सांगति लाटा सदा गर्जुनी ।
जीव निराळा जड देहाहुनि ॥

६० जगी हुडहुडी भरे अग्निला ।
प्रवाद ना हा कुणी ऐकिला ॥

सृष्टि सतीची सर्व लेकरे ।
धर्म आपला पाळितात रे ॥

असतिल ते जड असोत कोणी ।
एक निराळा दुजापासुनी ॥

जो गुण ज्याचा तोच प्रगटतो ।
सज्जन ना कधि दुर्जन बनतो ॥

६१ जड न चेतना नव्हेच तू-जड ।
परि बंधातुनि सुटणे अवघड ॥

अग्नि जाळितो गवत वाळले ।
ज्ञान सृष्टिचे तुला न कळले ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

काल अनादी अनंत तू तर ।
तुझीच सत्ता कालगतीवर ॥

६२ कालगतीचा चालक मालक ।
चक्रभ्रमामधि मानितोस सुख ॥

फुले कागदी सुरेख गमती ।
परी न परिमल तेवि कालगति ॥

रंग बेगडी सुगंधात सुख ।
उडेल बेगड तुझ्याच सन्मुख ॥

६३ कळेल तुजला कोण खरा तू ।
सुख दुःखाच्या अतीत हो तू ॥

देह बुद्धिने सौख्य मानिसी ।
देह बुद्धिने दुःख भोगिसी ॥

धन्य विदेही तू तर आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

६४ आकाशातिल विशुद्ध पाणी ।
पडे समुद्री पिई न कोणी ॥

संग बाधला तसा तुलाही ।
कुसंगतीतुनि सावध होई ॥

६५ रंग जगाचा जळांत मासे ।
जड बुद्धीने जीवन नासे ॥

नाशिवंत जग जीव जाणतो ।
परी न सावध कसा होत तो ॥

जीव जाणता जगि अविनाशी ।
सम्यग्दृष्टी हवी तयासी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

६६ वसंत ऋतुमधि नवी पालवी ।
पर्जन्याने येइ टवटवी ॥

हिवाळ्यात कशि सृष्टि हासते ।
जिवा जिवाला ग्रास घालिते ॥

हा नैसर्गिक खेळ सृष्टिचा ।
का न कळे तुज दोष दृष्टिचा ॥

तुझ्यामुळे जग तू तर आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

६७ राम कथा नव विचार सागर ।
विवेक सुंदर तत्व मनोहर ॥

तत्व गुणाची मुक्त मालिका ।
आत्म बुद्धिने लेववि लोका ॥

स्वये आचरी जनास सांगे ।
आणि श्रोतृगण तसाच वागे ॥

वागणूक ही रामप्रभूची ।
सदैव सुंदर गणराज्याची ॥

६८ गणराज्याचा अम्हा वारसा ।
राम प्रभूवर ठेवु भरवसा ॥

होत नराचा जगि नारायण ।
जन राज्याचा राम राज्य गुण ॥

गुण सुमनांचा गंध राम तो ।
रावण कंटक कुणास खुपतो ॥

गंध दरवळे खुपेल काही ।
राम राज्य नव हवे अम्हाही ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

६९ राम दिगंबर वृत्ति वरीतो ।
आणि काननी विहार करितो ॥

अंतर बाहिर विशुद्ध जीवन ।
तेवि तपाचे घडे आचरण ॥

सम्मग्दर्शन ज्ञान चरितते ।
जीवन सार्थक तिथेच घडते ॥

७० क्षमा पाहिजे हवीच मृदुता ।
सरल भावना हवी शुद्धता ॥

सत्य अंतरी त्याग सदोदित ।
वृत्ति अंकिचन ब्रम्हचर्य व्रत ॥

दश धर्माचे पालन घडते ।
निजानंदि मन निमग्न होते ॥

७१ निजानंद तो स्फुरे अंतरी ।
नव्हे देह मी मला न वैरी ॥

नवा जन्म ना नवा मृत्यु पण ।
सदा मुक्त मी चिदानंद घन ॥

७२ चिदानंद मति राम प्रभूची ।
श्रेष्ठ भावना अरिहंताची ॥

सर्व घातकी कर्म नासते ।
ध्यान शुद्ध ते शुद्ध ज्ञान ते ॥

अनंत ज्ञानी अनंत सुखि तो ।
अनंत दर्शन वीर्यवंत तो ॥

सिद्धपदावर सुखे विराजे ।
मुक्ति मार्ग तो जिवास साजे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

७१ श्री रामाची मुक्त भावना ।
धरुनि अंतरि मना सज्जना ।।

सुखे भूवरी विहार करितू ।
जिवा जिवातिल स्वधर्म हेतु ।।

पूर्ण कराया कसेल कंबर ।
राज्य तयाचे भरत भूमीवर ।।

उद्या व्हायचे असायचे नित ।
राम प्रभूचे जीवन शाश्वत ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खंड दहावा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१ श्री रामाची धर्म कहाणी ।
श्रेष्ठ त्याग की भोग जीवनी ॥

जिथे त्यागमय जीवन श्रद्धा ।
पाप ताप ना तिथें आपदा ॥

आपदेत त्या सत्व परीक्षा ।
आपदेत त्या स्वधर्म दीक्षा ॥

धर्म तारितो कर्म चुकेना ।
चुकल्या जीवा मार्ग मिळेना ॥

कर्मगतीचे जगात बंधन ।
बंधनांत त्या जीव भ्रमे पण ॥

त्याच भ्रमावर मात करिति जे ।
कीर्ति तयाची जगात गाजे ॥

तोच श्रेष्ठ जगि जीव जिनेश्वर ।
धर्म तयाचा त्याग मनोहर ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

२ कर्मगतीची अगाध लीळा ।
कर्म भ्रमविते भल्या भल्याला ॥

भ्रम बुद्धीने राज्य नासते ।
भ्रम बुद्धीला विश्व हासते ॥

विश्व संगरी नित्य नवे रण ।
चुके न मृत्यू लाभ हानि पण ॥

लाभ हानि ती जया न बाधे ।
तयालाच जगि स्वधर्म साधे ॥

३ धर्म तिथे जय तोच महात्मा ।
निजानंद मति तो परमात्मा ॥

प्रसन्न आत्मा प्रसन्न जीवित ।
भोग बुद्धिने होत कलंकित ॥

जगि अकलंकित धर्म बुद्धिती ।
सदैव राहे सदैव होती ॥

आज काल वा आज उद्यामधि ।
जीव भ्रमति हे जगि लक्षावधि ॥

त्या लाखातिल एक जीव तो ।
प्रपंचात या विजय मिळवितो ॥

४ भव सिंधूतिल ज्ञान दीप ते ।
मुक्त महात्मे सदा सुखी ते ॥

सुख दुःखाची जिथे क्षिती ना ।
धर्म मार्ग तो त्याग भावना ॥

त्या त्यागाचे राज्य भूवरी ।
अशांततेची तया शिसारी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तीच नाचते जगात सांप्रत ।
अहं बुद्धिची तिथे करामत ।।

जळेल जेव्हा जगी अहंता ।
तिथेंच शांती तिथेच समता ।।

त्या समतेची जया न महती ।
तेच जीव जगि पाप प्रकृती ।।

५ पाप प्रकृती कौरव सेना ।
जगू देइना पंडु सुताना ।।

कौरव पांडव युद्ध मातले ।
धर्म तिथे जय जगास कळले ।।

६ धर्म संगरी नुरे अहंता ।
तिथेच शांती तिथेच समता ।।

समता ममता स्वतंत्रता ती ।
जिवा जिवा दे आत्मप्रचीती ।।

७ जगी झुंजती आत्मवैरि ते ।
कुणी क्रूर ते कुणी शूर ते ।।

धर्म शूर ती पांडवसेना ।
धुळीस मिळवी कुरुसैन्याना ।।

८ कौरव पांडव धर्मयुद्ध ते ।
धर्म तिथे जय जगास कळते ।।

भीष्म पितामह प्रसन्न आत्मा ।
विश्वप्रपंची शूर महात्मा ।।

पिता तयाचा शूर सद्‌गुणी ।
परि न गृहामधि गृहस्वामिनी ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वृद्ध पित्याने राज्य आपुले ।
तरुण सुताच्या करी अर्पिले ॥

९ सुत एकुलता वृद्ध पिता तो ।
मन रिझवाया वनी विहरतो ॥

नदी किनारी धीवर कन्या ।
नाव वल्हवी कुणी सुधन्या ॥

तिने जिंकिले चित्त तयाचे ।
द्विधा चित्त हो वृद्ध पित्याचे ॥

१० धीवर कन्या म्हणे राजसा ।
तुला वरिन मी धरी भरवसा ॥

परी गृही मम माय बाप ते ।
कथू वृत्त हे सर्व तयाते ॥

शुभआशिर्वचन धर्म जाणतो ।
विवाह मंगल पुण्य मार्ग तो ॥

११ धीवर वंदुनि म्हणे राजसा ।
अम्ही तुझ्यावर ठेवु भरवसा ॥

परी कालगति विचित्र भारी ।
तिला भीति नित्त जन संसारी ॥

१२ तरुण पत्नि ही वृद्ध पती तू ।
साधणार तुम्हि प्रपंच हेतू ॥

प्रपंचात या मुले लेकरे ।
ती न वनातिल कुणी पाखरे ॥

मान मरातब हवा तयाना ।
राज्य छत्रही हवे तयाना ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

परी आज तव राज्य धुरा ती ।
अम्ही जाणतो तुझ्या न हाती ॥

१३ तू नच राजा तेवी प्रजा पण ।
अम्ही आपुले सर्व प्रजाजन ॥

प्रजाजनाच्या मनात भीती ।
हवे राज्य पद हीच विनंती ॥

१४ दोन वृद्ध ते जन संसारी ।
दुःख भोगिती प्रपंचि भारी ॥

प्रपंचात ना समता ममता ।
दुःख भोगवी स्वराज्य सत्ता ॥

१५ दुःखित राजा गृही पातला ।
कामवासना भ्रमवि तयाला ॥

भिष्म पित्याचे दुःख जाणतो ।
आणि प्रतिज्ञा सर्वेचि करितो ॥

ब्रह्मचर्य व्रत वरीन भूवरि ।
सान बंधुची करिन चाकरी ॥

आज पासुनी मी नच राजा ।
परी प्रजेच्या येइन काजा ॥

राजा राणी राज्य सुखी जगि ।
ब्रम्हचर्य व्रत विषय बिरागी ॥

१६ तरुण विरागी वृद्ध प्रपंची ।
विषमताच ही जगास जाची ॥

जाच जगाला जाच जिवाला ।
जिवा जिवातिल पराभवाला ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

एकच कारण काम वासना ।
ब्रह्मचर्य व्रत प्रेरि सद्‌गुणा ॥

१७ धीवर कन्या महाराणि ती ।
उदरि तियेच्या पुत्र संतती ॥

कौरव पांडव तिचेच नातू ।
भीष्म पितामह स्वधर्म सेतू ॥

जिथे असेना स्वधर्म सत्ता ।
तिथे न समता तिथे न ममता ॥

कुटुम्ब किंवा राज्य असो ते ।
विरोध बुद्धी तिथेच रमते ॥

जगि अविरोधी आत्मशक्ति ती ।
धर्म तिथे जय पुण्य प्रचीती ॥

१८ प्रपंच संभ्रम महा घातकी ।
पुण्यवंत ही होति पातकी ॥

तिथे प्रबळ ती विषयवासना ।
जगी भ्रमविते भल्या भल्याना ॥

१९ धीवर कन्या तरुण अज्ञ ती ।
परी सूज्ञ तो वृद्ध प्रजापति ॥

तरी प्रगटले पशुत्व तेथे ।
काम मोहिनी भ्रमवि तयाते ॥

२० काम वासना नव्हे प्रेम ते ।
प्रेम जिवाला प्रसन्न करिते ॥

प्रसन्न जीवन धर्म मार्गरत ।
भीष्म सुखे वरि ब्रह्मचर्य व्रत ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

२१ राजवटीला शाप दुहीचा ।
घात इच्छिती बंधु बंधुचा ॥

कौरव पांडव जरी बंधु ते ।
राज्य वाटुनी मागत होते ॥

समान वाटप तत्व खरे पण ।
पाच बंधु ते शंभर आपण ॥

स्वार्थ बुद्धि ही अति अविचारी ।
पाच पांडवा जाळुनि मारी ॥

परी न मेले गुप्त जाहले ।
पुनः प्रगटता युद्ध प्रगटले ॥

२२ कौरव पांडव युद्ध पेटता ।
मनांत भ्याली स्वधर्म सत्ता ॥

पाच आणि ते शंभर सारे ।
कुलवंताची सर्व लेकरे ॥

स्वार्थ कर्दमी का मग रुतती ।
परस्पराचा घात इच्छिती ॥

नव्हे धर्म तो ती नच सत्ता ।
नव्हे पराक्रम नच मानवता ॥

तिथे झुंजते आत्म शक्ति ती ।
धर्म तिथे जय पुण्य प्रचीती ॥

२३ आत्म शक्तिचा प्रभाव भारी ।
पांडव केवल पांच भूवरी ॥

कौरव शंभर शूर परंतु ।
मनी तयाच्या अनिष्ट हेतु ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनिष्ट जीवनि इष्ट कोणते ।
आत्मशक्तिला सदैव कळते ॥

म्हणुनि झुंजते जनी आणि वनि ।
आणि मिळविते विजय रणांगणि ॥

२४ मरोत सारे उरो सत्य पण ।
धर्म तिथे जय तत्व चिरंतन ॥

धर्म धुरंधर प्रसन्न आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

२५ परमात्म्याचे राज्य भूवरी ।
उद्या व्हायचे युद्ध तोवरी ॥

सती द्रौपदी राजकन्यका ।
पार्थ तियेचा भ्रतार होता ॥

परि पाचाची म्हणति पत्नि ती ।
अशुभ अमानुष समाजनीती ॥

एक पती पण अनेक कांता ।
असाहि तेव्हां समाज होता ॥

त्याच समाजी घडे कथा ही ।
कथा कशाची मनोव्यथा ही ॥

त्या वाटेवर उभे सहा जण ।
पाप पुण्य हे कूट विलक्षण

२६ जुगार खेळा म्हणुनि जनाला ।
कुणि न सांगती कळे मनाला ॥

परंतु पांडव द्यूत खेळले ।
आणि सतीला पणा लाविले ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

काय करिल ती सती बिचारी ।
पांडव बंधू अति अविचारी ॥

२७ सती द्रौपदी सुशील कांता ।
तिच्या अंतरी विवेक होता ॥

विवेक बुद्धी आत्म शक्ति ती ।
वलय शक्तिचे तिच्या भोवती ॥

२८ विकिली कांता षंढ पंडु सुत ।
जन दरबारी तयास निंदित ॥

कौरव जेतें करिति गलबला ।
इथे बोलवा द्रुपदसुतेला ॥

द्रुपदसुतेची विचित्र दुनिया ।
इथे नागडी करुनि बघूया ॥

निरी हासडू पहा दुर्जन ।
शील सतीचे नच दुर्बल पण ॥

तेज तियेचे प्रगट जाहले ।
आणि अंधसुत होति आंधळे ॥

२९ शील उजळले शत्रू बाधला ।
आणि निघति ते वनवासाला ॥

भूप कालचे आज भिकारी ।
निर्विकार मति जन संसारी ॥

पाप कालचे आज बाधते ।
पुण्य उद्याचे पुढे साधते ॥

तेच भिकारी होतिल राजे ।
रक्त रिपूंचे प्राशुनि ताजे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्या रक्ताची जगी राजवट ।
विचित्र ऐसा जगि जीवन पट ॥

३० वनवासातिल काल सुखाचा ।
मुनी जनांच्या सहवासाचा ॥

दुःख मनातिल जळून जाते ।
उपदेशाने ज्ञान लाभते ॥

ज्ञान दृष्टिला गमे नवे जग ।
राज्य हानिची उरे न तगमग ॥

प्राप्त कर्म मग देइ चेतना ।
तिथे पाप ना तिथे पुण्य ना ॥

अतीत त्याहुनि आत्म प्रचीती ।
नाव तियेचे धर्मजागृती ॥

३१ धर्म जगाचा धर्म जिवाचा ।
जिवाजिवातिल गुण कर्मांचा ॥

वनी विहरता कळे अंतरी ।
सृष्टि शिक्षिका साह्य तया करि ॥

३२ वेलीवरची फुले बिचारी ।
दोन दिसाची संगत सारी ॥

प्रेम करावे कसे न कळते ।
वैर कुणाशी मुळीच नसते ॥

तरी तोडिती मानवप्राणी ।
जीवघेणि ही कर्मकहाणी ॥

३३ जळांत मासे जीव जागते ।
जीवन त्याचे जळा भोवते ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नच भूमीवर पाय ठेविती ।
परी नसे सुख नसेच शांती ॥

येउनि मानव घालित जाळे ।
मरण पाहती उघडे डोळे ॥

३४ सुंदर हरिणी आणि पाडसे ।
वनी विहरती अति उल्हासे ॥

धर्म अहिंसा कर्म अहिंसा ।
परी क्षणाचा नसे भरवसा ॥

तिथेच येती व्याघ्र सिंह कुणि ।
करिति गिळंकृत भक्ष म्हणोनी ॥

३५ व्याघ्र सिंह तरि कुठे सुखी ते ।
फिरति शिकारी तया भोवते ॥

तया मारुनी शूर म्हणविती ।
रणशौर्याची अशीच रीती ॥

३६ कौरव पांडव आप्त बंधुजन ।
वैर तयाचे महा विलक्षण ॥

कुणी विलासी कुणि वनवासी ।
विजयि व्हायचे धर्म तापसी ॥

३७ विजय रणातिल नव्हे नामव्रत ।
नव्हे उपोषण तीर्थ क्षेत्र पथ ॥

नव्हेच पोथी नच पारायण ।
इष्ट देवता प्रणाम पूजन ॥

कर्तव्याची प्रखर प्रतिष्ठा ।
समाज सन्मुख स्वधर्मनिष्ठा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

३८ वनवासातिल उदास वृत्ती ।
बनवि मानवा जगि परमार्थी ॥

परमार्थी मन विवेकवादी ।
स्वभाव सुंदर सुख संवादी ॥

३९ मुनीजनांची घडे संगती ।
कथा पुरातन श्रवणी पडती ॥

जीवन श्रद्धा वनी बळावे ।
पाप मनातिल जळे स्वभावे ॥

४० पांडव होते राजकारणी ।
वनी पातले जुगार खेळुनि ॥

जुगार म्हणजे लाभ अचानक ।
तशीच हानी उरे न लौकिक ॥

परी अलौकिक वनवासी मन ।
सदा शांतता उदात्त जीवन ॥

४१ उदात्त मतिला कळे सत्य ते ।
जीवन जगती कसे विलसते ॥

जीवन म्हणजे नित्य रणांगण ।
हवे भुकेला नवे भक्ष पण ॥

भक्ष भक्षुनी ढेकर देती ।
आणि वानिती जीवन तृप्ती ॥

सरे आजची तृप्ति उद्या पण ।
नवे भक्ष ते नवेच जीवन ॥

४२ एक जगाया सहस्त्र मृत्यु ।
अंति जगेना तोहि परंतू ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हीच जगातिल विचित्र लीला ।
दृष्टि पडें नित साधु जनाला ।।

म्हणुनि मृत्युला ते नच भीती ।
आणि चिंतिती सदैव शांती ।।

शांति तिथे सुख तो तर आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ।।

४३ परमात्म्याच्या जवळ असावे ।
हे वनवासी जनास ठावे ।।

तिथे न तंटा तिथे न भांडण ।
तिथे न कोठे वैर विलक्षण ।।

परी पांडवा हे नच रुचले ।
कौरवकंदन तयास सुचले ।।

४४ जीव जिवाचा शत्रुमित्र की ।
प्रश्न पडे हा सदा लौकिकीं ।।

अंश जिवाचे सदैव भांडण ।
वंश जिवाचे त रणकंदन ।।

अंश वंश ही जगि विधिघटना ।
कुणी कुणाला आप्त मानिना ।।

४५ जगात जीवन कणकण स्फुरते ।
भवसागरिं या समूळ विरते ।।

विरणे म्हणजे मरावयाचे ।
मरुनि जीवनी उरावयाचे ।।

उरणारांचा मनोधर्म तो ।
जित्या जिवाला मार्ग दावितो ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्या मार्गावर साधु आणि मुनि ।
म्हणुनि माधुरी गमे जीवनीं ॥

साधु समागम घडे पांडवां ।
परि जळफळतो मनांत वणवा ॥

४६ राज्य आपुले इथेच होते ।
आणिक होतो जगि जग जेते ॥

आज निमाले ते जेतेपण ।
आणि भटकतो वनात वणवण ॥

तनु वनवासी मन सिंहासनि ।
तिथेच होते युद्धपेरणी ॥

४७ प्रसंग हा जगि कुणी आणिला ।
जरी कांहिसा दोष आपुला ॥

का नच केले कुणि परिमार्जन ।
असुनि आपुले ते न आप्तजन ॥

जीव जगातिल सर्व निराळे ।
धर्मसंकटी कुणि न आपुलें ॥

दंड साहिला दंड करूया ।
आणि शत्रुवर विजय मिळवुं या ॥

४८ कौरव सेना असेल भारी ।
परी न दुबळे अम्हि संसारी ॥

दिले घेतले फिरुनि देइना ।
लढुनि घेउ हा क्षत्रिय बाणा ॥

म्हणोत मुनिजन ही जरि हिंसा ।
धर्म बुद्धिला तिथे दिलासा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धर्म बुद्धि कधि स्वार्थ साहिना ।
समाज कंटक स्वार्थ-साधुना ॥

हवीच शिक्षा हवा दंड तो ।
रणरंगाला नको खंड तो ॥

४९ अम्ही देउं ना चिमूट माती ।
कौरव बंधू म्हणू लागती ॥

पणा लागते जिद्द जनांची ।
ही तर नांदी रणांगणाची ॥

रणांत मृत्यु स्वर्ग लाभतो ।
विजय मिळविता राज्य भोगतो ॥

इथे पराक्रम तिथे पराक्रम ।
म्हणुनि क्षात्रकुलि हवाच विक्रम ॥

५० जगि विक्रम गुण अम्हा पाहिजे ।
गुलामगिरि ती कधि न साहिजे ॥

असतिल कौरव राज्य पदावर ।
असेल प्रेमहि प्रजाजनावर ॥

नव्हे प्रेम ते तो तर कावा ।
स्वार्थ बुद्धिचा विसर पडावा ॥

म्हणुनि प्रेम ते ती नच नीती ।
ये राज्यांती नरक प्रचीती ॥

५१ राज्य जगातिल कसे असावें ।
नच नरकातिल किड्यास ठावे ॥

कीटक मुंगी भृंग श्वापदे ।
राज्य तयाचे जगी होउदे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

म्हणेल का कुणि जीव शाहणा ।
वीर विक्रमी क्षत्रिय बाणा ।।

५२ तयास कळते धर्म काय तो ।
दुष्ट जनाचे वर्म जाणतो ।।

भले बुरे जरि कर्म आचरी ।
प्रामाणिकता परी अंतरी ।।

प्रमाण त्याचे म्हणति मुनीजन ।
धर्म तिथे जय, जय न रणाविण ।।

५३ धर्म तिथे जय क्षात्र वृत्ति ती ।
ती न क्रूरता प्रपंच नीती ।।

कुणी कुणाला साह्य करावे ।
कुणि न कुणाशी वैर धरावे ।।

वैर अहंता दोष अमानुष ।
जित्या जीवनी कालविते विष ।।

५४ प्राण घातकी ती विषबाधा ।
ती न आवरे कुण्या औषधा ।।

औषध त्यावर एक युद्ध ते ।
क्षात्र कुलाविण कुठे न मिळते ।।

५५ धर्म तिथे जय तिथे न भीती ।
प्राण आपुले पणा लाविती ।।

प्राण पणामधि शौर्य आगळे ।
प्राण पणामधि धैर्य आगळे ।।

शौर्य धैर्य ना लढेल कैसा ।
पाय पांगळें चढेल कैसा ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नव्हे पुरुष तो स्त्रीहि नव्हे पण ।
या दोघाहुनि वृत्ति विलक्षण ॥

५६ बाल नव्हे तो आणि वृद्धही ।
जिद्द जीवनी कुठेच नाहीं ॥

धर्म तिथे जय जिद्द पाहिजे ।
तलवारीचे घाव साहिजे ॥

५७ तलवारीवर क्रांति नाचते ।
तलवारीवर शांति नाचते ॥

शांति क्रांतिची ती तर फुगडी ।
तिथे न लेणी तिथे न लुगडी ॥

खणाणती किति शस्त्र अस्त्र ते ।
यश हानीचे गणित व्यस्त ते ॥

तिथे रक्त वा तिथेच आसू ।
तिथे मृत्यु वा तिथेच हासू ॥

अश्रु रक्त वा ती यश हानी ।
भय न बाळगी सैनिक कोणी ॥

५८ रणदेवीचा भक्त फाकडा ।
पडे न त्याचा पाय वाकडा ॥

अंगिं बाणली ती रणनीती ।
रणासाठिं रण कुणि न मानिती ॥

रणासाठिं रण ही तर हत्या ।
सैनिक साधिति रणि सत्कृत्या ॥

सत्कृत्यास्तव लढले पांडव ।
गाति पुराणे ते रण तांडव ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

५९ कौरव राजे न्याय देति ना ।
शस्त्रास्त्रासह सुसज्ज सेना ॥

अन्यायाला शरण जायचे ।
जिते मरण ते प्रजाजनांचे ॥

मना मनामधि कर्मभावना ।
अन्यायाला शरण जाइना ॥

कर्तव्याची तिथेच चकमक ।
घडे जीवनी जगी अचानक ॥

६० युद्ध भडकते नाश जरी तो ।
धर्म तिथे जय-दीप उजळतो ॥

युद्ध काय ते युद्ध कसे ते ।
धर्म कर्मरत भूमि जाणते ॥

६१ म्हणोत तिजला मातृभूमि ही ।
परी मूळची ती सत्याग्रहि ॥

नाशिवंत तनु शाश्वत आत्मा ।
आणि जीव हो जगि परमात्मा ॥

सत्य कळुनि हे जया वळेना ।
जगी जन्मल्या जिवा जिवाना ॥

जागविते नित परि न जागती ।
म्हणुनी मृत्तिके मधि पहुडती ॥

६२ रक्त तयाचे अस्ति मांसही ।
मातृभूमीवर साचत राही ॥

नवे बीज ते नवी मशागत ।
नवी प्रकृती नवी करामत ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नव्या पिकाची नित नासाडी ।
मृत्यु मुखामधि जिवास धाडी ॥

वदन मृत्युचे समर भूमि ती ।
धर्म तिथे जय जीव जागृती ॥

६३ आत्म शक्तीचे स्थान रणांगण ।
इतिहासाचे पान रणांगण ॥

इतिहासाचा मिळे दाखला ।
मुकेजळेल्या युद्ध भूमिला ॥

रक्त आवडे मांस आवडे ।
तेवि अस्थिचे मुखि सांगाडे ॥

तीच भूमि कां सुजला सुफला ।
देइ मानवा फुला फळाला ॥

धन धान्याची तिथे न कमंती ।
कुणी पेरिती कुणी कापिती ॥

कुणी चोरिती जाळितीहि पण ।
कुणा मिळेना बघावया कण ॥

जगी असे कां गुण मातीचा ।
देह मातिमधि मिळावयाचा ॥

६४ असतिल कोणी भाग्यवान नर ।
असतिल कोणी समर धुरंधर ॥

असतिल पापी पुण्यवंत ते ।
असतिल कोणी थोर संत ते ॥

जगास सांगे संत वाणिती ।
कुणि मरणाची धरा न भीति ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

६५ जित्या जिवानी असे मरावे ।
चिरंजीव जगि नाम उरावे ॥

विश्व स्वामिनी समर देवता ।
मृत्यु भयाची तिथे न वार्ता ॥

जिवा जियाचा मुक्ति मार्ग तो ।
मृत्यु मुखातुनि सदैव जातो ॥

नश्वर ही तनु तिथेच जडता ।
जड बुद्धीमधि पाप अहंता ॥

पाप कुणाचे कुणास बाधे ।
धर्म मार्गही कुणास साधे ॥

पाप हराया हवे रणांगण ।
धर्म रणांगणि गमे पुण्यधन ॥

६६ पुण्यवान जन धर्म जाणती ।
म्हणुनि मृत्युची तया न भीती ॥

तिथें शूरता तिथें वीरता ।
धर्म कर्म रत सावधानता ॥

मरोत पापी उरो धर्म धन ।
जना मनाचे सरोत दुर्दिन ॥

६७ आत्म सूर्य जगि नित्त तळपावा ।
विश्व बंधूता भाव स्फुरावा ॥

नकोच भांडण नकोत तंटे ।
तयासाठि रण विचित्र वाटे ॥

विचित्र तरि ती नव्हे क्रूरता ।
आत्म यज्ञ गुणि विश्वबंधुता ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

६८ विश्व जयाचे असेल जितुके ।
धर्म कृत्य ते असेल तितुके ॥
रास असोकी असो तिथे कण ।
धर्म तिथे जय तत्व विलक्षण ॥

६९ कौरव पांडव युद्ध भूमिका ।
एक पातकी मुळीं न शंका ॥
जगि शंकित मति विजयि होइना ।
म्हणुनि निमाली कौरव सेना ॥
विजयश्रीची माळ पांडवा ।
राज्यश्रीचा लाभ पांडवा ॥

७० कथा पुराणी कीर्ति गाजते ।
धर्म तिथे जय जगा सांगते ॥
धर्म तिथे जय धर्म कोणता ।
हेच कळेना कुणा तत्वता ॥
तूं न चांगला म्हणुनि लढाई ।
कोण कसा मी माहित नाही ॥
अशा भ्रमामधि जीव गुंतला ।
कधी व्हायचा कसा मोकळा ॥

७१ जोवरि नाही आत्मजागृती ।
जीव तोवरी भ्रमे भटकती ॥
कुणी करी रण विजय मिळवितो ।
कुणी सेवि वन विरक्त होतो ॥

७२ प्रपंच किंवा विरक्त बाणा ।
तिथे पाहिजे जीव शाहणा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असुनि प्रपंची नच आसक्ती ।
तीच जाणती विरक्त वृत्ती ॥

रण मरणाचे भय न तयाला ।
गर्व वाहिना विजय मिळविला ॥

विजय पराजय शद्ब दोन पण ।
दोन्हि अशाश्वत आत्म निरीक्षण ॥

आत्म निरीक्षणि नुरे अहंता ।
आत्म निरीक्षणि एकवाक्यता ॥

धर्म तिथे जय शाश्वत आत्मा ।
जीव व्हायचा जगिं परमात्मा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खंड अकरावा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१ कौरव पांडव युद्ध संपले ।
श्रीकृष्णाचे सहाय्य झाले ॥

धर्मराज ये राजपदावर ।
परी प्रजेमधि दु:ख अनावर ॥

कोटि कोटि जन रणी निमाले ।
म्हणेल का कुणि मरण चांगले ॥

राज प्रभू कुणि वैर निर्मिती ।
त्या वैराग्नित सैनिक मरती ॥

असतील कांता पुत्र तयाना ।
आणि तयांच्या मायपित्यांना ॥

काय वाटले असेल चित्ती ।
असतील माते शाप देत ती ॥

शाप तयाचा बाधणार ना ।
धर्म गमे मनिं उदासा बाणा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

२ श्री कृष्णाचे कुशल कळावे ।
उदासीन मन प्रसन्न व्हावे ॥

दूत धाडितो करुनि तातडी ।
उभी कर्म गति तिथे रोकडी ॥

कृष्ण निमाला जळे द्वारका ।
वैर बाधते तिथे न शंका ॥

३ वैर बाधते शाप बाधतो ।
धर्मराज मनिं दुःखित होतो ॥

दुःख मनातिल कुणा कथूं मी ।
धर्म चिंतितो अंतर्यामी ॥

अंतर्यामी स्फुरे विरक्ती ।
आणि मावळे उदास वृत्ति ॥

अपूर्ण हे जग तिथे सौख्य ना ।
कळुनि जीव कां तिथे शाहणा ॥

पुनः गुंततो पुनः गुंततो ॥
पुनः पुनः कां दुःख भोगितो ।

दुःख हराया त्यजूं राजपद ॥
राजविलासी मोह आणि मद ॥

मोह आणि मद मत्सर जाळुनि ।
मोक्ष मिळविती जिनेंद्र ज्ञानी ॥

नेमीनाथ प्रभु ज्ञान दयाघन ।
दुःख आमुचे करिल निवारण ॥

म्हणुनि जात तो शरण तयाला ।
सर्व घेउनी स्व-बंधु मेळा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

४ एक वंश वा असो एक कुल ।
एक वृक्ष परि अमित पुष्य फल ॥
फुला फळांचे दैव निराळे ।
स्थान मंदिरी कुणा मिळाले ॥
देव घरांमधि प्रभू पुजिती ।
प्रसाद म्हणुनी सुखे भक्षिती ॥
कुणा बाधते कीड विषारी ।
गमे भिन्नता जन संसारी ॥

५ जन संसारी गमे भिन्नता ।
भीन्न भावना प्रपंच वार्ता ॥
प्रपंचातले अस्थिर जीवन ।
सुख दुःखाचे तिथे येति क्षण ॥
क्षणिक सुखास्तव लग्न मांडिले ।
लग्न मंडपी प्रिय जन जमले ॥
नेमिनाथ ये प्रवेश द्वारी ।
मुकी मेंढरे तिथे बिचारी ॥
कशासाठिं हे पशु प्रदर्शन ।
लग्न सुखास्तव सहस्र भोजन ॥
मूक पशूंचे मांस पाहिजे ।
क्षात्र धर्म अम्हि क्षत्रिय राजे ॥

६ मुक्या जिवाचा घेउनिया बळि ।
भागविती जन भूक आपुली ॥
वरी मिरविती क्षत्रिय बाणा ।
धर्म कुळाचा म्हणे शाहणा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दुष्ट रूढिही नष्ट माणसे ।
विवाह कोठे कुठे बारसे ॥

संसाराची विचित्र लीला ।
सौख्य देइना कुणी कुणाला ॥

आत्मसुखाचा जीव प्रवासी ।
तया हवे सुख जगि अविनाशी ॥

मुक्या जिवाचा नाश साहिना ।
म्हणुनि तोडितो लग्न बंधना ॥

७ मांस सेविता मद्य पाहिजे ।
मदिराक्षीचे नृत्य पाहिजे ॥

इथे व्हायचा विवाह मंगल ।
इथे कृत्य का घडे अमंगल ॥

लग्न सोहळा कांत कामिनी ।
पुढे व्हायचे पुत्र सद्‌गुणी ॥

मुक्या जिवाची कां मग हिंसा ।
राजकुलाची नको प्रशंसा ॥

नको बोहले नकोच कांता ।
नकोत त्या शिरि मंगलाक्षता ॥

संसाराचा त्याग करी तो ।
नेमिनाथ प्रभु महा मुनीतो ॥

८ लग्न नको मज म्हणे नोवरा ।
आणि हळहळे मंडप सारा ॥

हळहळणारे जीव अंध ते ।
नेमिनाथ प्रभु जागृत होते ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

९ जागृत जीवन आत्म शक्ति ती ।
आत्मसुखाची जिवास प्रीती ॥

कळे जिवाला कां मज बंधन ।
बंध तोडिता नहो मुक्त पण ॥

मुक्ति वराया हवी विरक्ती ।
विवेकवादी विरक्त वृत्ती ॥

जीव विवेकी ज्ञानवंत तो ।
मुक्तपणे जगि विहार करितो ॥

वृत्ति दिगंबर कीर्ति स्वयम्भू ।
करिति तपस्या नेमिनाथ प्रभु ॥

तपोभूमि गिरिनार पर्वती ।
पांडवासि प्रभु दर्शन देती ॥

१० कृष्ण आणि बलराम निमाले ।
आणि द्वारका नगर जळाले ॥

नेमिनाथही बंधु तयाचे ।
नाश कुलाचा दुःख व्हायचे ॥

दुःख साहुनी विवेकवादी ।
सवेचि रमती सुख संवादी ॥

असत्य हिंसा आणि अधर्म ।
जीवन खडतर अनादि कर्म ॥

जिवा जिवाला कर्म बाधते ।
नाश कुलाचा दुष्ट कर्म ते ॥

११ धर्म विचारित मुनि राजाला ।
नाश कुलाचा आज जाहला ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आज घडे हे उद्या आमुचे ।
कांहि कळेना काय व्हायचे ॥

काल आज वा उद्याहि उरते ।
असेल शाश्वत सौख्य कोणते ॥

घडो बोध त्या आत्म सुखाचा ।
जगद्गुरू तूं प्रभू आमुचा ॥

१२ प्रभू बोलती पंडुकुमारा ।
गमे प्रपंचचि विचित्र सारा ॥

कृष्ण आणि बलराम बंधु मम ।
प्रपंचात परि उत्तम मध्यम ॥

पहा विचारुनि अंतर्यामी ।
उदाहरण तूं उदाहरण मी ॥

लग्नमंडपा मधुनि निघालो ।
परमार्थी मी नाम पावलो ॥

परि राजुलमति कोण कोठली ।
असेल ना मनि दुखावलेली ॥

दुःख प्रपंची तिलाहि कळले ।
परमार्थामधि अंतर रमले ॥

ती परमार्थी मी परमार्थी ।
परमार्थावर तुझीहि प्रीती ॥

तूं आणिक मी भेद निरसिता ।
इथेच स्फुरते निजात्म सत्ता ॥

१३ निजात्म सत्ता शस्त्र दुधारी ।
अहं भावना नित्य निवारी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हवे नको मज अहंभावना ।
मुक्त मुनी मी अहं भावना ॥

मी पण म्हणजे दुःख शोक भय ।
आत्म जागृती दे सुख अक्षय ॥

अक्षय सुख तो भाव जिवाचा ।
अक्षय सुख तो धर्म जगाचा ॥

धर्म मार्ग रत प्रसन्न आत्मा ।
जीव व्हायचा जगिं परमात्मा ॥

१४ परमात्म्याची ओळख होता ।
जळे मनातिल सर्व अहंता ॥

रुते अहंता दुःख कर्दमी ।
कळे न जीवा नित्य मुक्त मी ॥

मी परमात्मा कळेल जेव्हां ।
विश्व हेचि घर वळेल तेव्हां ॥

तिथे न बंधन तिथे मुक्तता ।
जिवा जिवातिल निजात्मसत्ता ॥

१५ निजात्म सत्ता प्राप्त व्हावया ।
हवा आत्मगुण अभ्यासाया ॥

अभ्यासाची करू उजळणी ।
तोच धर्म जगिं निजानंद गुणि ॥

१६ जीव सचेतन अजीव जड ते ।
आणि जडातहि विविध भेद ते ॥

परमात्मा तो अतीत त्याहुनि ।
स्थान तयाचे नित्य निरंजनि ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जड द्रव्यामधि स्थिती गती लय ।
आणि जीव घे तिथेच आश्रय ॥

काया वाचा मनें बांधला ।
म्हणुनि विसरला परमात्म्याला ॥

१७ जिवा जिवाचे हे जड बंधन ।
जगि दु:खाचे मूळ प्रयोजन ॥

दु:ख हराया हवे तपोबल ।
तिथे विरक्ती विवेक उज्वल ॥

भाव जिवाचे भाव जडाचे ।
भाव बंध ते तुटावयाचे ॥

शस्त्रास्त्राहुनि प्रबल विरक्ती ।
जीव जितेंद्रिय महावीर मति ॥

१८ कर्म बंधना विरहित आत्मा ।
जीव जितेंद्रिय तो परमात्मा ॥

तोच देव गुरु धर्म दयांमय ।
तिथे साम्यता ते सुख अक्षय ॥

नसे अहंता नसे मूढता ।
नव्हे निधर्मी नच नास्तिकता ॥

अशिव दोष किति अशिव भाव ते ।
जगीं बाधिती जिवा जिवाते ॥

तया त्यजाया हवीच जाणिव ।
जाणिवेत त्या वसे सदाशिव ॥

१९ जिनेंद्र वचनी सदैव श्रद्धा ।
धर्म आचरणि सदैव श्रद्धा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संसारातिल सौख्य क्षणिक ते ।
तिथे तयाचे मन नच रमते ॥

सत्य कोणते असत्य ते कां ! ।
नसेच शंका नसे कुशंका ॥

बघुनि दुजाचे दोष आणि गुण ।
दोष निवारुनि करि गुणवर्धन ॥

दया धर्म गुण जे आचरिती ।
तयास शिकवी आत्मबुद्धिती ॥

२० गाय होउनी पाजि वासरा ।
पवित्र प्रेमळ विश्व सोयरा ॥

मातृपितृ कुल असेल मोठे ।
धन दौलत पण असेल कोठे ॥

असेल कोठे रूप आणि बळ ।
गुण सुमनांचा असेल परिमल ॥

विरक्तास परि नसे अहंता ।
सदैव समता सदैव ममता ॥

२१ देव धर्म गुरु कुणि कुविचारी ।
तया न थारा देत अंतरी ॥

चिखल भोवती विमल कमलदल ।
चिखल भोवती सुवर्ण उज्ज्वल ॥

सम्यक्दर्शन ज्ञान चरित ते ।
इंद्र देव तो वंदि तयाते ॥

तेच जीव जगिं त्रिकालज्ञानी ।
ते अजरामर सिद्ध आणि मुनि ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्रिलोकांत या सुखे विहरती ।
धन्य धन्य ती मुक्त मनस्थिति ॥

२२ नर जन्माचा लाभ जाहला ।
नश्वर नरतनु कळे जिवाला ॥
याच देहिं जगिं पद अविनाशी ।
मिळावयाचे जिवा जिवाशी ॥
जीव जाणता तरेल अंती ।
जगिं भव बंधन अधोगती ती ॥

२३ सम्यग्दर्शन ज्ञान चरित ते ।
सूर्यप्रकाशासमान गमते ॥
तिथे आपपर पदार्थ कळतो ।
परवस्तूंचा त्याग घडवितो ॥
दर्शन घडतां होत ज्ञान ते ।
परी ज्ञान ते स्थिर न राहते ॥
कारण कर्ता एक दुजे पण ।
प्रकाश ज्योती स्वयेचि आपण ॥
प्रत्यक्षाला नको आरसा ।
मुनिवचनावर हवा भरवसा ॥

२४ कुठे ऐकिले कांहिं पाहिले ।
त्यातुनि काहि मनीं राहिले ॥
मुनिजनमानस मनोनिग्रही ।
साम्य निरखिती आणि भेदही ॥
केवलज्ञानी जीव आगळा ।
तो परमात्मा गमे जिवाला ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

२५ जगांत वस्तू किती किती गुण ।
गुणागुणांचे यथार्थ दर्शन ॥

वस्तु वस्तुमधि भिन्न भाव ते ।
म्हणुनि विषमता जगीं नांदते ॥

विषमतेतही समान आत्मा ।
जीव व्हायचा जगिं परमात्मा ॥

२६ शाश्वत प्रीती तीच विरक्ति ।
विरक्तीत त्या आत्मप्रचीती ॥

कोटि जन्म घे जगात प्राणी ।
मुक्त होइना परि अज्ञानी ॥

ज्ञाननिष्ठ ते धर्मनिष्ठ ते ।
क्षणांत होती जीव मुक्त ते ॥

२७ जना उद्धरी जिनेंद्रवाणी ।
परी नसावा जन अज्ञानी ॥

अमोल मोती त्यजी सिंधुमधि ।
जिवा जिवातिल तीच कुबुद्धी ॥

व्यर्थ जाति कुल व्यर्थ राज्य ते ।
क्षणात असते क्षणात नसते ॥

जगि ज्ञानाविण सर्व अशाश्वत ।
ज्ञानरूप मतिं विमुक्त निश्चित ॥

२८ स्वतंत्र आत्मा शुद्ध सदाचा ।
स्पर्श साहिना परद्रव्याचा ॥

जगिं पंचेंद्रिय जीव अनादि ।
अज्ञानाच्या जळे अग्निमधि ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विषयवासना घालित फुंकर ।
आग भडकते तिथें भयंकर ॥

संसाराची धूळधाण ही ।
जड बुद्धीला कळे न काही ॥

ज्ञान जलांविन आग विझेना ।
आणि शांतिचे सौख्य मिळेना ॥

सांगत आले मुक्त महात्मे ।
आणि सांगतिल उद्याहि प्रेमे ॥

२९ पाप पुण्य ते जगिं जडजीवन ।
त्रासि जिवाला हे भवबंधन ॥

जगीं सनातन एक सत्य ते ।
कधि ज्ञानाविण मुक्ति न मिळते ॥

३० सम्यग्ज्ञानी जीव शाहणा ।
करी न हिंसा दुःख देइना ॥

विरक्त अथवा असो प्रपंची ।
नच निंदा स्तुति करी कुणाची ॥

जन मर्यादा मन मर्यादा ।
प्राप्त प्रपंची मुळी न बाधा ॥

जन संसारी ब्रह्मचर्य व्रत ।
जन संसारी विवेक जागृत ॥

३१ विरक्त मुनि तो मनोनिग्रही ।
नसे अन्न वा वस्त्र-संग्रही ॥

त्यजी ग्राम गृह वनी विहरतो ।
गमे विदेही मुक्त जीव तो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

३२ संसारातिल कथा न तेथें ।
प्रपंचातली व्यथा न तेथें ॥

असुनि नसे मी मनीं भावितो ।
क्षणाक्षणाला वेध लावितो ॥

तया वंदुनी प्रपंच प्रीती ।
दुःख हराया वरी जागृती ॥

कुणी प्रपंची कुणि परमार्थी ।
जन संसारी पुण्य आचरिति ॥

पाप नको ते पुण्य घडो पण ।
पुण्याईतिल नको अहं गुण ॥

अहंकार हा मनी न जेथे ।
मुनि प्रापंचिक समान तेथे ॥

विरक्त तेथे रमतिल प्रेमे ।
पवित्र होतिल ती गृहग्रामे ॥

जनिं प्रापंचिक मनिं सन्यासी ।
देह व्हायचा स्मशानवासी ॥

पुनर्जन्म जगिं नसे तयांना ।
मुक्त जितेंद्रिय जिनेंद्रबाणा ॥

३४ भाग्यवान जगिं विमुक्त आत्मा ।
वीतराग गुणि तो परमात्मा ॥

प्रतापशाली वीर विरागी ।
भोग भावना समूळ त्यागी ॥

माय मुलांचे क्षेम चिंतिते ।
क्षेम चिंतनी भोग त्यागित ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्या त्यागाची तिथे प्रचीती ।
विश्व मोहिनी निजानंद मति ॥

३५ निजानंद मति ज्वलंत अग्नी ।
तयास वारा साह्य करी जनि ॥

जळुनि जात जगिं नश्वर सारे ।
आत्म-रूप शिव सुखे संचरे ॥

३६ वीज चमकुनी क्षणात जाते ।
इंद्र धनूचे रूप बदलते ॥

तेवि जगातिल सुख क्षण भंगुर ।
गणुनि अंतरी रमे निरंतर ॥

इंद्रादिक ते असोत कोणी ।
हरिण पाडसा जेवि सिंहिणी ॥

मारुनि खाते तेवि मृत्यु तो ।
जित्या जिवाला कधी न चुकतो ॥

३७ मणि मंत्रादिक सर्व फोल ती ।
जगिं अजरामर आत्म प्रचीती ॥

तिलाच कळते हें जग नश्वर ।
संसारातिल दुःख भयंकर ॥

असार हा संसार त्यागिता ।
आत्म सौख्य ये सवेचि हाता ॥

३८ जीव निराळा देह निराळा ।
एकरुप जरि गमे जगाला ॥

दुधात पाणी दूध नव्हे जल ।
तेवि भिन्न ते जीवन उज्ज्वल ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

देह गणी जरि गृह सुत दारा ।
तरि नश्वर जगि प्रंपच सारा ॥

कुणी कुणाचा नव्हेच जगती ।
जगिं अजरामर आत्म प्रचीती ॥

पवित्र आत्मा देह मलिन तो ।
मलिन वस्त्र ते फेकुनि देतो ॥

तिथे राग ना लोभ कुणावर ।
निजानंद मति मूर्ति दिगंबर ॥

३९ योग याग विधि नकोच कांहीं ।
पाडि अहंता भेद प्रवाही ॥

भाव शुभाशुभ पाप पुष्य फळ ।
नकोत अंतरि हवे आत्मबल ॥

तिथेच शांती तिथे सौख्य ते ।
परि जनजीवन स्थिर न राहते ॥

म्हणुनि पाहिजे ध्यान जीवनी ।
धन्य तपस्वी मोक्ष मार्ग गुणि ॥

४० कुणी निर्मिले कधीं न हे जग ।
हवी कशाला उगीच तगमग ॥

वस्तु अशाश्वत जगतिल ना ती ।
मग मृत्यूची कशास भीती ॥

वस्तु मात्र जड जीव निराळा ।
नसे जीवनी नाश तयाला ॥

शाश्वत आत्मा इथे तिथे तो ।
तिथे विरक्ती साम्यभाव तो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

४१ अभाविकाना मिळे न मुक्ती ।
मृत्यु चुकेना दुःख भोगिती ॥

भाग्यवान कुणि मुक्त महात्मे ।
सदा सुखी ते ते सुख प्रेमे ॥

आत्मबुद्धिनें जना अर्पिती ।
अति दुर्लभ ती आत्मप्रचीती ॥

अति निर्मोही आत्मसौख्य ते ।
तिथे धर्म हे जयास कळते ॥

तोच जगद्गुरु मुक्त महात्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

४२ रत्नत्रय गुण धर्म निपुण तो ।
आत्म शक्तिने जग उद्धरितो ॥

धन्य महात्मा वीतराग गुणि ।
सुखे विहरतो जनी आणि वनिं ॥

मनांत त्याच्या ब्रह्मभावना ।
मुक्त मुनीश्वर स्वतंत्र बाणा ॥

४३ राग लोभ ना घडे न हिंसा ।
परमात्म्याची नित्य प्रशंसा ॥

चैतन्याचे तेज आगळे ।
दोष सर्व ते जळून गेले ॥

विश्व सुखाचे सदैव चिंतन ।
अमृत स्त्रवते सदा मुखातुन ॥

संशय सारा दूर सारिला ।
हे जग मिथ्या कळे तयाला ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

४४ पुण्यशील कुणि श्रावक येती ।
महात्म्यास त्या सुखे वंदिती ॥

असे जोवरी शरीर संस्था ।
तिला अन्नजल हवे तत्वता ॥

शरीरसंस्था तप आचरिते ।
म्हणुनि देति कुणि अन्न तयाते ॥

तृप्त महात्मा तृप्त प्रपंची ।
एक देइ पण दुजा न याची ॥

४५ सम्यग्दर्शन ज्ञान चरित ते ।
भावमूर्ति ती जगी विहरते ॥

देह भिन्न पण मनी एकता ।
मृगगण खगगण येति तत्वतां ॥

सुस्थिर मूर्ती बघुनि बिलगती ।
मुक्या जिवाची भाव भक्ति ती ॥

परी न भंगे सहजसमाधी ।
मीच एकला ही दृढ बुद्धी ॥

समता ममता स्वतंत्रता ती ।
प्रसन्नतेची तिथे प्रचीती ॥

जिथे तिथे तो जीव जिनेश्वर ।
सदैव श्रद्धा आत्मबुद्धिवर ॥

४६ रत्नत्रय गुण सदा तापसी ।
असो एकला बहुजनवासी ॥

प्रपंचनिष्ठा मानुनि नश्वर ।
धरि दृढ श्रद्धा परमात्म्यावर ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जगीं व्हावया आत्मप्रचीती ।
जड बुद्धीचे कवच छेदिती ॥

तिथे एक रस एकच आत्मा ।
निजानंद गुणि तो परमात्मा ॥

४७ अभेद बुद्धी तिथे नांदते ।
चैतन्याचे स्थान दिव्य ते ॥

आत्म अनुभवी विकल्प छेदी ।
निर्विकल्प ती साधि समाधी ॥

निजानंद मति तिथे प्रगटते ।
देवेंद्रासहि जी न लाभते ॥

केवलज्ञानी जाळि कर्मवन ।
तिथे आत्मसुख कृतार्थ जीवन ॥

तोच सिद्ध भगवंत तोचरे ।
आत्म स्वरूपी तोच संचरे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खंड बारावा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१ आदिनाथ प्रभु पुण्य प्रभा ती ।
भरतभूमीवर तेवत होती ॥

अजितनाथ प्रभु संभव प्रभु ते ।
अभिनंदन प्रभु सुमतिप्रभू ते ॥

प्रभुपद्मप्रभ सुपार्श्व प्रभुही ।
प्रभु चंद्रप्रभ पुष्पदंतही ॥

शीतल आणिक श्रेयांसहि ते ।
वासुपूज्य प्रभु विमल चरित ते ॥

अनंतजिन प्रभु धर्म प्रभू पण ।
शांतिनाथ प्रभु कुंथुनाथ पण ॥

अरहनाथ प्रभु मल्लिनाथ गुणि ।
मुनिसुव्रत ते नमींद्र ज्ञानी ॥

अरिष्ट नेमी पार्श्वनाथ प्रभु ।
महावीर ते ज्ञान स्वयंभू ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

२ काळोखाचे हो निर्दाळन ।
मधींच सुटतो कधी प्रभंजन ॥

नांव तयाचे पिसाट वारा ।
सदैव भिववी जन संसारा ॥

अज्ञानाची उधळत माती ।
संसारी जन नेत्र चोळिती ॥

दृष्टि असुनिही तया दिसेना ।
म्हणुनि भोगिती अमित यातना ॥

३ भव संसारी खडे सराटे ।
व्याघ्र सिंह वा सर्पहि मोठे ॥

उतराया विष येत धाउनी ।
महावीर प्रभु विशाल ज्ञानी ॥

४ यज्ञ पशुंची घडो न हिंसा ।
स्फुरो अंतरी धर्म प्रशंसा ॥

असोत ब्राह्मण की क्षत्रिय जन ।
वैश्य शूद्र वा हीन तयाहुन ॥

समता ममता स्वतंत्रता ती ।
तिथे असावी नव अनुभूती ॥

५ स्त्री पुरुषातहि भेद नसावा ।
आत्मोद्धारक पथ गवसावा ॥

अज्ञानाचे तिमिर सरू दे ।
मूर्ख रुढिचे पटल नुरु दे ॥

जिवाजिवातिल प्रसन्न आत्मा ।
जिता जागता तो परमात्मा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

६ परमात्म्याचे सदैव दर्शन ।
घडेल जेथे मज रात्रंदिन ॥

अशा ठायि मज जन्म मिळावा ।
हीच वासना जिवा मानवा ॥

७ तो जीवात्मा महावीर तो ।
भरत भूमिमधि सुखे प्रगटतो ॥

८ राजकुलामधि जन्म जाहला ।
हर्ष जाहला मायपित्याला ॥

त्रिशलादेवी माय तयाची ।
सती शोभते सिद्धार्थाची ॥

गण राज्याचा सुविद्य नेता ।
म्हणुनि वानिती जन सिद्धार्था ॥

राजधानि ती विशाल नगरी ।
वैशाली हे नाम सार्थ करि ॥

९ मुहूर्त मंगल पुत्र जन्मला ।
महावीर प्रभु नाम तयाला ॥

१० शुभ कर्माचे सुरेख लक्षण ।
येत प्रचीति शुभ स्वप्नातुन ॥

शुभदिनि झाला पुत्र देखणा ।
ये आमंत्रण सुवासिनींना ॥

राजकुलाची नव पुण्याई ।
सुवासिनी त्या गाति सर्वही ॥

११ प्रजा जनांचे प्रेम दांडगे ।
राजगृहातिल सुख संयोगे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चढूं लागले वाढु लागले ।
ढोल नगारे झडू लागले ॥

१२ राजगृही हो मंडप गर्दी ।
येरझारती जन लक्षावधि ॥

स्वागत करिती नृपहि तयाचे ।
थोर भाग्य हे जन राज्याचे ॥

१३ राजपुत्र तो महावीर मति ।
बाळपणातचि वरित विरक्ती ॥

पूर्व जन्मिचे प्रबल पुण्य फळ ।
बाळपणातचि अंतर निर्मळ ॥

निर्मळ अंतरि धर्म भावना ।
पूर्व जन्मिचा प्रताप बाणा ॥

१४ विषय सुखाचा तुरेच ध्यास ।
म्हणुनि तोडितो प्रपंच पाश ॥

विरक्त होउनि निघे काननी ।
ब्रह्मचारि तो तरुण महामुनि ॥

१५ चिंतनात मनि स्फुरते काय ।
आत्म जागृती हा सदुपाय ॥

हवा जनाला हवा मनाला ।
जना मनातिल संसाराला ॥

संसाराची शुद्धि चिंतितो ।
चिरंजीव मुनि महावीर तो ॥

१६ राजपुत्र तो प्रखर तपस्वी ।
अन्न वस्त्र ना नित उपवासी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उपवासाचे फिटे पारणे ।
देइ चंदना अन्न प्रीतिने ॥

अभागिनीचे भाग्य उजळले ।
पुण्यात्म्याने कृतार्थ केले ॥

१७ पुण्य पुरुष तो पुण्यमती ती ।
पाप हराया विहार करिती ॥

विहारकाली कितीक ज्ञानी ।
कितीक राजे आणि रंक कुणि ॥

त्यासर्वांचे समाधान हो ।
आत्म जागृती धर्म गान हो ॥

धर्म बीज ते रुजे अंतरी ।
जड जीवांचे पाप ताप हरि ॥

१८ स्वतंत्र सुंदर सतेज आत्मा ।
धर्म रूढीच्या घोर कर्दमा ॥

मधि रुतलेल्या जना तारितो ।
प्रभावशाली तीर्थंकर तो ॥

१९ धर्म रुढिच्या वृथा कल्पना ।
नित्य भिवविती अज्ञ जनाना ॥

आत्मबुद्धिने जरि अज्ञानी ।
त्यात शाहणा वृथाभिमानी ॥

यज्ञ याग व्रत मुहूर्त सांगे ।
परि न तयापरि आपण वागे ॥

अज्ञ जनांची पिळवणूकही ।
विरक्त मतिला असह्य होई ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

२० सहनशीलता सुखी असेना ।
सहनशीलता स्तब्ध बसेना ॥

सुखासाठि जरि यज्ञ याग व्रत ।
तपाचरण का नको तुम्हा प्रत ॥

तपसामर्थ्ये पाप आटते ।
तपसामर्थ्ये भाग्य उजळते ॥

तपसामर्थ्ये मिळे पुण्यधन ।
तपसामर्थ्ये कृतार्थ जीवन ॥

नव जीवन हे मिळो आपणा ।
महावीर मति देइ प्रेरणा ॥

२१ यज्ञ याग व्रत मुहूर्त वेडे ।
वेड पसरिती सुखे चहुकडे ॥

घरांघरातुनि व्रत उद्यापन ।
घरांघरातुनि ब्राम्हण भोजन ॥

मंत्र तंत्र ते प्रयोग नाना ।
आणि ब्राम्हणा हवी दक्षणा ॥

स्वर्ण पुष्प ते अन्न वस्त्र ही ।
जगावयाची ददात नाहीं ॥

२२ आशिर्वचने पुण्य जोडते ।
तयास भुलती अंधश्रद्ध ते ॥

मूर्ख रूढिची जुनी लक्तरे ।
धर्म म्हणुनि शिरि मिरविति सारे ॥

तिथे ज्ञान ना मूर्ख अहंता ।
अज्ञ जनांवर गाजवि सत्ता ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

२३ पोकळ पाया टिकेल कुठवर ।
कधि न कधी तरि ढासळते घर ॥

आणि शेवटी तसेच झाले ।
यज्ञ पशूंचे प्राण वाचले ॥

२४ यज्ञमंडपी मंत्र घोष तो ।
यज्ञ मंडपी अग्नि प्रगटतो ॥

बलिदानाचा समय पातला ।
चमत्कार त्या क्षणांत घडला ॥

महावीर जय म्हणुनि गर्जती ।
लोक मंडपा बाहिर पडती ॥

२५ यज्ञ पशू वनि उधळुनि गेले ।
ब्राम्हण म्हणती पुण्य भंगले ॥

२६ कितीक होते त्यांत सूज्ञ जन ।
करू लागती आत्म निरीक्षण ॥

आत्म निरीक्षण पुण्य प्रकृती ।
आत्म निरीक्षण विवेक जागृति ॥

विवेकबुद्धी म्हणे ब्राम्हणा ।
धर्मनिष्ठ तू कर्मनिष्ठ ना ॥

यज्ञ पशूंची नकोच हिंसा ।
सदाचार व्रत धर्म अहिंसा ॥

स्मरुनि शरण जा महावीर तो ।
कृपाकटाक्षे कृतार्थ करितो ॥

२७ महावीर प्रभु धर्म सांगती ।
कितीक ब्राम्हण क्षत्रिय नृपती ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वैश्य शूद्र ते अन्य तयाहून ।
कुटुंबवत्सल वनवासी जन ॥

ऐकुनि कानी पवित्र होती ।
सदाचार गुणि जैन संस्कृती ॥

२८ जैन संस्कृती सत्य अहिंसा ।
जैन संस्कृती घडो न हिंसा ॥

जैन संस्कृती प्रेम जनावर ।
मनामनातिल आत्म गुणावर ॥

आत्मगुणी जन अनेकान्त मति ।
जना मनातिल स्वतंत्रता ती ॥

स्वतंत्र मी तूं स्वतंत्र आपण ।
जैन संस्कृती परम आत्मगुण ॥

परमात्म्याशी सख्य हवे तर ।
हवीच श्रद्धा आत्मबलावर ॥

ही मृत्युंजय जैन संस्कृती ।
गणधर ज्ञानी जनां सांगती ॥

२९ महावीर प्रभु धर्म प्रवर्तक ।
महावीर प्रभु कर्म प्रवर्तक ॥

महावीर प्रभु स्वतंत्र वृत्ती ।
महावीर प्रभु लोक जागृती ॥

प्रभुदेवाची प्रीति जयाला ।
तिथेच शांती मिळे तयाला ॥

३० नरजन्माचे सार्थक झाले ।
असंख्यात जन जगि उद्धरिले ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चुकल्या वाटे लोक धांवती ।
तिथे चुके ना कधी अधोगति ॥

अति कनवाळू वीर महात्मा ।
विरक्त नेता प्रसन्न आत्मा ॥

शरण येति नित जन संसारी ।
धर्म प्रबोधे तया मुक्त करि ॥

३१ धर्म प्रपंची अनंत व्याधी ।
अमित कल्पना अमित उपाधी ॥

तारक नौका तरेन कां मी ।
भीति प्रगटते अंतर्यामी ॥

ही अश्रद्धा अधर्म तेथे ।
धर्म कर्म रत जगद्गुरु ते ।

स्वये आचरुनि मार्ग दाविती ।
म्हणुनि रुजे दृढ श्रद्धा भक्ती ॥

३२ भक्त जनांचे दुःख हरावे ।
मुक्त जनांच्या समान व्हावे ॥

मुक्त जनांच्या समान होता ।
जगी प्रगटते स्वधर्म सत्ता ॥

स्वधर्म मार्गी भक्त मुक्त जन ।
स्वधर्म मार्गी राव रंक पण ॥

पशु पक्षी वा वन्य श्वापदे ।
किडा मुंगि वा कुणि रणयोद्धे ॥

सर्व अहिंसा व्रताचरण गुणि ।
धर्म मार्गरत गमे मेदिनी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

येइल ऐसा सुदिन कधी तो ।
महावीर प्रभु नित्य चिंतितो ॥

३३ सत्‌धर्माचे सदैव चिंतन ।
देह इंद्रिये वरिति तोच गुण ॥

मनात आत्मा जनात आत्मा ।
गमे स्मृतीमधि प्रभु परमात्मा ॥

परमात्म्याचे अनंत गुण ते ।
येति शरीरी स्थिरावयाते ॥

शुद्ध दूध हो पवित्र काया ।
दिव्य तेज ये नेत्रि स्थिराया ॥

३४ सुवर्ण खाणी आणि स्वर्णकण ।
भिन्न असेना एक दुजाहुन ॥

चैतन्याची मूस उसळते ।
कणाकणाने शरीर सरते ॥

चैतन्याचा वास शरीरी ।
शरीर नश्वर ध्येय दृष्टि खरि ॥

नश्वर काया त्यजी महात्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

३५ पावापुरिचा प्रसन्न परिसर ।
पवित्र वातावरण मनोहर ॥

महावीर प्रभु तिथे विहरती ।
जनात शांती मनात शांती ॥

मनामनातिल प्रेम भाव तो ।
प्रभु परमात्मा पूर्ण जाणतो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रेम स्वरुपी लीन होति, ते ।
आणि पावती मोक्षपदाते ॥

३६ सरोवरातिल पाणि घेतले ।
सरोवरामधि सोडुनि दिधले ॥

सरोवराचा नफा न तोटा ।
जन्म मृत्युचा खेळ करंटा ॥

जन्म लाभतो जगिं विहराया ।
मृत्यु पाहिजे वृत्ति स्थिराया ॥

स्थिरावली मति तोच महात्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

३७ परमात्म्याचे दर्शन घ्यावे ।
विश्व जनाचे क्षेम पुसावे ॥

ह्मणुनि स्वर्ग ये भूमितलावर ।
प्रेम तयाचे परमात्म्यावर ।

३८ तो परमात्मा इथेच होता ।
पुण्य भूमिवर नित्य विहरता ॥

स्वर्ग भूमिचे प्रेम जडावे ।
जिन धर्माचे सार्थक व्हावे ॥

मनी रुजावी सत्य अहिंसा ।
घडो न पातक घडो न हिंसा ॥

नाश तयाचा समूळ व्हावा ।
आत्मसूर्य तो जगिं प्रगटावा ॥

ह्मणुनि प्रयत्ने तनू झिजविली ।
पुण्य भूमिला अर्पण केली ।

Gaṅesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

३९ तनु त्यागिता कीर्ति उरावी ।
अंधतमाची भीति नुरावी ॥
म्हणुनि जन्मली तिथे दिवाळी ।
सण भाग्याचा गमे भूतळी ॥
चिरंजीव ते महावीर प्रभु ।
चिरंजीव तो धर्म स्वयंभू ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खंड तेरावा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१ आदि प्रभूचे पराक्रमी कुल ।
तत्पुत्रांची सुकीर्ति उज्ज्वल ॥

भरतेशाचे जगजेते पण ।
बाहुबलीचे आत्म समर्पण ॥

तीन विभूती एक अहिंसा ।
जैन जितेंद्रिय धर्म प्रशंसा ॥

२ धर्म अहिंसा स्वयें मारि ना ।
मारिति त्याला मारु देइना ॥

प्रतिकारकता आत्म्याचा गुण ।
सत्यधर्म तो आत्मसमर्थन ॥

आत्मसमर्थन सहिष्णुता ती ।
आत्मसमर्थन ती रणनीती ॥

रणनीतीमधि युद्ध संभवे ।
आणिक हत्या घडे स्वभावे ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

३ जिथे रणांगण तिथेच हिंसा ।
तिथे कोठला धर्म अहिंसा ॥

गमेल कोणा अवघड कोडे ।
धर्मात्म्याना मार्ग सापडे ॥

४ धर्म मारिना धर्म मरेना ।
मरेल त्याना नको ह्मणेना ॥

नश्वर तनु ही उद्या जायची ।
जिवा जिवाची होळि व्हायची ॥

होळीमधले किती अग्निकण ।
अग्निकणाला हवेच इंधन ॥

इंधन ह्मणजे जगांत जडता ।
मी न जगीं जड ह्मणे जाणता ॥

जिवा जिवातिल जाणिव आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

५ जगांत भांडण जिथे तिथे कां ।
कुणि धर्मात्मा घेइल शंका ॥

शंकित मानस अहंकृती ती ।
जीव जडाची कुसंगती ती ॥

कुसंगतीने जीव नासतो ।
आणि जडाच्या अंकित होतो ॥

हीच जिवाची पराधीनता ।
तिथें पाहिजे निजात्मसत्ता ॥

६ सत्तेसाठी जगांत भांडण ।
आणि हरपतो तिथें आत्मगुण ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आत्मगुणाची जाणिव जेथे ।
धर्म अहिंसा सदैव तेथे ॥

७ धर्म अहिंसा सदाचार तो ।
कधिं सत्याला सोडुनि नसतो ॥

जंवर होति ना सदाचारि जन ।
तंवर जगामधि नित रणकंदन ॥

तिथें आदिप्रभु भरत बाहुबलि ।
कथा तयांची विक्रमशाली ॥

राम लक्ष्मण तिथेच सीता ।
हनुमंताची विक्रम गाथा ॥

रावण गेला राम कथा ती ।
अजुनि गाजते इथे भारती ॥

कुरुक्षेत्रि या पांडव लढले ।
महाभारतहि इथेच घडले ॥

भरतभूमिचा धर्म अनादी ।
परी नांदते जगी जडबुद्धी ॥

जीवजडाचे हो रणकंदन ।
सदाविजयि हो आत्म्याचा गुण ॥

गुण आत्म्याचा सदा जागतो ।
जिवाजिवाना जागवीत तो ॥

ते पुण्यात्मे धर्म वीर नर ।
जगद्‌गुरूते ते तीर्थंकर ॥

महावीर प्रभु प्रताप बाणा ।
पुण्यमार्ग नित दावि जिवाना ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उरे पुण्यं जगि सरे पाप ले ।
धर्मात्म्याची कीर्ति गाजते ॥

८ सत्य अहिंसा शस्त्र दुधारी ।
दुर्बलतेची तया शिसारी ॥

धर्म तिथे जय तिथेच वैभव ।
सत्य साहिना कधी पराभव ॥

९ पुण्यात्म्यांना इथे कष्ट कां ? ।
धर्मात्म्यांना इथे कष्ट कां ? ॥

जगीं पुण्यधन धर्मात्म्याची ।
कठिण कसोटी सदैव साची ॥

कष्टाविण ना मिळे कुणा फळ ।
दुःख भोगुनी मरतिल दुर्बल ॥

चिरंजीव पद बलवंताना ।
प्रपंचात सुख वृथा वल्गना ॥

१० सुख आत्म्याचे सदा अमूर्तिक ।
दृश्य जगी ना मिळावयाचे सुख ॥

दुःख भोगिता धर्म घडो तरि ।
आणि गाठिंशी पुण्य पडो तरि ॥

ह्मणुनि महात्मा जगीं जन्म घे ।
आणि वर्ततो स्वधर्म योगे ॥

११ तिथें दुःख कीं सौख्य न ठावे ।
सुख दुःखामधि धर्म आठवे ॥

पाप पंकिं ना रुते कदापि ।
पुण्यवंत ना ह्मणवि कदापि ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पापपुण्य हे गुण देहाचे ।
देहि विदेही मला व्हायचे ॥

आत्मगुणाची ओळख पटते ।
जगिं कर्माचे बंधन तुटते ॥

बंधन सरता विमुक्त आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

१२ जीव आणि जग ज़गद् विलासी ।
प्रीति गमे का परमात्म्यासी ॥

जग आत्म्याची प्रयोगशाळा ।
जगावयाचा जगिं कंटाळा ॥

तिथें नसे सुख कशास जगणें ।
आत्मस्वरुपी सदैव स्थिरणे ॥

१३ अस्थिर जीवनिं रेंगाळति जन ।
मरण चुकेना आणि दुःख पण ॥

दुःख सराया हवीच शांती ।
जगीं सत्य शिव सुंदरता ती ॥

१४ जिथें सत्य शिव सुंदरता ना ।
कुठुनि शांति मग मिळे जिवाना ॥

जिथें न शांती तिथे अराजक ।
ज्ञान न दर्शन चरित्र सम्यक ॥

जीव होइना जैन जितेंद्रिय ।
म्हणुनि भोगिना निज सुख अक्षय ॥

तोवरि चाले विश्व राहटी ।
सदा सुखी तो प्रभु परमेष्ठी ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१५ ऊस तोडिला ऊस गाळिला ।
सुरस तयाचा किती कढविला ॥

ढेप गुळाची शुभ्रशर्करा ।
गुण गोडीचा गमे साजरा ॥

जिवाजिवाची आत्मोन्नति ही ।
आत्मशांतिची तिथेंच ग्वाही ॥

ह्मणुनि झुंजती वीर आणि नर ।
देहधारि ते प्रति परमेश्वर ॥

१६ चरित्र त्याचे तुह्मी ऐकिले ।
पुण्य तयाचे मला लाभले ॥

पुण्यात्म्याचे चरित्र गाता ।
सर्वे पुण्यधन येइल हाता ॥

आपण त्यांच्या समान व्हावे ।
मनी भावना स्फुरे स्वभावे ॥

देति थोरपण दुजा थोर जन ।
कुणी थोर ना परमात्म्याविण ॥

तिथेंच शांति तिथें उन्नती ।
तिथं परमसुख आत्म प्रचीती ।

सत्य सनातन शाश्वत आत्मा ।
जीव व्हायचा जगिं परमात्मा ॥

ॐ शांतिः शांतिः शांति !!!

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खंड चौदावा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१ शांतिमंत्र मुखी म्हणे महात्मा ।
दे आशीर्वच फुले पौर्णिमा ॥

चंद्र तेथला मुनी राजेश्वर ।
दिव्य विभूती प्रसन्न सुंदर ॥

जणू सत्य शिव सुंदरता ती ।
ज्ञान मंडपी विहरत होती ॥

मुनिराजाची विवेक वाणी ।
भाव भक्तिने श्रवण करोनि ॥

उचंबळुनि ये भक्त भावना ।
धर्म तिथे जय होत गर्जना ॥

२ धर्म तिथे जय गर्जत जनता ।
चित्त शुद्ध करि एकात्मकता ॥

मनामनातील भेद नासतो ।
आणि प्रगटतो आत्म भाव तो ॥

कर्मयोग गुणि आत्म जागृती ।
धर्म तिथे जय समाजनीति ॥

३ धर्म तिथे जय जय कोणाचा ।
धर्म कर्म रत जिवा जिवाचा ॥

जीव जाणता धर्म जाणतो ।
जीव जाणता कर्म जाणतो ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धर्म कर्म रत जीवन क्रांति ।
तिथें शांतता आत्म प्रचिती ॥

४ सदानंद मति गुणआत्म्याचा ।
मुनि राजेश्वर प्रतिनिधि त्याचा ॥
जिवा जिवातील दुरित तिमिर ते ।
दूर सारितो प्रसन्न चित्ते ॥

५ प्रसन्न आत्मा प्रसन्न वाणी ।
उपदेशामृत जना पाजुनि ॥
क्षणि निवारुनि पापतापभय ।
बनवि जनाला स्वतंत्र निर्भय ॥

६ स्वतंत्र निर्भय पुण्य प्रकृति ।
स्वतंत्र निर्भय चिदानंद मति ॥
चिदानंद मति शुद्ध भावना ।
राष्ट्रधर्म तो स्वतंत्र बाणा ॥

७ जीव जिनेश्वर मुनींद्र वाणी ।
धर्म निरूपण गुण संजीवनी ॥
शुद्ध स्वच्छ करि समाज जीवन ।
आत्म शक्ति दे तिथेंच दर्शन ॥
आत्म शक्तिचे राज्य जगावर ।
जगांतल्या या जना मनावर ॥
जनगण मानस प्रसन्न आत्मा ।
जीव व्हायचा जगि परमात्मा ॥

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi